पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक-१२**

**सभावृत्तांत**

दिनांक :- १९.१.२०१३ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१३ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.०१.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. **मा.सौ.स्वाती प्रमोद साने**
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप

१५. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर

१५. मा.जगदीश शेट्टी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१८. मा.पवार संगीता शाम

१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२७. मा.नेटके सुमन राजेंद्र

२८. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३१. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३३. मा.लोंढे गणेश नारायण

३४. मा.शमीम पठाण

३५. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३७. मा.अपर्णा निलेश डोके

३८. मा.अनंत सुभाष को-हाळे

३९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४०. मा.पवार मनीषा काळूराम

४१. मा.अविनाश (दादा) टेकावडे

४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४३. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४४. मा.शेख अस्लम शैकत

४५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४७. मा.वाबळे संजय मल्हारराव

४८. मा.मडिगेरी वर्षा विलास

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके

५३. मा.गोफणे अनुराधा देविदास

५४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५६. मा.महेशदादा किसन लांडगे

५७. मा.फुगे सीमा दत्तात्रय

५८. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५९. मा.लोंढे शुभांगी संतोष

६०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.गिता सुशील मंचरकर

६८. मा.छाया जगन्नाथ साबळे

६९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७०. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

७१. मा.आसवाणी सविता धनराज

७२. मा.वाघेरे सुनिता राजेश

७३. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमताराम

७४. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.काळे विमल रमेश

७८. मा.पाडाळे निता विलास

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.विमलताई सुरेश जगताप

८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८४. मा.बारणे निलेश हिरामण

८५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८७. मा.बारणे माया संतोष

८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९१. मा.कलाटे स्वाती मयुर

९२. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९३. मा.चौंधे आरती सुरेश

९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९६. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९७. मा.जवळकर वैशाली राहुल

९८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

९९. मा.जगताप राजेंद्र गणपत

१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०३. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०४. मा.जम सोनाली पोपट

१०५. मा.प्रशांत शितोळे

१०६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१०७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०८. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११०. मा.शेंडगे आशा सुखदेव

१११. मा.मोटे किरण बाळासाहेब

११२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११३. मा.संजय केशवराव काटे

११४. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११५. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११६. मा.पाटील सुजित वसंता

११७. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति. आयुक्त, मा.सावंता-सह.आयुक्ता,मा.पवार,मा.कारचे,मा.कुलकर्णी,मा.दुरगूडे,मा.फुंदे-सहा. आयुक्ता,मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.चव्हाण-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे, मा.शरद जाधव, मा.कुलकर्णी-कार्य.अभियंता,मा.भोसले-प्रशा.अधिकारी,शिक्षण मंडळ, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(अ) **पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध विभागाअंतर्गत व नागरीकांना पुरविण्यात येणा-या सेवाविषयक सेवा सुविधांतर्गत प्रोत्साहनपर स्पर्धा आयोजित करणेबाबतचा** मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

[उपस्थित सन्मा. सदस्यांनी मागणी केली- मा.आयुक्त साहेब, विषय दाखल करण्याआधी सदर विषयाची माहिती देण्यात यावी.]

**मा.आयुक्त** :- सन्मा.उपस्थित नगरसेवक, नगरसेविका, जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात महापौर, उपमहापौर, पक्षनेते यांच्या उपस्थितीत महापालिकेच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने ७ वेगवेगळे मुद्दे हाती घेतलेले आहेत.

१) महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कामे चालतात. ही कामे करताना दवाखाने, स्विमिंग पूल, बागा, व्यायामशाळा यांत स्पर्धा निर्माण करावी.

२) ज्या ठिकाणी सेवा देतो नागरिकांना ती सेवा उत्तम दर्जाची मिळावी.

३) चांगले व्यवस्थापन करणा-या विभागाला पुरस्कार मिळावा. बेस्ट स्विमिंग पूल करावेत. प्रभाग स्तारावर बेस्ट गार्डन निश्चित कराव्यात.

४) वेगवेगळ्या डिस्पेन्सरीतून हेल्दी कॉम्पेटिशन ठेवली तर चांगले काम करणारे अधिकारी जास्त चांगले काम करतील.

५) प्रभाग स्तारावर ३ पुरस्कार, मनपा स्तारावर ३ पुरस्कार असे साधारणत: स्वरुप आहे.

६) २० जानेवारी रोजी महापौरांच्या हस्ते उद्‌घाटन करुन ते ३१ डिसेंबर पर्यंत मूल्यमापन करणार.

७) पुढील २६ जानेवारी २०१४ रोजी पुरस्कार देणार आहोत. २६ जानेवारी पुढील आठवड्यातच येत असल्यामुळे हा विषय १के खाली दाखल केलेला आहे. सभागृहाला विनंती आहे हा विषय दाखल करुन घ्यावा.

अनुकूल -११० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

(ब) **पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी थरमॅक्स सोशल इनिशिएॅटिव्ह फाऊंडेशन व पिंपरी चिंचवड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा शाळा तपोवन मंदिराजवळ पिंपरी पुणे-१७ व छत्रपती शाहुजी महाराज प्राथमिक विद्यालय कासारवाडी पुणे ३४ या दोन शाळेत दत्तक योजना राबविण्याबाबत** मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

**मा.दत्ता साने** :- मा.महापौर साहेब, अधिका-यांनी संपूर्ण विषय वाचून दाखववावा.

याप्रमाणे मा.प्रकाश कदम,मा.अति.आयुक्त यांनी संपूर्ण विषयाचे वाचन केले.

अनुकूल -११० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.तानाजी खाडे** :- मा.महापौर साहेब, काश्मीर येथील पूँछ भागात हिंदूस्थानच्या सीमेवरील भारतीय जवानांवर पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करुन व शहिद जवानांना तसेच इंग्लंडचे नामवंत ज्येष्ठ क्रिकेटपटू, क्रिकेट समालोचक व माजी कर्णधार टोनी ग्रेग, भारतातील पहिल्या महिला फौजदार कुसुम देव,ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व समाजवादी कामगार नेते किशोर पवार, माजी खासदार शिवाजीराव पाटील

*यांचे बंधू शांताराम गिरीधर सिसोदे पाटील, पी.एस.आय. वसंतराव महादेव ढुमे या मान्यवरांचे निधन झालेले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.*

**मा.शमिम पठाण** *:- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

**मा.दत्ता साने** *:- मा.महापौर साहेब, विषय दाखल करुन घेताना त्याचे विषयपत्र आमच्याकडे असायला पाहीजे.*

**मा.महापौर** *:- विषय दाखल झाला आहे. विषय आल्यानंतर त्यावर चर्चा करता येईल.*

**मा.आर.एस.कुमार** *:- मा.महापौर साहेब,वर्तमानपत्रामध्ये वाचले असेल*. *२ कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. वर्तमानपत्रात हेडलाईन आहे. आपण सुद्धा वाचले आहे. या टेंडरमध्ये ७० लाखांची मशिनरी, २ कोटी ७५ लाखांची खरेदी केली अशी बातमी आहे. अशी खरेदी अनेक वर्षांत वाय.सी.एम. मध्ये चालत आलेली आहे. याबद्दल महापालिका सभेत चर्चा केलेली आहे. काही विशेष सुधारणा झालेल्या दिसत नाहीत. काही दिवसांपूर्वी भ्रष्टाचारात सुहास काकडे या कर्मचा-याला सस्पेण्ड करुन ॲक्शन घेतली आहे. फक्त काकडे दोषी आहे का. It is a collective responsibility of top person to bottom. सर्वांवर ॲक्शन का घेतली नाही. फक्त खालच्या पोस्टवर कारवाई होते. वरील लोकांना सोडले जाते. या मशिनरीबद्दल कमिश्नर यांच्याकडून स्टेटमेंट पाहीजे. हे बरोबर आहे का. चौकशी करणार का. मनपाच्या अधिका-यांकडून करु नका. एन्क्वायरी ऑर्डर दिली त्याचे रिपोर्ट नाहीत. मला २८ वर्षांचा अनुभव आहे. २८ वर्षांत माझ्यासमोर १० ते १५ कमिट्या अपॉईंट केल्या. काही रिपोर्ट आला नाही, आला तर नील रिपोर्ट येतो. दिलिप बंड यांच्या बाबतीत चौकशी झाली. १४ कोटींचे २८ कोटी करताना एन्क्वायरी ऑफीसर यांनी नील लिहीले. रिटायर्ड जजकडून चौकशी करा. या कंपनीबद्दल २ टेंडर मनपाने केलेली दिसतात. याबद्दल चौकशी करुन या महापालिका सभेत माहिती द्या अशी विनंती आहे. काकडे केसमध्ये वरिष्ठांवर कारवाई का केली नाही. अधिकारी जसे प्रस्ताव ठेवायला सांगतो तसाच तो पूटअप करतो. हँण्डरायटींग फक्त त्याचे असते. ॲक्शन होत नाही. कधी ऑफीसमध्ये चूकीबद्दल ॲक्शन घेताना कलेक्टीव्हीटी असते. वरील अधिका-यापासून खालील अधिका-यापर्यंत कारवाई केली पाहीजे. जगदाळे साहेब यांच्यासंदर्भात फेब्रुवारी २०१२ मध्ये एका सिस्टरने दोन पानांचे पत्र पाठवले. त्यात आरोप केला आहे. वेगवेगळ्या प्रकारे हे खर्च का घेतो माहित नाही. It is very serious litigation. याबाबत मी सावंत साहेबांना विचारले असता सावंत साहेब म्हणाले, या पत्राची चौकशी वैद्यकीय विभागाच्या प्रमुखाकडे दिली असल्याचे सांगितले. कदम नावाच्या सिस्टर कोणी नाहीत. निनावी पत्र म्हटल्यानंतर ॲक्शन घ्यायला पाहीजे होती. घ्यायची असेल तर HOD यांना कसे काय सांगताय. खरेतर थर्ड पार्टीकडून एन्क्वायरी व्हायला पाहीजे. हे पत्र तुम्ही वाचून दाखवा. त्यानंतर ठरवा काय. मागील ५ वर्षांत औषधे, उपकरणे लंपास करणे,*

किरकोळ साहित्य खरेदी यात प्रचंड घोटाळा करण्यात आला आहे. गरज नसताना खरेदी केलेली आहे. दरवर्षी कसे वापरले याचीही तुम्ही चौकशी करा. ५ ते ७ वेळा चौकशी करा. आवश्यक चौकशी करा यातून माहीती पडेल. वाय.सी.एम.ची उपकरणे रिअल पाहीजे ते नाही. दुरुस्ती रिपोर्ट, ऑफिशियल मेंटेनन्स नाही. कर्मचा-यांची वैद्यकीय बिले पास करताना ऑफिसमध्ये टक्केवारी घेतात असे कर्मचारी सांगतात. याबद्दल एन्क्वायरी करा. ८ ते १० वर्षे रुबी हॉल पुणे इथे पाठविलेल्या केसमध्ये त्याकाळात दुस-या हॉस्पीटलमधील बिलाशी तुलना केलीतर रुबी हॉलकडून दिलेल्या बिलास कर्मचा-यावर २० ते २५ % जादा चार्जेस दिलेले आहेत. १० ते २० % देतो. त्याचा फायनान्शियल पुरवठा होतो. मनपाचे किती कोटी नुकसान होते. २ लाखाचे बील असेल तर ४ लाख खर्च केल्याचा दाखवले जातो. आयुक्तांच्या आदेशाने बदल्या करण्यात आल्या. जगदाळे यांनी काम करणा-या १० ते १२ सिस्टरच्या बदल्या केल्या नाहीत. त्यांना जे डिपार्टमेंट पाहिजे तिथेच त्या काम करतात. याबद्दल चौकशी करा. डायलिसिस विभाग डॉ.भावसार यांच्याकडे सोपवण्यात आला. डॉक्टर तर म्हणतात, त्यांना ट्रेनिंग दिलेले आहे. मटेरिअल शिल्लक असतानाही रुग्णांना विशिष्ट दुकानातून आणायला सांगतात. रक्त तपासण्यासाठी डॉ.भावसार यांच्या पतीच्या लॅबमधून तपासणी करुन आणण्याची सक्ती रुग्णावर केली जाते. याची सोय वायसीएम मध्ये असून सुद्धा रुग्णाला बाहेर पाठवतात. वैद्यकीय विभाग हा सर्वात जास्त भ्रष्टाचार असणारा विभाग आहे. विशिष्ट दुकानांतून साहित्य आणायला सांगतात. आणले नाहीतर रुग्णाला परत पाठवतात. आम्हाला हे नाही पाहीजे. असे प्रकार चालू आहेत. खरेदी केलेली औषधे उपलब्ध असून सुद्धा तशाच वेगळ्या कंपन्या दाखवून विशिष्ट दुकानांतून आणायला सांगतात. हे सुद्धा तपासा. वैद्यकीय अधिक्षकांनी कारभार करताना मनमानी कारभार केलेला आहे. पूरेपूर, सत्तेचा पूर्ण उपभोग घेऊन फायदा करुन घेतात. त्यांच्या पेशंटचे वायसीएम मध्ये ऑपरेशन करुन पर्सनल अकाऊंटमधून पैसे घेतले आहेत. डॉ.नागकुमार, डॉ.अय्यर यांच्या काळात झालेली उपकरण खरेदी डॉ.जगदाळे यांच्या शिफारशीने घेण्यात आलेली आहे. त्यानुसार खरेदी करण्यात आलेली आहे. स्क्रॅप मटेरिअल दीड कोटी, एक कोटी हॉस्पीटलमधून अकोमोडेट केलेले आहे. यात आम्ही सुद्धा होतो. दीड कोटी व्हॅल्यू असणारे स्क्रॅपमध्ये १२ लाखांचे एस्टीमेट ठरवले. कशासाठी १२ लाख ठरवले. दीड कोटीची व्हॅल्यू १२ लाख का. अशी १२ लाख भरणारी पार्टी कोणाची आहे. कोणी पदाधिका-याची असेल तर अधिकारी त्या पदाधिका-याचे ऐकून काम करतात. संस्थेचे नुकसान करतात. या मटेरिअलमधून बीग क्वांटीटी वाईज केलेले चांगले स्पेअर पार्ट काढून घेतलेले आहेत. यात लक्ष घातले पाहिजे. रूग्ण गरीब असतो त्याची सोय करताना अशा प्रकारे त्याच्या डोळ्यात धूळ फेकतो. त्यांना ज्ञान नसल्यामुळे त्यांनी तक्रार केली तरी कारवाई होणार नाही म्हणून तो कधी तक्रार करत नाही. या सर्व बाबतीत वायसीएममध्ये लक्ष घाला. चौकशी करा. चौकशी समितीत विभागप्रमुखांना इन्व्हॉल्व्ह न करता थर्ड पार्टी ठेवा. ऑपरेशन थिएटरमध्ये ५ ते १० लाखांची जादा खरेदी केली. साफसफाई करणा-या एका पार्टीलाच टेंडर मिळेल असे केलेले आहे. १२ कोटींची

*औषधे आलेली नाहीत. एका अधिका-यावर कारवाई केल्यानंतर ब-याच गोष्टी बाहेर यायला लागल्या आहेत. ९ कोटींचे मटेरिअल व १२ कोटींची बिले असणार असा प्रकार चालू आहे. या सर्वांमध्ये लक्ष घालताना ॲक्शन घेताना बघू नका किती मोठा अधिकारी आहे. जो दोषी आहे त्याला त्वरित घरी पाठवा. त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखला करा. या सर्व मॅटरचा निषेध करुन ही सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.*

**मा.सिमा सावळे** *:- मा.महापौर साहेब, आपल्याला प्रश्न आहे इको मशीनसंदर्भात वारंवार भेटी झाल्या, तक्रारी केल्या एक मशीन चोरीला गेलेले आहे. यानंतर काही ॲक्शन घेतलेली नाही. आपली भेट घेतल्यानंतर आपण सांगितले समक्ष संजय कुलकर्णी यांना सांगितले, इको मशीन वॉटर लिलि सोसायटीमध्ये बसवायला सांगितले होते. तिथे आढळले नाही. फौजदारी दाखल केली का नाही याचे मला उत्तर हवे आहे.*

**मा.बाबासाहेब धुमाळ** *:- मा.महापौर साहेब, ख-या अर्थाने चर्चा केली. तसे पहायला गेले तर वेगळाच प्रकार आहे. आयुक्तांनी जो निर्णय घेतला. वाय.सी.एम. बाबतीत त्यांना एका कर्मचा-याला सस्पेण्ड केले त्याबद्दल धन्यवाद देतो. तसेच जकातीबाबतीत घडले. आयुक्तांनी २ लोकांना सस्पेण्ड केले आपल्या सर्वांना माहित असेल आपण सर्व मंडळी विकास कामांबद्दल बोललो तर फार बरे होईल. आयुक्त प्रशासनावर ठाम होते ते निर्णय घेतील. मनपाला ठोसा दाखवला आहे. जुन्या मंडळींना माहित असेल इतिहास काय आहे. पी.एम.पी.एम.एल. बसमध्ये डुप्लिकेट टिकिटे चालू आहेत. ज्या इन्स्टिट्यूशन नेमल्या त्यांना परत कामावर ठेवले. हा प्रश्न आपल्या मनपात येणे गरजेचे आहे. सर्वजण तुमच्या पाठीमागे आहेत. मुंढे साहेबांना रिसीट दाखवली, सूचना दिल्या कसा माल येतो आहे. आपण पुढे जाल. भविष्यात असा आयुक्त होणे नाही. मनपाला चांगला फास देऊ शकता. पूर्वी २४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी मिटींगला सगळे हजर होते. मी स्वत: हजर होतो. पाण्यासारखा मोठा प्रश्न पाणी कसे मिळेल अशी यंत्रणा राबविली जाते आहे. आयुक्तांनी जो निर्णय घेतला त्याबद्दल धन्यवाद देतो.*

**मा.सुलभा ऊबाळे** *:- मा.महापौर साहेब, मा.आर.एस.कुमार यांनी वाय.सी.एम.चा विषय काढला आहे. वाय.सी.एम. मध्ये काही पदाधिका-यांची समिती आहे. महापौर हे त्या समितीचे मुख्य. सर्व पक्षप्रमुख व काही सदस्य, दिलीप बंड हे आयुक्त होते. त्याआधी भाई नगराळे आयुक्त होते. हॉस्पीटलमधील कारभारावर नियंत्रण राहणे आवश्यक आहे. महापालिका सभेत आर्थिक पॉलिसीच्या निर्णयाचे विषय होतात. पण बारीकसारीक कारभार चालतो. नागरीक त्रस्त होतो त्यासाठी समिती नेमली होती. त्यांच्या किती बैठका झाल्या, कोणत्या निर्णयावर काय कारवाई झाली. सध्या ही समिती कार्यान्वित आहे का. कोणकोण सभासद आहेत याचा खुलासा होणे गरजेचे आहे. वाय.सी.एम.मध्ये*

*पैसा आहे. लहानसहान समित्या लोकांना दिसायला आहेत. पदाधिका-यांचे लक्ष पाहीजे. सत्ता आहे म्हणून काय कारभार चालला आहे तो मा.आर.एस.कुमार यांनी सांगितला आहे. वाय.सी.एम. हॉस्पीटलच्या नावाखाली ठेकेदारी पोसली गेली आहे. लुनावरुन येणारे ठेकेदार आज मर्सिडीजमधून फिरत आहेत. ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून टेंडरमध्ये स्पेसिफिकेशन टाकलेले असते. शेड्यूल ठेवले गेले. आपले लक्ष तिथे होते. मनपाची सगळी धुणी धुण्यासाठी तुमची नियुक्ती झाली आहे असे म्हणायला हरकत नाही. रिझल्ट दिसले पाहीजेत. घोषणा नकोत. कारण तुमच्या घोषणा ऐकून ऐकून नागरिक नगरसेवकाकडे अपराधी नजरेने बघत आहेत. ज्यांचा संबंध नाही त्यांच्याबाबत ताशेरे यायला लागले आहेत. कोण जबाबदार याचे नाव पुढे आले पाहीजे. कोणतेही मशीन घ्यायला, रेकमंड करताना एकटा क्लार्क, हेडक्लार्क जबाबदार नसतो. काही अधिकारी हुशार असतात. सेवेच्या दहशतीखाली  सी.आर. खराब होऊ नये म्हणून त्याच्याकडून करुन घेतलेले असते. पदाधिकारी सुद्धा सामिल असतात. रुग्णाला काही औषधे मेडिकल मधून आणायला सांगितली जातात. आपल्याकडील तीच औषधे त्या दुकानात परत विकली जातात. हजारो रुपयांची कर्जे, डोनेशन आणायला सांगितली जातात. वाय.सी.एम. असे असायला कारण काय. कितीतरी डॉक्टर्स यांची बाहेर सुद्धा प्रॅक्टीस चालू आहे. हॉस्पीटलमध्ये सुविधा नाहीत, करु शकत नाही, जागा नाही म्हणून खाजगीत घेऊन जाण्याचे रेकमंड करतात. टक्केवारी घेतात असा आरोप आहे. वाय.सी.एम.कडे लक्ष देण्यासाठी एक महिन्याची सुट्टी काढावी. आत्ता गोष्टी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. आरोपांची लवकरात लवकर चौकशी करु शकतो. पेशण्ट ॲडमिट व्हायला येतात. औषधे लिहून दिली जातात. आपण ४ कोटींची औषधे खरेदी करतो कुठे जातात. महत्वाचा विषय आहे. वाय.सी.एम. व समिती यांचा सुद्धा खुलासा व्हावा. समितीवर कोणकोण आहेत त्यांची मिटींग कोणत्या शेड्यूलप्रमाणे व्हायला पाहीजे याचा सुद्धा खुलासा व्हावा.*

**मा.तानाजी खाडे** *:- मा.महापौर साहेब, मी प्रथमत: आयुक्तांचे अभिनंदन करतो. आपण त्यावेळी या सभागृहात आलात. सुरुवातीला वाय.सी.एम. वर लक्ष घातले होते त्यात बराचसा फरक पडला. आत्ताच मा.आर.एस.कुमार यांनी विषय मांडला, त्यात देखील तथ्य आहे. लगेच सगळ्या गोष्टी अंमलात येतील असे वाटत नाही. जेवढे एस्टीमेट तेवढे चांगले काम करण्याचा प्रयत्न करत आहोत. मा.आर.एस.कुमार यांनी चांगला विषय मांडला आहे. त्यात काही  पेशंटला इन्ज्युरी पाहून ऑपरेशन साहित्य भाड्याने घ्यावे लागते. हाडे, पाय मोडलेले पेशंट असतील तर १५ ते २० हजार भाडे द्यावे*

*लागते तरच ऑपरेशन केले जाते नाहीतर ऑपरेशन होत नाही. गोरगरीबांकडे पैसा नसतो, वेळ*
*नसतो. त्यामुळे वेदनेसहीत तो पेशंट बरेच दिवस ॲडमिट असतो. असे साहित्य जर भाड्याने घेत असाल तर निश्चित अवजारे स्वतः घ्यावेत. काही ठिकाणी सेक्टर २२ मध्ये हॉस्पीटल आहे. आपण व्हिजिट देऊन पाहीले. २/३ महिन्यांत त्याचा कायापालट झालेला आहे. हे देखील कौतुकास्पद आहे. बरेचशे विषय आहेत. त्यात आपण डॉक्टर म्हणून लक्ष घातलेले आहे. आपल्यावर टिका होते. मी यावर बोलत नाही. मा.आर.एस.कुमार यांनी विषय मांडला त्याला अनुमोदन देतो व ही सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.*

**मा.श्रीरंग बारणे** *:- मा.महापौर साहेब, खरेतर हा वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीच्या अनुषंगाने सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक मा.आर.एस.कुमार यांनी वाय.सी.एम. मधील वैद्यकीय विभागाबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. बातमी अशी आहे, आयुक्तांच्या अखत्यारीत तोडातोड करणे आयुक्तांचे काम नाही. त्यासाठी अधिकारी उपस्थित आहेत. महापालिकेत कार्यरत आहेत. आयुक्त तोडफोड करणार. जे तोडफोड करताना चुकीच्या पद्धतीने करत असतील तर त्या अधिका-याला पहिले घरी पाठवले पाहीजे. महापालिकेतील वाय.सी.एम. हॉस्पीटल असेल, इतर हॉस्पीटल्स् असली तरी खरेदी होत असताना आयुक्त हे मुळात वैद्यकीय पेशातील आहेत, डॉक्टर आहेत. परंतु या महापालिकेतील वैद्यकीय विभागावर जवळपास ४० कोटी रुपये खर्च करतो. भ्रष्टाचाराची बाब या सभागृहात निघाली नाही. मा.आर.एस.कुमार यांनी प्रश्न काढला म्हणून प्रश्न निघाला नाही. वाय.सी.एम.मधील खरेदी बाबतीत, वैद्यकीय विभागाच्या ढिसाळ कारभाराबाबतीत सातत्याने प्रश्न उपस्थित झालेला आहे. आयुक्त बदलले तरी अधिकारी तेच आहेत. इतर रुग्णालयांमध्ये सुद्धा तेच अधिकारी आहेत. खरेदी करणारे हेच अधिकारी आहेत. मुळात ७/८ वर्षांपासून आपण जरी वाय.सी.एम.चे सगळे भंगार बाहेर काढले. ऑडीट माध्यमातून जाहीर केले तरी मुळात खरेदी होत असताना जे साहित्य लागत नव्हते, आवश्यक नव्हते, तरी मात्र ती साहित्य खरेदी दरवर्षी केली गेली. तत्कालिन नगरसेवक तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. आयुक्तांनी चौकशी समिती नेमली, त्यापुढे काहीच झाले नाही. वैद्यकीय बिलाबाबत कठोर भूमिका घेतली. महापालिकेची लूट झाली त्याबाबत काय निर्णय घेणार. इथून पुढे लूट होऊ नये. चोर तेच आहेत. दरोडेखोर हेच आहेत. गुन्हा करणारे हेच आहेत. ठोस निर्णय घेतला नाहीतर या सभागृहात आपण गेल्यानंतर दुसरा आयुक्त येईल. ७० टक्के सभासद तेच राहणार आहेत. सातत्याने भूमिका मांडणारे सदस्य हेच सभागृहात*

*राहणार आहेत. वैद्यकीय विभागाचा कारभार सुधारत असताना चूक करणा-या अधिका-याला क्षमा नाही झाली पाहीजे. माफी देखील नाही केली पाहीजे. शहरात महापालिकेच्या वैद्यकीय*

*विभागावर कोट्यावधी रुपये खर्च करतो. शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी खर्च करतो. जलपर्णीच्या माध्यमातून पवना नदी, इंद्रायणी नदीची दूरावस्था केली आहे हे आपण पाहीले पाहीजे. जलपर्णी काढण्यासाठी जलपर्णी झााल्यानंतर निविदा प्रस्ताव करतो. संबंधित आरोग्य अधिका-याला हे माहित नव्हते का? पवना व इंद्रायणी नदीमध्ये दरवर्षी जलपर्णी होते. ती काढण्यासाठी तात्काळ उपाय योजले जावेत. ज्या-ज्या भागातून पवना व इंद्रायणी नदी वाहते, जे नागरिक नदीपात्राच्या जवळपास राहतात, त्यांना डासांचा अतिशय सामना करावा लागतो. माझ्या कारकीर्दीत ५ वेळा डासांवर सभा तहकूब झाल्या आहेत. १६ ते १७ वर्षांमध्ये ५ वेळा सभा तहकूब झालेल्या आहेत. शहरात या डासांमुळे रोगांचा प्रादुर्भाव होतो आहे. जलपर्णीबरोबरच कचरा टाकला जातोय. आरोग्य समस्या वैद्यकीय सेवा दिल्यामुळे सुधारणार नाहीत. शहरातील नागरीकांचे आरोग्य सुधारताना आरोग्य विभाग सुद्धा सुधारला पाहीजे. केवळ उन्हाळा आल्यानंतर जलपर्णी वाळून गेल्यानंतर ती काढण्याची प्रक्रिया होते हे देखील सुधारले पाहीजे. रुग्ण बरा झाल्यानंतर उपचार करण्याचे काम होते आहे. एखादा उपचार रोग आजार बरा करण्यासाठी नाही. त्या गोष्टीचा हेतू साध्य होतो. त्यातून कोणाला काहीतरी फायदा होईल, मिळेल या दृष्टीकोणातून होतो. हे निश्चितपणे थांबवले पाहीजे. आपली काम करण्याची पद्धत वेगळी आहे. त्यातून थांबू शकेल-ते थांबवत असताना चूकीच्या पद्धतीने झालेल्या कारभाराला क्षमा देऊ नका. महापालिकेची लूट करण्याचे काम गेली अनेक वर्षे सातत्याने चालू आहे. महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचे काम सातत्याने चालू आहे. यात दुरुस्ती करुन निश्चितपणे महापालिकेच्या अर्थव्यवस्थेला लगाम घालण्याचे काम कराल. चुकीच्या पद्धतीने कारभार करुन घेतोय त्याला देखील शासन झाले पाहीजे.*

**मा.संजय काटे** *:- मा.महापौर साहेब, वाय.सी.एम.मध्ये उपचार घेत असतो. मनपा हद्दीतील रुग्णांवर उपचार करतो त्याचप्रकारे राजगुरुनगर, मावळ, मोशी येथील रुग्णांना सुद्धा सुविधा देतो, ही चांगली बाब आहे. खरेतर महाराष्ट्र शासनाची ही जबाबदारी आहे. त्यासाठी होणारा खर्च महापालिकेच्या खिशातून खर्च होतो आहे. राज्य शासनाकडून हा खर्च कसा घेता येईल याचा सुद्धा पाठपुरावा करावा अशी विनंती आहे. मा.आप्पा बारणे यांनी सांगितले, ऑडीट चालले आहे. त्याबद्दल कार्यवाही करताय हे फार चांगले आहे, अभिनंदनीय काम आहे.*

**मा.दत्तात्रय साने** :- *मा.महापौर साहेब, यापूर्वी एक पत्र दिलेले आहे. उपअभियंता फुटाणे, दामले हे अधिकारी पैसे घेतात म्हणून पत्र दिलेले होते. मा.आर.एस.कुमार यांनी शब्द वापरले, वाय.सी.एम.मध्ये मोठा गदारोळ चालला आहे. चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे काम चालले आहे. काकडे याला सस्पेण्ड केले म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी तसा प्रकार आहे. तसाच प्रकार माझ्या वॉर्डात झाला तो नगरसेवकांना सांगू इच्छितो. माझ्याकडे अधिकृत सी.डी. आहे. आजही सभागृहात ऐकून दाखवेल. माझ्या वॉर्डात अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई चालली होती. त्यावेळी अधिकारी नागरीकांकडून पैसे घेत होता. यादीतील पुढील नाव तुझे आहे तू पैसे दिलेतर तुझे नाव घेणार नाही असे सांगितल्यावर नागरीक त्या अधिका-याला पैसे देतो. ज्याला सजा द्यायची त्याला सोडले आहे. फुटाणे चोर आहे,त्याला बाजूला ठेवले आहे. तो त्या दिवसापासून आजपर्यंत माझ्या वॉर्डात उपअभियंता म्हणून आलेला नाही. मी इंगळे यांना पुराव्यासहीत सांगितले. त्या दिवसापासून त्यांची माझ्या वॉर्डात एक व्हिजिट सुद्धा नाही. असा अधिकारी का सांभाळताय. आपले अधिकारी काय करतात त्याचे अधिकृत पत्र दिलेले आहे. त्याला उत्तर दिले नाही. अधिका-यावर काय कारवाई केली त्याचे उत्तर आलेले नाही. त्याच्यावर ताबडतोब कारवाई करा अन्यथा यानिमित्ताने सभा तहकूब करण्याची वेळ आमच्यावर आणू नका. अधिकारी चोर आहेत, त्यांना पाठीशी घालताय. मी पुराव्यासहीत देतोय. आपण सांगितले आहे. अन्यथा या निमित्ताने ही सभा तहकूब करावी.*

**मा.सुनिता वाघेरे** :- *मा.महापौर साहेब,गेल्या महिन्यात १७ नोव्हेंबरला रात्री १.०० वा. वाय.सी.एम.मध्ये गेले होते त्यावेळी आय.सी.यू. मध्ये जागा खाली नाही असे सांगितले. मी स्वतः जाऊन बघितले तर ३ बेड रिकामे होते. डॉ.जगदाळे यांना सांगितले तर ते म्हणाले, तुम्हाला ॲडजस्ट करुन देतो. तेथे राखिव ठेवलेले असतात. आम्ही रात्री फोन करतो. आम्हाला कामच नाही. बेजबाबदारपणे बोलतात, त्याला अजिबात गत्यंतर नाही. गोरगरीबांना सुविधा कशा मिळतील.*

**मा.राजेंद्र जगताप** :- *मा.महापौर साहेब,वैद्यकीय विभागावर चर्चा झालेली आहे. यासंदर्भात बोलायचे आहे. मा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले आहे, परिसरात ज्या-ज्या ठिकाणी पवना नदी जाते. सांगवी परिसरात नदीवर एवढी जलपर्णी वाढली आहे की रोज संध्याकाळी आम्ही थांबत नाही. नागरीक सुद्धा थांबत नाहीत. धूर फवारणी होते. त्यावेळी गाड्यांवरुन फिरतात अशी परिस्थिती आहे. शहरात सगळे डास मारायची बॅट*

*घेऊन फिरत असतात अशी परिस्थिती शहरात आहे. म्हणून जलपर्णी काढायचे टेंडर करायचे चालले आहे. पत्रकार दररोज वर्तमानपत्रात बातम्या देत असतात. आमच्या परिसरात संध्याकाळी ६ नंतर रात्री २ वा. पर्यंत एकही मनुष्य थांबत नाही. नदी बाजूचा परिसर असल्यामुळे लोक हैराण झालेले आहेत. जलपर्णी लवकरात लवकर काढावी. रोजच्या रोज वर्तमानपत्रात वाचत असतो. जास्तीत जास्त बांधकामे माझ्या प्रभागात पाडली आहेत. जलपर्णी लवकरात लवकर काढावी म्हणजे लोकांना व्यवस्थित झोप मिळेल अशी विनंती करतो.*

**मा.राहूल जाधव** *:- मा.महापौर साहेब, वाय.सी.एम. मध्ये गेलो तर आय.सी.यू. मध्ये जागा नसते. १९९७ मध्ये मनपा हद्दीत समाविष्ट केलेल्या गावांचा वैद्यकीय सेवेसाठी कधी विचार केला आहे का? समाविष्ट गावांत वाय.सी.एम. सारखे हॉस्पीटल बांधले असते तर आमच्या माता भगिनींना सुविधा मिळाली असती. माझ्या माता भगिनीवर जी वेळ आली ती आली नसती. हा विचार आपण करावा. आमचा ग्रामिण भाग आहे तिथे जागा सुद्धा उपलब्ध आहे. याचा विचार करावा अशी विनंती करतो.*

**मा.कैलास थोपटे** *:- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहरातील आरोग्य सुविधेचा विषय झालेला आहे. त्याच्या अनुषंगाने बोलतो. पवना नदीवर डेअरी फार्मवर मिलिटरीने धरण बांधलेले आहे. तिथल्या शेतीसाठी त्यातून पाणीपुरवठा होतो. महापालिका एस.टी.पी. प्लाण्टवर करोडो रुपये खर्च करते. त्यातून पाणी स्वच्छ करुन नदीत सोडतो. एवढा खर्च करुन सुद्धा मला वाटत नाही ड्रेनेजचे १० टक्के सुद्धा पाणी स्वच्छ होते. डेअरी फार्म इथली नदी सोडली तर पिंपळे सौदागर, रहाटणी, पिंपरी गाव इथे अक्षरशः नदी म्हणण्यासारखी राहीलेली नाही. सर्व गटार झालेली आहे. धाण पाणी होते. संपूर्ण गावठाण जाम झालेले आहे. परिसरातील नागरिकांना बाहेर निघाल्यानंतर मच्छर फिरत असतात. सर्व नागरिकांच्या वतीने विनंती आहे, गटारे तुंबलेली आहेत. पूर्ण पाणी गेल्यानंतर त्या ठिकाणी जलपर्णी कमी होईल, धाण पाणी कमी होईल. डेअरी फार्मचे पाणी व्यवस्थित करायचे असेल तर शहरात आणखी एस.टी.पी. प्लाण्ट उभा केलेले आहेत, त्यातून डेअरी फार्मला पाणी द्यावे. नदीचे पाणी सोडले तर त्याठिकाणी जलपर्णी कमी होईल हीच विनंती करतो.*

**मा.महापौर** *:- विषयाचा खुलासा करावा.*

**मा.संजय कुलकर्णी** *:- मा.महापौर साहेब, मा.सन्मा.सदस्य, मुख्य कार्यालयाकडून खरेदी केलेले इकोमॅट मशीनबद्दल चौकशी (कार्य.अभियंता,पर्यावरण) केली असता संत*

*तुकारामनगर इथे वॉटर लिलि सोसायटी इथे बसवलेली मशीन तिथे उपलब्ध नसल्यामुळे त्याचा तपासणी अहवाल आयुक्तांकडे सादर केला नाही. त्यांनी दिलेल्या आदेशान्वये विनापरवाना मशीन हलवल्याबद्दल ४ जानेवारी २०१२ रोजी पोलिस उपआयुक्त यांच्याकडे फौजदारी गुन्हा दाखल करण्याबद्दल दंड करावा. त्याप्रमाणे त्याच्या अनामत रकमेतून रक्कम वसूल करण्यात यावी. कलम ५ प्रमाणे ठेकेदाराने अटींचा भंग केल्यास मशीन न पुरविल्यास त्याच्या करारनाम्यातील अटी क्रमांक २,८,९,१०,१७ चा भंग केला असेल तर त्याची अनामत रक्कम वसूल करण्यात यावी. दि. २८/३/२०१३ रोजी मुदत संपते आहे. अनामत रक्कम जप्त करत असेल तर याची नोंद जंगम मालमत्ता रजिस्टरमध्ये घेण्यात आली आहे. मशीनला नंबर टाकण्याची कारवाई करावी. सदर मशीन कोणत्या सोसायटीमध्ये बसवल्या. दोन्ही मशीन वाय.सी.एम.मध्ये बसवण्याचे आदेश आयुक्तांनी दिलेले आहेत. त्याप्रमाणे वाकड इथे एक व वाय.सी.एम. मध्ये एक मशीन बसवले आहे. साई इथले मशीन संबंधित ठेकेदाराने हौसिंग सोसायटीची परमिशन घेतली त्याप्रमाणे मशीन हलवण्यात आली. ऑपरेशन, मेन्टेनन्स यावर पर्यावरण विभागाकडून नियंत्रण ठेवले जाणार आहे.*

**मा.सिमा सावळे** *:- मा.महापौर साहेब, एखादी वस्तू एखाद्या ठेकेदाराला ज्या ठिकाणी पुरवण्याचा आदेश दिला असेल तर ती वस्तू त्या ठिकाणी जागेवर नसेल तर ती चोरी ठरते. वॉटरलिलि सोसायटीतून इको मशीन परस्पर हलवली गेली हे तुम्हाला माहिती होते का? तर नाही. ते मी तुम्हाला सांगितले. मी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्याठिकाणी इकोमॅन मशीन परस्पर हलवून गायब केलेले आहे. त्याची दखल घेणे आपले कर्तव्य आहे. त्या ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. परंतू आपण तसे न करता DCP ला आपण पत्र दिले आहे. वस्तू चोरीला गेल्याची फिर्याद दाखल न करता पत्र देणे हे कुठल्या न्यायात बसतो. म्हणजे महापालिकेसाठी वेगळा न्याय आणि सर्वसामान्य नागरीकांसाठी वेगळा न्याय असू शकतो का? त्यामध्ये आपले मनपाचे लोक गुंतलेले असल्यामुळे त्यांच्यासाठी वेगळा न्याय आहे का? कायदा सर्वांना सारखा असला पाहिजे. DCP ला आपण पत्र न देता गुन्हा दाखल करण्याची विनंती करायला पाहिजे होती. डायरेक्ट फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही. आमच्या नागरिकांच्या करातून जमा होणाऱ्या पैशाची जर उधळपट्टी होत असेल, तर हे सगळे संगनमताने होत नाही कशावरुन? गेले ४/५ दिवस आपण स्वत: या विषयाचा पाठपुरावा करताय. परंतू ठोस असे काही निर्णय होत नाहीत. मी स्वत: गेले ५ दिवसांपासून आपली भेट घेण्याचा प्रयत्न करते. आपण वेळ देत नाही. फौजदारी दाखल केली अशी बातमी वृत्तपत्रात वाचली आहे. खरेच फौजदारी दाखल केली का? मशीन हलविण्याची परमिशन नव्हती मग मशीन हलवले कसे? संजय कुलकर्णी यांच्याकडे मशीनच्या मेंटेनन्सचा विषय होता. परंतू वर्षभरापासून त्यांना माहितच नव्हते की मशीन जागेवर आहे किंवा नाही. ते मशीन जागेवर नाही हे मी निदर्शनास आणून दिले नसते तर त्यावर आपण काही केले नसते. निदर्शनास आणून दिले असेल तर डायरेक्ट फौजदारी दाखल करा. DSP ला वस्तू चोरी गेल्याचे पत्र लिहीताता का? आयुक्त साहेब, आपल्याकडून ही अपेक्षा नाही. मी आपल्याला वाईट बोलायला उभी नाही. परंतू आपण आदेश दिल्यानंतर सुद्धा अधिकारी आपल्या आदेशाची पायमल्ली करतात व ठेकेदाराच्या हितासाठी खोटारडेपणा करतात हे उघड आहे.*

**मा.संजय कुलकर्णी** :- *मा.महापौर साहेब, आयुक्तांचा आदेश झाल्यानंतर लगेच फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी पुणे शहरात गेलो होतो. श्री.विधाते यांनी सगळे समजून घेतले. मशिन चोरी झालेली नसल्यामुळे उपलब्ध असल्यामुळे जागेवरुन हलवली त्यामुळे फौजदारी होत नाही असे सांगितले. श्री.उमाप यांच्याकडे चर्चा झाली. त्यांनी सांगितले, याबाबत काय ते बधून योग्य ती कारवाई करु.*

**मा.सिमा सावळे** :- *मा.महापौर साहेब, मशीन शोधली का? आपण पोलिसांत तक्रार दाखल केली आहे का? पोलिस कारवाई करणार का? जर तक्रारच दाखल नसेल तर पोलिस कशी कारवाई करणार? खरंतर मला आपली किव येते आपले कसे होणार याची चिंता वाटते. मुळात आपण बघितले पाहिजे आपली फौजदारी दाखल करण्याची मानसिकता आहे का? याठिकाणी फौजदारी दाखल झाली पाहिजे. अशा प्रकारची केस होऊ शकते की नाही याचे उत्तर द्या. मशीन चोरीला गेली आहे त्याची तक्रार केली पाहिजे. आपण त्यांचे का ऐकतो? तुम्हाला माहित आहे का? मशीन कुठे आहे? मी मशीन शोधली, आयुक्त साहेब, आपणास सांगितले म्हणजे मी चूक केलेली आहे का? माझी चूक झाली असे मला वाटते. सरळसरळ ठेकेदाराला पाठीमागे घालण्याचा प्रकार आहे. आयुक्त साहेब, फौजदारी दाखल करा. DCP आपल्याला सांगू शकत नाही की अशा केसमध्ये फौजदारी दाखल होत नाही म्हणून. पोलिस आपली जबाबदारी झटकत आहेत. त्यांच्याशी आपल्याला देणे घेणे नाही. एकतर तुम्हीतरी फौजदारी दाखल करा नाहीतर मी तरी फौजदारी दाखल करते. मी फौजदारी दाखल करुन तुम्हाला सुद्धा कोर्टात पार्टी करु शकते. माझी आपल्याला विनंती आहे, पहिली फौजदारी दाखल करा. तुम्ही करणार नसाल तर मी कोर्टात स्पेशल केस दाखल करेल व आपल्यालाही त्या केसमध्ये पार्टी करेल. ही मशीन शिफ्ट झाली. आपले अधिकारी असे सांगत आहेत. परंतू ती शिफ्ट नसून चोरी झालेली आहे. चोरीचा गुन्हा दाखल झाला पाहीजे. फौजदारी दाखल झाली पाहीजे. नाईलाजाने आयुक्तांनाही पार्टी करावे लागेल.*

**मा.आर.एस.कुमार** :- *मा.महापौर साहेब, कमिशनर यांनी सांगावे, चौकशी अहवाल कधी येणार? काकडे याला सस्पेण्ड केले. वाय.सी.एम. मध्ये जो काही भ्रष्टाचार गैरप्रकार चालू आहे त्याबद्दल चौकशी केल्यावर रिझल्ट किती दिवसांत येणार याबद्दल अश्यूरन्स पाहीजे आहे.*

**मा.आयुक्त** :- *मा.महापौर साहेब, वाय.सी.एम.बद्दल जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्या अनुषंगाने काही माहिती सांगतोय. ऑक्सिडाईज् चेंबर संदर्भात सकाळ पेपरमध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाकडून वस्तुस्थिती व नस्ती अहवाल घेतला आहे. बातमीमध्ये जे फॅक्टस् नमूद होते. प्रत्यक्ष रिपोर्टवर होते, त्यानुसार प्रशासनाकडून पुढील चौकशी करुन घेण्यात येणार आहे. औषध व्यवस्थापकाला निलंबित केले. त्याने नस्तीतील पाने गहाळ केली असे नमूद होते. पान क्रमांक ४२ गहाळ केले. नंतर मुख्य टोटल बदलली अशी नोंद आहे. तो क्लिअरकट फौजदारी गुन्ह्यास पात्र होतो. म्हणून त्या व्यक्तीला निलंबित केले. संबंधित व्यक्तीने ४ दिवसांनी माझ्या कार्यालयात येऊन म्हणणे मांडले, उत्तर दिले. दोष आहेत असे म्हणणे मांडले. त्या अनुषंगाने दोन अधिका-यांची समिती नेमली. त्याबाबत इतर खरेच दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. गेल्या ५/७ वर्षांतील खरेदीबाबतीत काही मुद्दे*

सन्माननीयांनी मांडले होते. महापौर आपल्याला कल्पना असेल १ जानेवारी पासून प्रशासनामार्फत अचानक तपासणी पथके प्रत्येक वॉर्डात पाठवतोय. जेणेकरुन महापालिकेमध्ये १७०० कोटी खर्च करत असताना नागरीकांना त्याच दर्जाच्या सुविधा मिळाव्यात हा दृष्टीकोण आहे. या तपासणी पथकांनी तपासणी केली असताना महापालिकेची कार्यालये, दवाखाने यात काही गोष्टी आढळून आलेल्या होत्या. उपकरण खरेदी केलेली तशीच पडून आहेत. प्रत्यक्षात उपयोगात नाहीत. बेबी वॉर्मर मशीन, वॉटर प्युरिफायर त्यांचा काहीच उपयोग नाही. खरेदी मात्र झालेली आहे. या अनुषंगाने परिपत्रक काढले होते. २ हेडकडे या गोष्टी होत्या. या नंतर असे होऊ नये. आवश्यक नसेल ती खरेदी करायची नाही. खरेदी करताना निश्चित ज्याचा उपयोग होणार असेल त्याचीच खरेदी झाली पाहीजे. यापूर्वी खरेदी केलेल्या वस्तू ताबडतोब विभागात उपयोगात आणले पाहीजेत. ज्याअर्थी खरेदी केलेली आहे ते बेबी वॉर्मर मशीन, वॉटर प्युरिफायर याचा पाणी पिण्यासाठी वापर झाला पाहीजे. सर्व साहित्य उपयोगात आणले आहे का हे तपासावे ही बैठकीत महत्वाची बाब झाली. या अनुषंगाने परिपत्रक काढले आहे. महिन्याच्या अखेरपर्यंत किती उपकरणे मध्यभांडार व अन्य विभागांत वापरांत आली आहेत. अनावश्यक उपकरण पुढे मागे लागेल म्हणून विभागाने मागितले असे होणार नाही. कर्मचा-यांच्या आजारपणापोटीच्या खर्चाचा मुद्दा उपस्थित केला आहे. कर्मचा-यांकडून बिलाची रक्कम वसूल करण्याचे प्रमाण जास्त आहे. मी डॉक्टर असल्यामुळे  माझे धोरण आहे, सर्वांना उपचार मिळाले पाहिजेत. परंतू काही रुग्णालयात प्रचंड मोठ्या प्रमाणात आकारणी केली जाते आहे. हेच उपचार जर पिंपरी चिंचवडमधील इतर रुग्णालयात निम्म्या किंमतीत १/३ किंमत होते. मनपाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. अधिकारी कर्मचा-यांना सर्वप्रथम उपचार द्यावेत. शिफारस करुन त्यांच्याकडे जावे. माफक दरात तेवढ्याच उत्तम प्रतीचे उपचार पिंपरी चिंचवडमध्ये होतात. हा निर्णय साधारणत: ऑगस्ट, सप्टेंबर दरम्यान घेतला आहे. प्राथमिक आवश्यकता आहे. यातून किमान दीड-दोन कोटींची बचत होणार आहे. पुढील मुद्दा मांडला होता की, विभागप्रमुखांनी काही नर्सेसच्या बदल्या केल्या नाहीत हा मुद्दा नुकताच निदर्शनास आलेला आहे. याचा कालच निर्णय घेतला आहे. त्यांचा बदलीचा अधिकार काढून आयुक्तांकडे गेलेला आहे. वाय.सी.एम.मध्ये सुद्धा मेरीटवरील सगळ्या बदल्या करणार आहोत. विशिष्ट दुकानातूनच औषध खरेदीची तोंडी तक्रार प्राप्त झाली आहे. लोकल परचेस खरेदी नसते, यात सखोल माहीती घेतली आहे. संबंधित ७/८ पुरवठाधारकांनी दिलेला सुधारीत दर पुण्याप्रमाणे नाहीत का. पुणे महापालिकेने काय धोरण केलेले आहे, त्यांच्यापेक्षा जास्त दर असतील तर निश्चितपणे निदर्शनास आणून देता येऊ शकेल. केवळ विशिष्ट व्यक्ती किंवा दूकान यांना आदेश देऊन निगोशिएट करुन दर कमी करु शकतो. खाजगी डॉक्टर्सच्या प्रॅक्टीसचा मुद्दा सुद्धा उपस्थित केला. माझ्याकडे कोणी म्हटले नाही. नवीन मुद्द्यांत मी तपासून घेतो.  ऑडीट करण्याबाबतीत बातमी प्रसिद्ध झाली. त्याबाबतीत खुलासा केला की, कोणीही भविष्यात येणार नाही हा मुद्दा पेपरप्रमाणे मांडलेला आहे.  जुन्या मशीनरी उपयोगात आल्या पाहीजेत. नवीन वायफळ खरेदी होऊ नये म्हणून जलपर्णीबाबतीत सुद्धा अंतिम निविदा झाली होती. निविदांना प्रतिसाद कमी आहे म्हणून मुदत वाढवत नाहीत. २ निविदा आल्या,  ओपन केल्या आहेत. निविदांचा दर जास्त आलेला आहे. पूर्वी प्रभाग

स्तरावर जलपर्णी काढली जायची. चारही प्रभागांच्या आरोग्य विभागांची सेंट्रलाईज निविदा काढली. ती केमिकल पाण्यात नायट्रेटस् असतात त्यात चांगली वाढ होते. स्वच्छ पाण्यात वाढत नाही. वर्षभरात ती कशी वाढत असेल,तीची वाढ कशी थांबवता येईल या अनुषंगाने माहिती घेतली असता असे तंत्रज्ञान उपलब्ध असल्याची माहिती मिळाली. निविदा अंतिम झालेली आहे. मंगळवारी स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवतोय. त्याच्या मंजूरीनंतर यावर कार्यवाही सुरु होईल. उपअभियंता, शाखाअभियंता यांच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. अनधिकृत बांधकामांबाबतीत पदनिर्देशित अधिका-याला जबाबदारी नेमून देण्यात यावी असे कलमात नमूद आहे. त्याअनुषंगाने दि.२९ मार्च २०१२ रोजी प्रधान सचिव यांनी महापालिकेच्या आयुक्तांना निर्देश दिलेले होते. दि. २६ जून २०१२ रोजी प्रत्येक अभियंत्याला विशिष्ट जबाबदारी नेमून दिलेली आहे. चारही प्रभागांत ६४ ज्युनिअर इंजिनिअर, १ डेप्युटी इंजिनिअर प्रत्येक प्रभागाला एक याप्रमाणे ३ ते ४ नेमलेले आहेत. मा.दत्ता साने यांनी डेप्युटी इंजिनिअर व ज्युनिअर इंजिनिअर बाबत तक्रार केलेली आहे. त्याबाबत ज्युनिअर इंजिनिअर वर कारवाई केलेली आहे. डेप्युटी इंजिनिअरकडे ४ ते ५ वॉर्ड असल्यामुळे त्याच्यावर कारवाई करताना वस्तुस्थिती पाहतोय. सिटी इंजिनिअर यांनी याबाबत अधिक चौकशी करावी असा आदेश देतोय. तीव्र दोष असेल तर त्याच्यावर कारवाई करावी. महापालिका अस्तित्वात येण्या आधीपासून डेअरी फार्मचा बंधारा होता. जोपर्यंत पर्यायी व्यवस्था दिली जाणार नाही तोपर्यंत हा बंधारा काढता येणार नाही. मध्यंतरी महापालिकेतर्फे त्यांच्या अधिका-यांबरोबर चर्चा झाली होती. पर्यायी व्यवस्था असेल तर तो बंधारा काढायला ते तयार आहेत. अशी चर्चा चालू आहे की कासारवाडी ट्रिटमेंट प्लाण्टमधून आपण त्यांना पाणी देऊ शकलो तर तो काढता येईल. हे झालेतर पाणी साचते. त्यात जलपर्णी साचते, पर्यायाने ती वाढण्याचे प्रमाण देखील कमी होईल.

**मा.शमिम पठाण** :- मा.महापौर साहेब, सभा तहकूबीचा हा विषय आलेला आहे. सन्माननीयांनी चर्चा केलेली आहे. वाय.सी.एम. हा खूप मोठा कारभार असलेला, सर्व नागरीकांच्या जीवीताशी निगडीत विभाग आहे. आयुक्त हे स्वत: डॉक्टर असल्यामुळे त्यांनी त्याबद्दल जास्त कोणी बोलले नाहीतरी वस्तुस्थिती माहित करुन घेऊन, सखोल माहिती घेऊन संबंधितांवर कारवाई करावी. २ कोटी रुपये हा जास्त खर्च झालेला आहे, ही बातमी आयुक्तांनी पडताळून पहावी. आयुक्तांनी इतरही अनेक बाबींबाबत खुलासा केलेला आहे. याठिकाणी सकाळ हा विश्वासार्ह पेपर आहे. त्यात ही बातमी आलेली आहे, या बातमीवर सर्वांचा विश्वास आहे. एच.बी. ०२ मशीन खरेदीबाबतीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी. त्यासाठी ही सभा तहकूब करावी अशी सूचना मांडली आहे. अनुमोदन दिलेले आहे ही सभा आपण तहकूब करावी अशी विनंती करते.

**मा.भाऊसाहेब भोईर** :- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी त्यांच्या कालखंडात वैद्यकीय विभागात जे काम केले, त्यासंदर्भात त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. मी आयुक्तांकडे वाय.सी.एम. संदर्भात एकटा गेलो होतो, सर्वांची परवानगी घेऊन गेलो

*नव्हतो. यासंदर्भात आयुक्तांना कल्पना दिली होती. वाय.सी.एम. हे पैसे कमवायचे जबरदस्त कुरण झालेले आहे. पवित्र कामे बाजूला राहून विश्वभौमिक प्रवृत्ती वाढते आहे. नगरसेवकांना विनंती आहे, एखाद्यावर कारवाई झाली नाहीतरी त्याची बित्तंबात आमच्यापर्यंत पोचलेली असते. खून करताना हजर राहीलो नाही तरी मदत केली तर त्याला फाशी कशी नाही. आयुक्तांनी कारवाई करुन बंधने आणली असे शततंत्र चालू आहे. कधी ना कधीतरी सत्य बाहेर येतेच. वाय.सी.एम. मध्ये मोठ्या प्रमाणात लूट झाली आहे. जागतिक बाजारपेठेत औषधांचे दर वर्षातून १५ वेळेला बदलत असतात. त्या अनुषंगाने आज झालेले दर, २५ दिवसांपूर्वी खरेदी केलेले मूळ दर यात ३० ते २५% फरक पडतो. हे परस्पर संगनमताने चालते. हे तुम्ही डॉक्टर असल्यामुळे सगळ्या गोष्टी बाहेर पडत असतील तर त्याच्या पाठीमागे गंभीरपणे कोण आहे? वैद्यकीय संदर्भात हे सत्य समोर आलेले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नगरसेवकांना विनंती करतो, आपल्याकडे माफीचा साक्षीदार होत असेल तर सत्य लेखी स्वरुपात होते. म्हणजे असे अपेक्षित नाही. दुसरा कसा आहे, अनेक कड्या असतील. सगळ्यांनी या दृष्टीकोणातून सतर्क राहणे गरजेचे आहे. या सर्व पार्श्वभूमीवर अनेक सत्य उजेडात येणार होती. ताबडतोब अपपद्धतीने आरोग्य विभागाला जोडून होते. यासंदर्भात आयुक्तांना किती मोठा बेनेफिट होतो, त्याची वर्गवारी केली तर अजूनही अडीच लाख भरती आवश्यक आहे. प्रमोशन मिळणार आहे. बाजूच्याची पिळवणूक होणार नाही. ठेकेदारी प्रवृत्ती आलेली आहे. आचार्य अत्रे सभागृह येथे आरोग्य संदर्भात व्यवस्थापनावर चर्चा झाली. ठेकेदाराला फोन केला तर तो म्हणतो, मी याचा माणूस आहे त्याचा माणूस आहे त्याला कोणी काही करु शकत नाही. अशी मुजोर प्रवृत्ती ठेकेदाराची असेल तर त्यांना माज आलेला आहे. काही लोकांसाठी नगरसेवकांना सुद्धा असे वागावे लागते. गटरकूलीं सांगतो, मला कोणी काही करु शकत नाही. तुम्हाला आमचा जाहीर पाठिंबा आहे. ताबडतोब या लोकांवर कारवाई करावी.*

**मा.सविता साळुंके** *:- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी खुलासा केला त्यावर मला बोलायचे आहे. आपण आत्ता खुलासा केला जलपर्णी काढण्यासाठी निविदा काढली आहे. ती मूळात उत्पन्न होऊ नये यासाठी आत्ता निविदा निघेल. हा विषय उत्पन्न झालाच नाही पाहीजे. असा अहवाल आहे. पर्यायाने नवीन काय कृति केली. नगरसेवकांनी माहिती घेतली. नदी प्रकल्पाबाबत जनजागृती केली पाहीजे. यात काय काम केले याचा उल्लेख केलेला नाही. पुढील मिटींगमध्ये पत्र देऊन द्या.*

**मा.वसंत लोंढे** *:- मा.महापौर साहेब, पूर आल्यानंतर जलपर्णी राहत नाही, वाहून जाते. नैसर्गिक पूरात सगळे बंधारे सुटल्यानंतर जलपर्णीवरील खर्च येणार नाही. आपोआप वाहून जाईल हा एक उपाय आहे. आत्ता सगळे शक्य नाही, पुढील वर्षात ते करु शकतो.*

**मा.अश्विनी चिंचवडे (पाटील)** :- *मा.महापौर साहेब, मला एका गोष्टीचा खुलासा पाहीजे महापालिका सभेत प्रश्न विचारल्यानंतर किती दिवसांत उत्तरे मिळतात.*

*(मा.नगरसचिव यांनी सभा कामकाज नियमामधील नियम क्र. ९६, ९६सी, ९८, ९९, १०१,१०६ व १०७ चे वाचन केले.)*

**मा.श्रीरंग बारणे** :- *मा.महापौर साहेब, सभागृहात नियमाप्रमाणे जो प्रश्न विचारण्याची सूचना दिली गेली आहे. त्याच प्रश्नांची उत्तरे सर्वसाधारण सभेच्या पहिल्या दिवशी देण्यात येतील. स्पष्टपणे मराठीमध्ये 'पहिल्या दिवशी' असे लिहिले आहे.*

**मा.महापौर** :- *काही ठिकाणी ३ दिवस सभा चालते म्हणून पहिल्या दिवशी असे लिहीले आहे.*

**मा.श्रीरंग बारणे** :- *मा.महापौर साहेब, पहिल्या दिवशी म्हणजे ज्या दिवशी सभा आहे त्याच्या पहिल्या दिवशी. अश्विनीताईंनी प्रश्न विचारल्यानंतर त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत. सभेपूर्वी १ तास अगोदर त्यांना प्रश्नांची उत्तर देण्यात आली. सभागृहाच्या वतीने विनंती करेल की, सभागृहाच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कमीत कमी १ दिवस अगोदर उत्तरे देण्यात यावीत. जेणेकरुन त्यांना त्यावर अभ्यास करता येईल. संबंधित प्रश्नांसंदर्भात चर्चा होईल. ही बाब गांभिर्याने घेऊन पहिल्या दिवशी खुलासा करावा. पहिला दिवस याचा अर्थ काय आहे.*

**मा.शमिम पठाण** :- *मा.महापौर साहेब, पहिला दिवस म्हणजे आजचा पहिला दिवस आहे. आदल्या दिवशी म्हटल्याप्रमाणे आदला दिवस आहे.*

**मा.अश्विनी चिंचवडे** :- *मा.महापौर साहेब, तुमच्या ऑफीसमध्ये संध्याकाळी ६.०० वा. आल्यानंतर तुमच्या पी.ए. यांनी सांगितले होते. आमच्याकडे उत्तरे एक तास अगोदर आल्यानंतर मी अभ्यास कसा करायचा.*

**मा.शमिम पठाण** :- *मा.महापौर साहेब, ही सभा तहकूब करावी.*

**मा.नगरसचिव** :- *जो प्रश्न विचारण्याची सूचना दिली गेली त्याची सर्वसाधारण सभेच्या पहिल्या दिवशी म्हणजे सभा कंटिन्यू किंवा तहकूब होऊ शकते. परंतू आयुक्तांनी उत्तरे तयार नाहीत म्हणून नकार दिला तर महापौर निश्चित करतील अशा कोणत्याही सर्वसाधारण सभेत हे प्रश्न जीवंत राहतील.*

**मा.सिमा सावळे** :- *मा.महापौर साहेब, बी.पी.एम.सी. ॲक्टची इंग्लिश प्रत वाचा.*

**मा.महापौर** *:- आयुक्त तुम्हाला उत्तर देतील.*

**मा.अश्विनी चिंचवडे** *:- मा.महापौर साहेब, आम्ही सभागृहात नवीन आहोत. उपप्रश्न विचारू शकले असते.*

**मा.महापौर** *:- आधी मिळत नाहीत. जी.बी.च्याच दिवशी मिळतात.*
**मा.अतिरिक्त आयुक्त** *:- बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये तरतूद आहे ती वाचतो, महापालिकेच्या सभेत प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दिले पाहीजे. एवढीच तरतूद या ॲक्टमध्ये आहे. जे वाचून दाखवले ते आपल्या रुल्स् मध्ये आहे.*

**मा.सिमा सावळे** *:- मा.महापौर साहेब, कलम ४४ मध्ये तरतूद आहे ती वाचून दाखवा.*

**मा.अतिरिक्त आयुक्त** *:- कलम ४४ मध्ये तरतूद आहे, ती वाचून दाखवतो - कधी असा उल्लेख नाही.*

**मा.सिमा सावळे** *:- मा.महापौर साहेब, पुढील वेळी आम्ही बी.पी.एम.सी.ॲक्टचे पूस्तक घेऊन बसतो.*

**मा.महापौर** *:- सभा मंगळवार दि.२२/१/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.*

*(मोहिनीताई विलास लांडे)*
*महापौर*
*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - ४११ ०१८*

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक -१२**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९.०१.२०१३ ची तहकूब सभा)**

दिनांक :- २२.१.२०१३ वेळ:-दुपारी ३.०० वाजता

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१३ दिनांक १९.०१.२०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२२.०१.२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.*

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१९. मा.पवार संगीता शाम
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२४. मा.आर.एस.कुमार
२५. मा.जावेद रमजान शेख

२६. मा.पंढरकर निलेश शंकरराव
२७. मा.नंदा विकास ताकवणे
२८. मा.तरस बाळासाहेब जयवंत
२९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३१. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
३२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३३. मा.अपर्णा निलेश डोके
३४. मा.अनंत सुभाष को-हाळे
३५. मा.जयश्री वसंत गावडे
३६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
३७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
३८. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
३९. मा.सुपे आशा रविंद्र
४०. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४१. मा.गोफणे अनुराधा देविदास
४२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
४३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
४४. मा.महेशदादा किसन लांडगे
४५. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४६. मा.लोंढे शुभांगी संतोष
४७. मा.ननवरे जितेंद्र बाबा
४८. मा.सावळे सिमा रविंद्र
४९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५०. मा.भोसले राहूल हनुमंतराव
५१. मा.पालांडे सुजाता सुनिल
५२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५३. मा.छाया जगन्नाथ साबळे
५४. मा.वाघेरे सुनिता राजेश
५५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
५६. मा.काळे विमल रमेश
५७. मा.पाडाळे निता विलास
५८. मा.विनोद जयवंत नढे
५९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
६०. मा.विमलताई सुरेश जगताप
६१. मा.बारणे निलेश हिरामण
६२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे
६४. मा.बारणे माया संतोष
६५. मा.ओव्हाळ शेखर अशोक
६६. मा.यमुनाताई रमणनाना पवार
६७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
६८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
६९. मा.शिताल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
७०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
७१. मा.जवळकर वैशाली राहुल
७२. मा.जगताप राजेंद्र गणपत
७३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
७५. मा.प्रशांत शितोळे
७६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
७७. मा.गायकवाड संध्या सुरदास
७८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
७९. मा.शेंडगे आशा सुखदेव
८०. मा.मोटे किरण बाळासाहेब
८१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
८२. मा.संजय केशवराव काटे
८३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
८४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
८५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.पवार,मा.कारचे, मा.कुलकर्णी,मा.दुरगूडे-सहा.आयुक्त,मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्रशा.अधिकारी, शिक्षण मंडळ, मा.भोसले-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.बरशेट्टी,मा.कांबळे-प्रशा.अधिकारी (जकात), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** :- सर्वांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** :- मा.महापौर साहेब, आपल्यासमोर एक विषय मांडतो. शहरातील बांधकामांचा प्रश्न आलेला आहे. राज्य शासनाने सदर बांधकामे नियमित करण्याबाबत एद्याप निर्णय घेतलेला नाही. अर्धा गुंठा, एक/दोन गुंठ्यामध्ये कामगारांनी बांधकाम करताना त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. त्यांना फौजदारी गुन्ह्याला

*सामोरे जावे लागते आहे. नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तिनही आमदारांनी शासनाकडे याबाबत सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. उपमुख्यमंत्री मा.अजित पवार यांना बांधकामे नियमित करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री महोदयांना शासन पातळीवर निर्णय घ्यावा असे निवेदन दिले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांमधील भितीचे वातावरण दूर करावे म्हणून विविध विषयांबाबतीत बैठक घ्यावी व नागरीकांना दिलासा देणारा निर्णय घ्यावा ही विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांना करीत आहे.*

**मा.राजेंद्र जगताप** *:- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

**मा.दत्ता साने** *:- मा.महापौर साहेब, जोपर्यंत या विषयाचा निर्णय लागत नाही तोपर्यंत ही सभा तहकूब करावी.*

**मा.तानाजी खाडे** *:- मा.महापौर साहेब, या सूचनेला अनुमोदन आहे.*

**मा.महापौर** *:- ही सभा सोमवार दि. ११/२/२०१३ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.*

**मा.श्रीरंग बारणे** *:- मा.महापौर साहेब, सभागृहात चर्चा होऊ द्या. आमचा तहकूबीला विरोध नाही पण शासनाचा निर्णय येऊ द्या.*

**मा.महापौर** *:- चर्चा करण्यात अर्थ आहे का.*

**मा.सुलभा ऊबाळे** *:- मा.महापौर साहेब, आपले काय चालले आहे ते सगळ्यांना कळणे आवश्यक आहे. तुमच्या मनात जे आहे ते आमच्या सुद्धा मनात आहे. ते जनांत कळू द्या, तिथे वेगळाच मसला चालला आहे. याठिकाणी नगरसेवक दत्ता साने यांनी तहकूबीची सूचना मांडली आहे. ही सूचना नसून एका पक्षाचा प्रचार केल्यासारखी सूचना मांडली आहे. मला बोलण्याचा अधिकार आहे मी बोलते. आपण परत बोलू शकता. असे निदर्शनास आणून देऊन ३ आमदार या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. मुख्यमंत्री विषय करत नाहीत, तोपर्यंत ही सभा तहकूब करावी. ते करत आहेत असा दाखवण्याचा प्रयत्न होतो. उरलेले सभागृह वांड आहे का. आमची सुद्धा हीच मागणी आहे. श्रेय घेण्यापेक्षा जनामनात त्या प्रश्नाची जाणीव होणे महत्वाचे आहे. त्यावर चर्चा का नको आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई होते. हा सगळ्यांच्याच जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आयुक्तांशी चर्चा केलेली आहे. कायद्याचा आधार घेऊन मुख्यमंत्र्यांचा आदेश येणार आहे असे सांगून किंवा प्रश्न उत्तरे झाली असे सांगून त्याची कार्यवाही, पोलिस पंचनामा, फौजदारी चालू आहे. दि.३१ मार्च २०१२ नंतरची बांधकामे तोडण्यासाठी आमचा कोणाचा विरोध नाही. आरक्षित जागांबाबतीत कोणाचा विरोध नाही. असे असताना सुद्धा ज्या बांधकामांना मिळकत कर लावण्यात आलेला आहे. तो*

न लावलेली बांधकामे जुनी असताना सुद्धा अनधिकृत म्हणून पंचनामा करण्याचे काम सुरु झालेले आहे. गोरगरीबांच्या अर्ध्या गुंठ्यातील घरावर कारवाई करु नका अशी विनंती केली आहे. आयुक्त साहेब असते तर या चर्चेला अर्थ राहीला असता. आज महासभा तहकूब करणार. ४ वेळा मिटींग तहकूब झाली तर फरक पडणार. त्याचा बाकी विकास कामांवर परिणाम होणार आहे. आपली चर्चा, म्हणणे सभागृहासमोर मांडावे, ते शासन दरबारी गेले पाहीजे. तरच तुमचे आमचे साम्राज्य टिकेल. कायदा बदलण्यासाठी आपण ठराव करु या. मिळकत कर नोंदणी बंद केलेली आहे ती त्वरित सुरु करावी. प्रशासनाला आपले निश्चित ऐकावे लागेल. अनधिकृत बांधकामांच्या कारवाईमुळे संपूर्ण नागरीक त्रस्त आहेत. एका बाजूने कारवाई चालू आहे. प्रशासन, पोलिस यंत्रणा जबाबदार व्यक्तीवर कारवाईचा बडगा दाखवत नाही. मात्र नागरीकांची घरे पाडायची, मिळकत कराची नोंदणी करायची नाही. एप्रिल पासून नवीन आर्थिक वर्षात नोंदणी करु असे सांगायचे. ३१ मार्च नंतरच्या बांधकामांची नोंदणी बंद केलेली आहे. २० ते २५,००० इतकी मिळकतींची संख्या आहे. त्यांच्यावर कारवाईचा बडगा दाखवणार आहेत. अधिवेशन आले की हे करा, ते करा, आंदोलने करा. आम्ही सुद्धा तुमच्या बरोबर आहोत. आम्ही सुद्धा हेच सांगायचा प्रयत्न करीत आहोत. आम्ही सुद्धा आंदोलने केली आहेत. तुम्हाला विनंती केली होती, आमच्याबरोबर आंदोलनात उतरा. ८ लाख स्क्वे.फूटाची बांधकामे पाडली. ज्यांचे नुकसान झाले त्यांना द्यायचे. एका बाजूने निर्णय घेऊ नका. आम्ही सुद्धा सगळेजण तुमच्या बरोबर आहोत. परंतू हा विषय सभागृहाच्या परवानगीशिवाय न करता अनधिकृत बांधकामाविषयी सेवासुविधा बंद केल्या. आजच्या सभेत आदेश द्यावा, तो त्वरित देण्याचे काम सुरु करावे. हा विषय मंजूर नसतानासुद्धा आयुक्तांनी फक्त उमेदमान्यतेवर जी.बी.मध्ये जोपर्यंत सेवासुविधा बंद केलेल्या आहेत, सभागृहाला काही अर्थ उरत नाही. आपल्या खुर्चीला अर्थ उरत नाही. तहकूबीला विरोध नाही. ज्या पद्धतीने तहकूब मांडली त्या गोष्टीला विरोध आहे. आयुक्तांना सभागृहाच्या भावना कळाल्या पाहीजेत. तुम्ही गप्प मी पण गप्प. कधी निर्णय लागणार ठराव शासनाने पाठवावा. दि.३१ मार्च २०१२ पर्यंतची बांधकामे कायद्याच्या चौकटीत बसवून वाचली पाहीजेत. नंतरच अर्धा एक गुंठ्यातील बांधकामांना हात लावू नये असा ठराव समंत करावा अशी विनंती करते.

**मा.श्रीरंग बारणे** :- मा.महापौर साहेब, पहिले प्रथम मा.दत्ता साने यांनी जो ठराव मांडला आहे त्याला प्रामुख्याने पाठिंबा देत असताना सन्मा.सुलभा ऊबाळे यांनी सांगितल्याप्रमाणे खरेतर जो अधिकार सभागृहाचा आहे त्या सभागृहाच्या अधिकारांत आमदारांची नावे टाकणे काही गरजेचे नव्हते. या आमदारांनी विधानमंडळाकडे निवेदन दिलेले आहे, तिथे त्यांनी त्यांच्या अधिकारांचा वापर करावा. महापालिकेत गेली अनेक दिवसांपासून हाच प्रामुख्याने प्रश्न येतो आहे. आजची सभा तहकूब होत असताना मा.मुख्यमंत्र्यांनी या विषयावर गांभिर्याने ठराव करत असताना यापुढे या महापालिकेच्या आयुक्तांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य करायचे नाही, मनपात कोणत्याही प्रकारच्या मिटींग्ज् होऊ द्यायच्या नाहीत अशा स्वरुपाचा निर्णय या बैठकीत सर्वांच्या सूचनेनुसार

होतो आहे. जवळपास ६ महिने झाले. आपल्या दालनात दि.१४ ऑगस्ट २०१२ रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीच्या वृत्तपत्राचे कात्रण माझ्याकडे आहे. त्यात निर्णय झाला आहे. या सभागृहात तो निर्णय होतो आहे तो निर्णय झाला आहे. कोणत्याही प्रकारची जोपर्यंत कारवाई थांबत नाही. १ एप्रिल २०१२ नंतरची बांधकामे पाडल्याबद्दल विरोध नाही. प्रामुख्याने ही बांधकामे १ एप्रिल नंतरची दाखवली जातात, दाखवून पाडली जातात. आज सभागृहात परदेशी साहेब नाहीत. परंतू सांगतो की, नगरपालिका असेल, महानगरपालिका असेल त्यांची निर्मिती ही सर्वसामान्य माणसासाठी झालेली आहे. आरोग्य, पाणी, रस्ते या प्राथमिक सेवासुविधा देणे यासाठी झालेली आहे. नागरीकांना वेठीस धरण्यासाठी झालेली नाही. मानवता पूर्णपणे विसरले आहेत. नागरीकांना एक दिवस अगोदर पोलिस स्टेशनमध्ये घेऊन जाऊन कर्मचा-याने, अधिका-याने संबंधित नागरिकांना सांगितले, उद्या तुमच्या घरावर बुलडोझर फिरवणार आहोत, तुमचे सामान बाहेर काढा. एकिकडे बेघरांसाठी घरे बांधतोय, झोपडपट्टीच्या पुनर्वसन योजनांसाठी कोट्यावधी रुपये खर्च करतोय. दुसरीकडे ज्यांनी घरे बांधली आहेत तिथे माणूसकी पूर्णपणे विसरलेलो आहोत. स्वत:च स्वत:चे सामान रस्त्यावर काढून नागरिकांना बेघर करण्याचे काम चालू आहे. सत्ता असणा-या दोन्ही पक्षांना प्रामुख्याने मुख्यमंत्र्यांचा काँग्रेस पक्ष व पालक मंत्र्यांचा राष्ट्रवादी पक्ष दोन्ही पक्षांना जाहीरपणे विनंती आहे, कोणतातरी ठोस निर्णय घेतला पाहीजे. जेवढी बांधकामे झाली ती ३१ मार्च आधी झाली किंवा नाही याची खातरजमा केली पाहीजे. महसूलमध्ये काम करताना चौकशी करतो, अपघात झालातर पोलिस चेक करुन जाबजबाब नोंदवून त्या पद्धतीने ३१ मार्च पूर्वी बांधकाम झाले आहे का हे सिद्ध झालेतर त्याचे होणारे नुकसान वाचेल. घर घेणे इतके सोप्पे नाही. जागा घेणे त्याहून सोप्पे नाही. झोपडपट्ट्या उभ्या राहणार नाहीत यासाठी परत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवावी लागेल म्हणून सांगतो. कायदा माणसासाठी असतो. कायदा होत असताना माणूसकीच्या दृष्टीकोणातून कायद्याच्या पळवाटा शोधून न्याय देण्याचे काम करणारे साडे तीन कोटी रुपये खर्च करुन कर संकलनची जी.आर.एस मशीन घेतली ज्या-ज्या ठिकाणी नवीन बांधकामे होत आहेत, त्या-त्या ठिकाणी बांधकामांची नोंद असावी या दृष्टीकोणातून खरेदी केली. त्याचा भार खरेतर जे बांधकाम मार्च २०१२ पूर्वीचे आहे. आयुक्त म्हणून माणूसकी पूर्णपणे विसरले आहेत. आयुक्तांनी घर बांधलेले नाही, ते बांधून बघा, त्याचे दु:ख बघा. ८ लाख स्क्वे.फूटाचे बांधकाम पाडले. आजचा मनपाचा दर बघता १६०० स्क्वे. फूटाचे १६० कोटी झाले. ते पाडण्यासाठी किती खर्च केला. आत्तापर्यंत ४१५ कोटी खर्चे केले. एकीकडे विकास ठप्प झाला आहे. बांधकामे पाडण्यासाठी ५ ते १० कोटी घालवतो. दूर्देवाची गोष्ट आहे पोलिस यंत्रणेवर, मशीनरीवर खर्च करतो म्हणून सभागृहाच्या भावना तिथपर्यंत गेल्या पाहीजेत. याबाबत पाठपुरावा केला असेल तर उत्तमच. परंतू वर्तमानपत्राच्या पाठीमागच्या बातम्या वाचल्या तर २ वर्षांमध्ये केवळ घोषणाबाजी झाली असल्याचे जाणवतो. म्हणून आज या सभागृहाच्या भावना इथपर्यंत पोचल्या पाहीजेत. पालक मंत्री मा.अजित पवार यांनी १२ तारखेला मिटींग घेतली, त्यावेळी सदस्यांनी भावना व्यक्त केल्या. त्याठिकाणी त्यांच्या भावना तीव्रपणे व्यक्त

केल्या असत्यातर मा.अजित पवार यांना भावना समजल्या असत्या. त्यांनी तेवढ्या गांभिर्यपूर्ण मांडणी  केले नाही. शहराचे कर्तेधर्ते अजितादादा आहेत. त्यांना गांभिर्याने सांगितले असते, शहरातील जवळपास हजार, दोन हजार बांधकामे नोंदवली गेलेली नाहीत. २५ ते ३०,००० आकडा आहे. आयुक्त साहेबांनी टप्पा केलेला आहे. पहिला टप्पा कधी संपतो. पहिल्या टप्प्यातील त्यांची बांधकामे पाडायला लागले आहेत, त्यापेक्षा त्यांची बांधकामे जो दाखवतो त्याचेच बांधकाम पाडले जाते. पहिले फेज, दुसरे फेज, तिस-या फेजमध्ये तेवढ्यांना नोटीसा पाठवल्या. फौजदारी दाखल केली. सगळी बांधकामे पाडायचा आयुक्तांचा मनोदय आहे. त्याचे गांभिर्य पुढे जास्त होणार आहे. याबाबत गांभिर्याने घेतले पाहीजे. कोणी काही म्हटले तरी राजकारण करायचे नाही. सर्वसामान्य माणसाला आपल्या माध्यमातून किंवा आमदारांच्या माध्यमातून न्याय मिळावा ही आमची भावना आहे. या प्रश्नाचे गांभिर्य केवळ सभा तहकूब करुन आपल्यापर्यंत राहू नये. राज्य शासनापर्यंत गांभिर्याने गेले पाहीजे. शहराची परिस्थिती समजली पाहीजे. समाजातील दीनदुबळा मनुष्य देशाच्या, राज्याच्या कानाकोप-यांतून आलेला आहे. घरकुलासाठी जागा घेऊन घर बांधले. त्याला बेघर करण्याचे राज्य शासनाकडून, प्रशासनाकडून त्यांची अंमलबजावणीचे काम होते आहे. प्रशासनाला दोषी मानून चालणार नाही. राज्यात राज्यशासनाचा कारभार चालतो म्हणून त्यांनी गांभिर्याने घेतले पाहीजे. शहरात चाललेला हैदोस थांबला पाहीजे. मा.विलास लांडे यांनी जाहीरपणे सांगितले आहे, पोलिस फौजदारी दाखल करुन घेताना पैसे घेतात. ही वस्तुस्थिती आहे. हे माहित असतानादेखील पोलिस दलातील संबंधित अधिकारी, कर्मचारी तिथेच काम करतो आहे. शासनाकडून त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. पालक मंत्र्यांसमक्ष स्थानिक आमदारांनी अधिका-याबद्दल तक्रार केली तरी त्याची दखल घेतली गेली पाहीजे. सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होतो आहे. जवळपास फौजदारी दाखल करताना नागरिकांवर केली तरी सदस्य असतील त्यांची व्यथा आहे की, बाहेर रात्र-रात्र झोपा येत नाहीत. व्यक्ती प्रचंड भेदरलेल्या आहेत. त्यांना न्याय देण्याचे काम आपल्याकडून होत नाही ही दूर्दैवाची बाब आहे. शासनाच्या कायद्यात तुम्ही आम्ही सगळे आहोत. त्यांना कायदा करण्याचा अधिकार आहे, त्यांना कायदा बदलण्याचा पण अधिकार आहे. त्यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणली पाहीजे. बांधकामे पाडत असतील तर हातावर मोजण्याइतके असतील, उद्या भविष्यात हा आकडा ३० ते ४० लाखांवर जाईल. म्हणून केवळ सभा तहकूब करुन पेपरमध्ये बातम्या येऊन चालणार नाही तर राज्य शासनाकडे सगळ्या लोकांनी त्यांची वेळ घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची वेळ घेऊन सगळ्या सदस्यांनी मुंबईला यावे. प्रशासनाचा अहवाल कळू द्या. तो कळाला नाही असे मला स्वत:ला व्यक्तिगत वाटते. हा मोठा महत्वाचा प्रश्न आहे. केवळ सभा तहकूब होऊन थांबता कामा नये. राज्य शासनाला शहराची परिस्थिती कळाली पाहीजे. नागरीकांच्या भावना समजल्या तरी त्या दृष्टीकोणातून फार झाले. प्रश्न कोणी सोडवला यापेक्षा प्रश्न कसा मार्गी लागेल ते पहा एवढेच सांगतो.

**मा.आर.एस.कुमार** :- मा.महापौर साहेब, Govt. is of the people, for the people, by the people याची जाणीव करतो. आपण इथे लोकांची कामे करण्यासाठी आलेलो आहोत, घरे पाडण्यासाठी आलेलो नाहीत. हे कार्य का म्हणून केले. अनेक वर्षांपासून अनधिकृत बांधकामे चालू आहेत. घरे बांधत असताना त्यांच्याकडून पैसे घेतले गेले. सगळ्या अधिका-यांनी घेतले, आज त्यांचीच घरे पाडायला गेले आहेत. बांधकामे चालू असताना साहित्य उचलून नेणार. नगरसदस्य परत साहित्य आणून देणार. १०,००० स्क्वे. फूटाचे बांधकाम चालू असताना नगरसेवकाला ढोस दिला की तक्रार माघारी घ्या म्हणून. त्यावेळी प्रशासनाने लक्ष दिले नाही. बांधकाम होऊ दिले. आज ते पाडण्यासाठी प्रशासन काम करीत आहे. त्यांना पूर्ण दोष देऊन चालणार आहे का. वंजारीचे बांधकाम पाडले तो हायकोर्टात गेला. हायकोर्टाने विचारले शहरात अनधिकृत बांधकामे किती आहेत. टोटल दीड लाख घरे असतील. पिंपरी चिंचवड शहरातील १/३ शहर अनधिकृत आहे. एवढी पाडू शकतो का. हायकोर्टाने कन्सर्न्ड ऑथोरीटीज्ना सगळी अनधिकृत बांधकामे ड्यू नोटीशीनंतर डिमॉलिश करायच्या सूचना दिल्या. आपण नोटीस दिली का. त्यांना नोंदणी करायला बोलवले का. त्यांनी विचारले मग तुम्ही नोटीस दिली. कशी दिली तर १५ दिवसांत बांधकामे पाडणार. त्यांचे ऐकून घेतले का. ऐकून घेतले नाही. त्यावेळीच बंदी केली असती तर आज ही परिस्थिती आली असती का. गरीबांना घरे देणे सरकारची जबाबदारी आहे. ५ वर्षांत १३,००० फ्लॅट देऊ शकलो नाहीत. लोक काय करणार. ५ लाख, १० लाख गुंठ्यांचा दर मध्यम वर्गीय मनुष्याला परवडत नाही. गरीब लोकांना घरे देऊ शकत नाही. एवढी मोठी बांधकामे पाडतोय, यांना मुख्यमंत्र्यांनी सांगितले का पाडू नका. आपण आयुक्तांच्या नावावर बोंब मारतो. मुख्यमंत्र्यांकडे अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट आहे त्यांनी सूचना द्यायला पाहीजे होत्या. काहीतरी रिअलाईज करुन कायदा केला असेल, इम्प्लिमेंट केले तरी त्यावर कमिश्नर आहेत. त्यांना सरकारने सांगितले नाही पाडू नका. कोण कसे काय थांबणार. ही राज्य सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. State Govt. has to be instruct to Commissioner. घरे बांधली, सोसायट्यांना, लोकांना काढले आहे. लोकांनी दागिने मॉर्गेज केले आहेत. असे सगळे करुन, आयुष्याची पुंजी त्यात टाकून ते घर जर तुम्ही डिमॉलिश करत असाल तर, त्यांची परिस्थिती काय होणार. अक्षरश: सरकारने याचा विचार केला पाहीजे होता. यात मी सुद्धा मा.दत्ता साने यांच्याबरोबर सहमत आहे. मुलभूत सुविधा बंद केल्या. कसे काय पाणीपुरवठा हा फंटामेण्टल राईटस् मध्ये, ऑब्लिगेटरी ड्युटीजमध्ये येते. शुद्धीकरण प्रकल्पातून पाणी घेता, टॅप लावून पाणी घेता. जगण्यासाठी पाणी गरजेचे आहे. वीज गरजेची आहे. लाईट दिली नाहीतर लोक क्लच टाकून छपरांतून लाईट घेतात. नोंदणी करत नाहीत, हे करताना सुद्धा प्रॉपर्टी टॅक्समध्ये अनधिकृत बांधकामांवर रिमार्क आहे. नोंदणी करुन करव्यवस्था करुन मुलभूत सुविधा दिल्यातरी त्याचे स्टेजेस बदलल्या नाहीत. मिळकत सुविधा बंद केल्या हे चूकीचे आहे. या ठरावाला विरोध नाही. सरकारने ताबडतोब लक्ष दिले नाहीतर कोणतीही मिटींग होणार नाही. महापालिका सभा, स्थायी सभा होणार नाही. स्टॅण्डींगवाल्यांचे २ महिने राहीले आहेत.

*शहर विकासाची कामे थांबणार. ठरावाला माझा विरोध नाहीतर माझा प्रश्न आहे, २ महिने सरकारने यात लक्ष दिले नाही. शहराचे काय करायचे, विकास कसा करायचा. नागरिक बोंब मारतात. सरकार निर्णय देत नाही. यात लक्ष दिले पाहीजे. खाजगी मिटींगमध्ये सांगतो, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे बिल्डींगा पाडल्या. अजून पाडणार आहेत. जोपर्यंत मुख्यमंत्री निर्णय देत नाहीत, तोपर्यंत मंजूरी थांबवा. हजारो प्रॉपर्टीज् ३१ मार्च २०१२ पूर्वी बांधल्या गेल्या. निदान झाले नाही म्हणून अनधिकृत ठरवणे चूकीचे आहे. महाराष्ट्र शासनाकडे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे जाऊन, मुख्यमंत्र्यांकडे अर्बन डेव्हलमेंट डिपार्टमेंट आहे. त्यांच्याकडे जाऊन विनंती करुन यावर सोल्युशन निघत नाही, तोपर्यंत ते थांबवावे अशी विनंती करतो. आम्ही लोकांची कामे करायला आलो आहोत. घरे उद्‌ध्वस्त करण्यासाठी आलेलो नाहीत. Govt. is of the people, by the people, for the people. त्यामुळे लोकशाहीने काम करायचे आहे. सरकार काहीतरी करेल, आपण त्यांना निर्णय द्यायला लावू. म्हणून तूर्त तरी थांबा.*

**मा.जितेंद्र ननावरे** *:- मा.महापौर साहेब, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे सुराज्य केले. कटीबद्ध जनहिताय हे वाक्य आहे. आजही ३५० वर्षांनंतर त्यांच्या पत्राचा पिंपरी चिंचवड मनपाच्या सिंबॉलमध्ये वापर करण्यात येतो. औरंगजेब जसा नागरिकांवर जुलूम, दुजाभाव करत होता. सन्मा. आयुक्त साहेब, एखादा गोरगरीब मनुष्य आपल्या आयुष्याची जमापूंजी एकत्र करुन होणा-या पैशांतून अर्धा गुंठा जागा घेतो. वेळ पडली तर दागिने मोडून, व्याजाने पैसे काढून घेतो. मात्र घर बांधतो. त्यावर महापालिकेची परवानगी घेतली नाही म्हणून त्याच्या स्वप्नांचा अक्षरश: चुराडा करतो. शासकीय प्लॉटवर नागरीक जेव्हा १०X१० ची झोपडी बांधतो, त्या नागरीकाला महापालिका संरक्षण देते. १० वर्षांनंतर त्या व्यक्तीला फुकटात घर बांधून देतो. आयुक्त आल्यापासून ८ लाख स्क्वे.फूटाचे बांधकाम पाडण्यात आले. एकही १०X१० च्या झ ोपडीला हात लावण्यात आला नाही. माझा झोपडपट्टीतील नागरीकांना विरोध नाही. परंतू त्यांच्या नावाखाली पत्र चालू आहे. एक मनुष्य दहा झोपड्या टाकतो, त्याचे भाडे घेतो. अनधिकृत बांधकामांना पाणी, वीज देणार नाही असे म्हणता. तुम्ही माझ्याकडे चला, तुम्हाला दाखवतो, झोपड्यांमध्ये लाईट मिटर बसवून मिळाले असल्याची लोकांच्या नावाची नोंद, कनेक्शन मिळेल. शहरातील नागरीक प्रामाणिकपणे कष्ट करुन घर बांधतो. त्याला थोडी सूट दिलीच पाहीजे. मार्च २०१२ पर्यंतची बांधकामे नियमित करा. मी याप्रकारच्या दुजाभावाचा निषेध करतो. आजची सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.*

**मा.किरण मोटे** *:- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

**मा.महापौर** *:- सभा सोमवार दिनांक ११/०२/२०१३ रोजी दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.*

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक -१२**

**सभावृत्तांत**

**(दिनांक १९.०१.२०१३, २२.०१.२०१३ ची तहकूब सभा)**

दिनांक :- ११.०२.२०१३ वेळ:-दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१३ दिनांक २२.०१.२०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.११.०२.२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख
२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३७. मा.लोंढे गणेश नारायण
३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४१. मा.अपर्णा निलेश डोके
४२. मा.अनंत सुभाष को-हाळे
४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४४. मा.प्रसाद शेट्टी

४५. मा.अविनाश (दाद) टेकावडे
४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४८. मा.शेख अस्लम शैकत
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव
५१. मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.गोफणे अनुराधा देविदास
५७. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५९. मा.महेशदादा किसन लांडगे
६०. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६२. मा.लोंढे शुभांगी संतोष
६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८. मा.पालांडे सुजाता सुनिल
६९. मा.बहल योगेश मंगलसेन
७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७१. मा.कदम सदगुरु महादेव
७२. मा.गिता सुशील मंचरकर
७३. मा.कैलास महादेव कदम
७४. मा.छाया जगन्नाथ साबळे
७५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७६. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७७. मा.आसवानी सविता धनराज
७८. मा.वाघेरे सुनिता राजेश
७९. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
८०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८३. मा.काळे विमल रमेश
८४. मा.पाडाळे निता विलास
८५. मा.विनोद जयवंत नढे
८६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८८. मा.विमलताई सुरेश जगताप
८९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९०. मा.बारणे निलेश हिरामण
९१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९२. मा.अप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९३. मा.बारणे माया संतोष
९४. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९६. मा.कलाटे स्वाती मयुर
९७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९८. मा.चौंधे आरती सुरेश
९९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१००. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०१. मा.जवळकर वैशाली राहुल
१०२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०३. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०५. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०८. मा.जम सोनाली पोपट
१०९. मा.प्रशांत शितोळे
११०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१११. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११२. मा.गायकवाड संध्या सुरदास
११३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११४. मा.शेंडगे आशा सुखदेव
११५. मा.मोटे किरण बाळासाहेब
११६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११७. मा.संजय केशवराव काटे
११८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१२०. मा.पाटील सुजित वसंत
१२१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

*याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.पवार, मा.कुलकर्णी,मा.दुरगूडे-सहा.आयुक्त,मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.गायकवाड-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.पवन सावळे-अति वैद्य.अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे, मा.इंगळे, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.लडकत,मा.दांगट,मा.कुलकर्णी,मा.पिरजादे-कार्य. अभियंता, मा.भोसले-प्रशा.अधिकारी, शिक्षण मंडळ, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.चव्हाण-आरोग्य कार्य.अधिकारी, मा.पवार-प्र. कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.*

-----------

**मा.महापौर** :- *उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.*

**मा.शमीम पठाण** :- *मा.महापौर साहेब, आज या सभेमध्ये पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकामांवर हातोडा पडून बेघर होणार या काळजीत असलेल्यांना माणुसकीच्या दृष्टीकोणातून निर्णय घेऊन याचा विधानसभेत अध्यादेश पारित करण्याचा निर्णय करणारे केंद्रीय कृषीमंत्री मा.ना.शरद पवार, राज्याचे मुख्यमंत्री मा.नामदार पृश्वीराज चव्हाण व आपले नेते, उपमुख्यमंत्री मा.अजित पवार यांनी एक चांगला निर्णय घेऊन पिंपरी चिंचवड शहरातील, महाराष्ट्र राज्यातील नागरीकांना दिलासा दिलेला आहे. गरीबाचे छप्पर सुरक्षित रहावे म्हणून आदरणीय शरद पवार,राज्याचे मुख्यमंत्री मा.पृश्वीराज चव्हाण,उपमुख्यमंत्री मा.अजित पवार साहेब यांच्याबरोबर गोरगरीब जनतेसाठी अधिक पुढाकार घेऊन पाठपुरावा करणारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा करुन विषय मंजूर करुन घेणारे आमदार मा.विलास लांडे, मा.लक्ष्मण जगताप, मा.आण्णासाहेब बनसोडे यांचे सर्व सभासदांच्या वतीने व पिंपरी चिंचवड शहर वासियांच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करते. हा अभिनंदनाचा ठराव महापालिका सभेत संमत व्हावा अशी विनंती करते.*

**मा.तानाजी खाडे** :- *मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे.*

**मा.श्रीरंग बारणे** :- *मा.महापौर साहेब, मला कळत नाही सदस्यांकडून कशाला धाई होते आहे. राज्य शासनाच्या वतीने आत्तापर्यंत कोणत्याही प्रकारचा अध्यादेश जारी केलेला नाही. राज्याचे मुख्यमंत्री सन्मा.पृथ्वीराज चव्हाण यांनी प्राधिकरणात झालेल्या कार्यक्रमाच्या ठिकाणी जाहीर केले की, या राज्यातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न*

केवळ पिंपरी चिंचवड पुरता नसून संपूर्ण राज्यातील अनाधिकृत बांधकामांचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात येत्या ८ दिवसांत अध्यादेश जारी होईल. त्यानंतर निश्चितपणे आम्हीदेखील विचार केलेला होता की, संबंधित कोणी असेल त्याचे अभिनंदन शहराच्या जनतेच्या वतीने नक्कीच करु. परंतू अध्यादेश जारी होत असताना त्यातून काय बाहेर येते आहे, ते देखील पाहीले पाहीजे. अशा प्रकारची घाई करुन ८ लाख स्क्वे.फूटाच्या बांधकामामध्ये जे गरीब भरडले गेलेले आहेत. त्यांना न्याय मिळतो का काय त्यांना न्याय मिळाला पाहीजे. सभागृहात आपल्याकडून सगळ्या गोष्टींना घाई होते आहे. मागील बैठकीत तशीच घाई झाली. बांधकामे पाडण्याबाबत अशीच घाई झाली. अध्यादेश न करता अभिनंदनाचा ठराव मांडतोय हे कुठेतरी चुकीचे होते आहे. अशा प्रकारचे वातावरण यांना माहित नव्हते का. माहिती झाल्यानंतर फ्लेक्स लावून लोकांनी यांचे जाहीर अभिनंदन केले. या शहरात अनाधिकृत बांधकामांचा प्रश्न लोकप्रतिनिधी या नात्याने सर्वांनी उचलून घेतलेला आहे. शहरातील गरीब नागरीकांना न्याय मिळावा ही सर्वांची भावना आहे. आम्हीदेखील त्यावेळी रस्त्यावर उतरलो होतो. राज्याच्या सत्ताधारी पक्षात असणा-यांना कळावे, ही भावना कळावी म्हणून कधी नव्हे तेवढे नागरिक रस्त्यावर उतरले होते. त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. सर्वसामान्य मनुष्याला न्याय देण्यासाठी अशा प्रकारचा कायदा करावा लागतो. उल्हासनगरमध्ये सुद्धा अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी राज्य शासनाने २१ एप्रिल २००६ रोजी अध्यादेश पारित केला होता. त्यावेळी उल्हासनगरची सगळी घरे होती. त्यांना अधिकृत करण्यात आले. संरक्षण मिळण्याच्या दृष्टीकोणातून शहरात जेवढी बांधकामे होती, त्यासंदर्भात ती रेग्युलाईज झाली पाहीजेत. नाहीतर तुम्हाला एक कोटी, पन्नास/साठ लाखांची मशीन्स घ्यावी लागतील. वरचे दोन मजले अनाधिकृत असतील तर एकच मजला अधिकृत असेल तर तो कापावा लागेल. अति घाई संकटात जाई ! घाई करुन गोरगरीब नागरीकांची घरे पाडली आहेत. तुम्ही निर्णय घेताना बांधकाम करण्याच्या नियमावलीत देखील काही प्रमाणात सवलत देऊन बांधकामे रेग्युलराईज झाली पाहीजेत. शेड बांधून शहर राहणार आहे. प्रामुख्याने या शहरात जी बांधकामे झालेली आहेत, ती होत असताना ३१ मार्च २००० पूर्वीची बांधकामे आहेत, ती नोंदवलेली नाहीत. करसंकलन विभागात नोंदवण्यात आलेली नाहीत. एक मजला नोंदवल्यानंतर दोन मजले जे अनाधिकृत आहेत ते पाडणार का. त्यासाठी राज्य शासन अध्यादेश काढणार आहे का. आज रोजी चोरुन पाण्याचे मिटर घेतलेले आहेत. लाईट दुस-याच्या नावावर आहे. घर तिस-याच्या नावावर यावर काय करणार. पाडापाडी यंत्रणा प्रशासनाच्या माध्यमातून चालू ठेवणार. या त्रुटीदेखील आपण पाहिल्या पाहीजेत. घाई होते आहे. कोणीही कोणाला घाई करुन चालणार नाही हा प्रश्न मार्गी लावत असताना सभागृहाने सर्वांना पाठबळ देण्याचे काम केलेले आहे. प्रस्न मार्गी लावला नाहीतर राज्य शासनाचे देखील या प्रश्नाकडे लक्ष लागावे या दृष्टीकोणातून आम्ही देखील तमाम नागरिकांना रस्त्यावर आणून राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे. राज्य शासन यासंदर्भात जोपर्यंत निर्णय घेत नाही, तोपर्यंत अशा प्रकारचा उतावळेपणा योग्य नाही. महापालिकेची सर्वसाधारण सभा २० फेब्रुवारीला होणार आहे. सात दिवसांत जी.आर. काढणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी जाहिर केलेले आहे. जाहीरपणे

*कालसारखे केले तर, माझ्या पक्षाने सांगितले आहे, राज्य शासनाकडून प्रश्न मार्गी लावला नाहीतरी तुम्ही अभिनंदन करत असाल तर आम्हीदेखील त्यांचे अभिनंदन करु हे जाहीरपणे सांगितले आहे. सभागृहात राज्य शासनाकडून कोणताही अध्यादेश निघालेला नाही. मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे सांगितलेले आहे, आठ दिवसांत अध्यादेश जाहीर करु. आपली २० तारखेला सर्वसाधारण सभा होणार आहे, त्यात असा विषय करु. हा ठराव ८ दिवस पुढे ढकलला तरी चालेल. हा आततायीपणा होतो आहे. अध्यादेश पारित होत असताना त्रुटी राहणार आहेत. ज्यांनी बांधकाम केले त्यांना पुढे भविष्यात पाडावे लागणार नाही. बरेचसे नागरिक कोर्टात गेले आहेत. कोर्टाकडून याचिका फेटाळली गेली आहे. आयुक्त व संबंधित अधिकारी सांगतील, कोर्टाचे निर्देश आहेत. कोर्टाने सांगितलेले आहे. जी बांधकामे न्यायालयात गेलेली आहेत, त्यांचा निकाल वर्षात दिलेला आहे. आत्ता अभिनंदनाचा ठराव करताय. सभागृहात हे अतिशय चूकीचे होते आहे. तुमचे बहुमत आहे, त्याच्या जोरावर आत्ताच बाशिंग बांधताय. उद्या २० तारखेला महापालिका सभा आहे. त्यात हा अभिनंदनाचा ठराव घ्यावा. या सभागृहात मा.मंगलाताई कदम, मा.योगेश बहल यांच्यासारखे ज्येष्ठ सहकारी आहेत. आपण देखील ज्येष्ठ सहकारी आहात. चुकीचा ठराव अशा पद्धतीने मांडू नका. ठरावाला विरोध नाही. आत्ता चुकीच्या पद्धतीने ठराव होतो आहे. तो होत असताना याला प्रामुख्याने शिवसेनेच्या वतीने विरोध करीत आहे.*

**मा.योगेश बहल** *:- मा.महापौर साहेब, प्रश्न मार्गी लागावा. सर्वच पक्षांच्या नगरसेवकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. पठाणताईंनी अभिनंदनाचा ठराव मांडला असला तरी त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आप्पांनी उल्लेख केल्याप्रमाणे उद्या असा अध्यादेश निघत असताना त्यात त्रुटी राहू शकतात. परत रस्त्यावर यावे लागते का. तुम्ही आमदारांची मदत घ्यावी. पुढे काय. उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांच्याकडे जावे लागते. ३१ मार्च ही तारीख identify करत असताना काम सुरु केलेले आहे. नोंद केलेली आहे का. कागदपत्रांची छाननी त्यापलिकडे कायद्यामधील दुरुस्ती करावी लागणार आहे. हा सर्व विचार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी केलेला आहे. जकातीचा महत्वाचा जिव्हाळाचा प्रश्न असल्यामुळे तो जीवनावश्यक ठरणार आहे. डी.सी. रूल मध्ये नेमके साईड मार्जिनमध्ये लिटीगेशन, टी.डी.आर. लोड होणार आहे का,एफ.एस.आय. देणार आहात, काय नियम असणार आहे. यात अनेक गोष्टी आहेत. अनेक नेत्यांनी, सर्व पक्षांनी त्यात भाग घेतलेला आहे. एकदाही जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून याचिका मांडली आहे. हरकत नाही. अभिनंदन अजून जोरात करु. या विषयावरुन सभागृहात वाद नको आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी इथे आहोत. प्रश्न चांगल्या पद्धतीने कसे सोडवता येतील. सत्ताधारी म्हणून इथे आहोत. कबूल केलेले आहे. स्वत: अभिनंदन करतील, सगळे करतील. अध्यादेश येईपर्यंत थांबलोय, हरकत नाही असे मला वाटते.*

**मा.महापौर** *:- अध्यादेश येईपर्यंत हा अभिनंदनाचा ठराव मागे घेण्यात येत आहे.*

**मा.उल्हास शेट्टी** :- *मा.महापौर साहेब,दापोडी परिसरातील एम.एस.काटे परिवारातील ज्येष्ठ माता कै.श्रीमती जिजाबाई ज्ञानोबा काटे यांचे ५ फेब्रुवारी २०१३ रोजी निधन झाले. तसेच कै.श्री.उत्तम ज्ञानोबा काटे, कै.श्री.जयवंत बाळा काटे व चिंचवड येथील कै.प्रल्हाद धोंडिबा चिंचवडे यांनाही सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी.*

**मा.संजय काटे** :- *अनुमोदन आहे.*

**मा.महापौर** :- *सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.*

*(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)*

## प्रश्नोत्तरे

**मा.कैलास कदम** :- *मा.महापौर साहेब, मी विचारलेल्या प्रश्नांसंदर्भात काही उत्तरे दिलेली आहेत. आत्तापर्यंत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला किती नोटीसा बजावल्या आहेत या संदर्भात प्रश्न आहे. दुसरा प्रश्न आहे की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने बजावलेल्या नोटीसांवर काय कारवाई केली. तिसरा प्रश्न होती की, कारवाई केली नसेल तर त्याची कारणे काय? याठिकाणी चूकीची उत्तरे दिलेली आहेत. सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकच नोटीस बजावली असल्याचे उत्तर देण्यात आलेले आहे. २ वर्षांच्या कालावधीत काही कंपन्यांना नोटीसा बजावल्या आहेत असे नमूद केलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला विचारण्यात आले असता त्यांनी मला सविस्तर माहिती दिलेली आहे. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील केमिकल कंपन्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. एकूण १५ कंपन्यांना नोटीस बजावल्या असल्याचे त्यांनी कळवले आहे. या सगळ्या केमिकल कंपन्यांना महापालिकेच्या अखत्यारीत आहेत. सगळ्या कंपन्यांमधील सांडपाणी पवना नदीत जाऊन मिळते. कोणत्याही कंपनीवर महापालिकेच्या पर्यावरण खात्याने कारवाई केलेली नाही. कंपन्याचे सांडपाणी पवना नदीमध्ये येऊन नदी पूर्णपणे जलप्रदूषित झाली आहे. नदीचे बंधारे प्रदूषित झाले आहेत. अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. कचरा उचलण्यासाठी, विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीही पाऊले उचलली गेलेली नाहीत. कारखान्यातून नदीत सांडपाणी सोडले जात असले तरी त्यावर देखील कोणतीही कारवाई केलेली नाही. जवळपास सगळ्या पिंपरी चिंचवड भागात मटणाची दुकाने, कत्तलखाने असतील. आयुक्तांनी कत्तलखाना हलवण्याची एवढी घाई केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीस बजावली, ताबडतोब कत्तलखाना हलवा. गेली ५० वर्षांप ासून तेथे काम चालू होते. त्याठिकाणी गाय हत्या होत नव्हती हे ठामपणे सांगतो. डॉ.गोरे मनपाचे डॉक्टर हे सगळ्या गोष्टींची माहिती घेत आहेत. शेतक-यांच्या माध्यमातून रितसर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून तिथे येते आहे. बी.पी.एम.सी. अॅक्टनुसार कत्तलखाना असावा अशी तरतूद आहे. ते उपजिविकेचे साधन आहे त्यावरच गदा आणली आहे. दरवर्षीच्या बजेटमध्ये कत्तलखान्यासाठी रु.९ लाखांची तरतूद करतो.*

*याबाबी समोर असतानादेखील जवळपास ३,००० कुरेशी समाजाची कुटूंबे रस्त्यावर आली आहेत. यात दोष कोणाचा आहे. कुरेशी समाजाचे लोकांची उपजिविका याच व्यवसायावर आहे. आयुक्तांनी कोणाच्या सांगण्यावरुन ते बंद केले. खडकी इथून मांस आणतात. संपूर्ण कुटूंब उद्धवस्त झाले आहे. रस्त्यावर आलेले आहे. त्यांच्या उपजिविकेचे साधन काढून घेतले आहे. ज्या समाजावर निश्चित अन्याय केला असेल तर त्या समाजाचे कुठेतरी स्थलांतर केले पाहीजे. योग्य ठिकाणी जागा द्यायला पाहीजे आहे. त्याप्रमाणे संबंधित कत्तलखाना बंद करायला पाहीजे होता. प्रदूषण खात्याने कोणती कारवाई या माध्यमातून केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रदूषणाची किती टक्केवारी आहे. डायरेक्ट नोटीस आली. संघटनेने आवाज उचलला. कोणाचा दबाव आहे. पिंपरी चिंचवड मनपातील सुत्रे आयुक्तांनी स्विकारली त्यावेळी जी कामे केली. त्यांना काय अधिकार आहे, कोणत्याही समाजाला रस्त्यावर आणायचा. त्यांना हा प्रश्न विचारायचा आहे. आज याठिकाणी आयुक्त नाहीत. त्याऐवजी अतिरिक्त आयुक्त, श्री.अशोक कदम इथे आहेत. विभागाचे डॉ.गोरे यांनी याविषयी संपूर्ण माहिती द्यावी. ताबडतोब कारवाई का केली,कुरेशी समाजावर अन्याय का केला, कच-याची विल्हेवाट कशी लावता. पिंपरी चिंचवड मनपात किती टक्के प्रदूषण आहे याची माहीती देण्यात यावी अशी ठामपणे मागणी करतो. एखाद्या समाजाचे उपजिविका साधन देशाच्या घटनेत दिले गेलेले आहे. तरी याठिकाणी ते साधन हिसकावून घेतले असेल तर अधिका-यांवर तुमच्या माध्यमातून गुन्हा दाखल झाला पाहीजे. त्यांचे स्थलांतर करत नाही तोपर्यंत त्यांना व्यवसाय करुन देणे योग्य नाही. करत असाल तर किती दिवसांत करणार याविषयी सांगावे.*

**मा.महापौर** *:- संबंधित अधिका-यांनी माहिती द्यावी.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, सन्मा. सदस्य, पिंपरी चिंचवडमधील कत्तलखाना बंद करण्याविषयीचे उत्तर डॉ.गोरे देतील. नवीन कत्तलखान्यासाठी जागा निश्चित करण्याचे काम नगररचना विभागाकडून चालू आहे. त्याप्रमाणे नवीन कत्तलखाना बांधण्याविषयीची कार्यवाही करण्यात येईल.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, मोशी कचरा डेपो, गांडूळ खताविषयी सगळे सांगा. पर्यावरण विभागात तुम्ही किती वर्षांपासून तिथे आहात.*
**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, सन्मा. सदस्य, दीड वर्ष झाले आहे.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, सगळीकडे पडताळणी केली नाही.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, सन्मा. सदस्य, २००६ मध्ये आरोग्य विभागाचे अधिका-यांमार्फत कंपोस्टींग प्लाण्ट, गांडूळ खत प्रकल्प, प्लास्टीक*

*लॅण्ड फिलिंग, सॅनिटरी लॅण्ड फिलिंग हे प्रकल्प राबविले होते. सदरचे प्रकल्प चालविण्यासाठी २०११ नंतर आमच्याकडे आले आहेत. मेकॅनिकल कंपोस्टींग प्लाण्टमध्ये राम के. यांनी वेस्ट एन्‍र्जी प्लाण्ट राबवावा, त्याबदल्यात झिरो टी.पी. प्लाण्ट तत्कालीन आयुक्तांनी निर्णय घेतला. रेझिंग एन्‍र्जी प्लाण्ट घ्यायचा नाही म्हणून सदरचा प्रकल्प पुढे चालवावा. नागरीकांच्या विरोध असताना सदरचा प्रकल्प चालविण्यासाठी मनपाकडून निविदा काढण्यात आल्या. त्याप्रमाणे राम के. यांनी कोर्टात धाव घेतली. हायकोर्टाचा ७ ते ८ महिने स्टे होता. सदरचा प्रकल्प चालवला नाही. सदरची निविदा फायनल करुन कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून सदरचा प्रकल्प बी.व्ही.जी. यांची निविदा घेऊन चालविण्यास दिलेला आहे. अशी दुरुस्ती करुन सदरचा प्रकल्प चालू केला. सध्या इथे २५० ते ३०० मेट्रीक टन पर डे कचरा डेपोतून उचलण्यात येता. १ ते दीड टन प्लास्टीक तयार करण्याची यंत्रणा चालू आहे. ३० टन क्षमतेचा कचरा घेतो. २० वर्षांचे एक्सटेंशन करुन जेएनएनयूआरएम २००६-०७ मध्ये मनपातील प्रकल्पात मंडई वेस्ट कच-यावर प्रक्रिया करायचे काम चालू आहे. मनपाने वेस्ट एन्‍र्जी प्रकल्प नंतर राबवण्याचा निर्णय घेतल्याप्रमाणे कोर्टाचा स्टे उठल्यानंतर आर्बिट्रेशनमध्ये केस गेली. राम. के. क्लेम केलेले आहे. सदरचा प्रकल्प पूर्ण होवून चालविला नाही म्हणून मनपाकडून त्याच्यावर दावा केलेला आहे.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, चिखलीमध्ये येणा-या प्लास्टीकची विल्हेवाट लावतात. तेथे प्रदूषणाचा त्रास आहे तो किती टक्के प्रदूषण आहे ते सांगितले पाहीजे.*

**मा.दत्ता साने** *:- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, एम.आय.डी.सी. यांच्या बरोबर आयुक्तांनी बैठक घेतली. त्यावेळी हा मुद्दा झाला होता की, एम.आय.डी.सी. व्यतिरिक्त कारखाने,उद्योगधंदे चालू आहेत. कुदळवाडी भागात अनाधिकृत केबल जाळून दुस-या प्रकारचे व्यवसाय चालतात. यावर कोणी कारवाई केली पाहीजे. याविषयी चर्चा झाली त्यावेळी अनाधिकृत बांधकामांबद्दल महापालिकेने केलेली यादी द्यावी. पोलिसांमार्फत, पॉल्युशन कंट्रोल बोर्डाकडून कारवाई होईल. त्याप्रकारे कुदळवाडीच्या एम.आय.डी.सी. कडून ध्वनी प्रदूषण व जलप्रदूषण होते आहे. त्यावर कारवाई करायची आवश्यकता आहे.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जेवढे कारखान्यांबाबत कळवले आहे, यासंबंधी कंपन्यांचा त्रास होतो आहे असे कळवले आहे का.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, सन्मा.सदस्य, पर्यावरण विभागाकडून प्रस्ताव ठेवला आहे. नाले नदीला येऊन मिळतात. नदी ज्या भागातून वाहते, तेथे त्यात सांडपाणी मिसळते त्याचे टेस्टींग करुन कोणता नाला कोणत्या मार्गाने व्हॅल्यूएशनमध्ये येता त्याचे टेस्टींग चालू केलेले आहे. त्यानुसार त्याची यादी करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवली. प्रत्यक्ष बैठकीत यावर चर्चा झाली*

आहे. आयुक्तांनी स्वत: सांगितले आहे, लिक्विड इक्विडेशन रासायनिक द्रव्ये त्यावर कंट्रोल करणारा कंपनी ट्रिटमेंट प्लाण्ट एम.आय.डी.सी.मध्ये नाही. हॅजरडस घटकांवर प्रक्रिया केली जात नाही. याविषयी प्रश्न आहे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने सदरचा प्लाण्ट, कंपनी व्हॅल्यूएशन याविषयी जागा निश्चित झालेली आहे. सरकारचे फायनल अनुमोदन मिळाले आहे. MCCI कडून CETP लवकरात लवकर करण्याविषयी महापालिका त्यांच्या मागे आहे.

**मा.कैलास कदम** :- मा.महापौर साहेब, महापालिका क्षेत्रात ज्यावेळी एम.आय.डी.सी. झाली, त्यावेळी रोजंदारी नव्हती. सध्याची परिस्थीत पाहता लोकसंख्या जास्त आहे. एम.आय.डी.सी.मध्ये केमिकल कंपन्या आहेत, त्यासंदर्भात ठोस पाऊले उचलावीत. नगररचना विभागाच्या माध्यमातून व्यावसायिक विभाग बंद करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून नोटीस आली का त्यासंदर्भात काय करता येईल हे नगररचना विभागाने सांगावे.

**मा.भदाणे** (उपसंचालक,नगररचना) :- मा.महापौर साहेब,सदस्यांनी विचारलेला दुकाने, गाळे बंद केली, कत्तरखान्यांसंदर्भात हा प्रश्न असावा. डाल्को कंपनी एच.ए. च्या जागेत कत्तलखान्याची जागा फिक्स केली होती. प्रस्ताव केला होता. जाहीर सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यानुसार त्यावेळी आलेल्या सूचना हरकतींवर सुनावणी झालेली आहे. प्रशासकीय काम चालू आहे. शासनाकडे सादर करणार आहोत. शासनाकडून मंजूरी आल्यानंतर जागा ताब्यात घेण्यात येईल.

**मा.कैलास कदम** :- मा.महापौर साहेब, शासनाकडून ज्यावेळी मान्यता येईल तोपर्यंत या लोकांचा रोजगार हिरावून घेतला आहे. त्याला जबाबदार कोण आहे. महापालिकेने कत्तलखाना बंद करायचा निर्णय घेतला, जवळपास दोन हजार कुटूंबांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली त्याचे उत्तर द्यावे. जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याचा आदेश द्यावा.

**मा.डॉ. गोरे** (पशुवैद्यकीय अधिकारी) :- मा.महापौर साहेब, दि.८/१२/२०१२ रोजी कत्तलखाना पूलाखाली नेण्यात आल्यामुळे बंद करण्यात आले आहे. यापूर्वी देखील असा बंद करण्यात आला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या काही अटी-शर्ती लागू असताना निश्चित चालू केला होता. ६ महिन्यांत योग्य जागी हलवणार होतो. काही विरोधांमुळे जागा निश्चित करता आली नाही. पुन्हा नव्याने जागा निश्चित करत आहोत. तोपर्यंत स्थानिक व्यावसायिकांना खडकी कंटोन्मेंट इथून रोजच्या मांसाची गरज भागविता येईल. त्याप्रमाणे परवानगी आणता येईल. त्याप्रमाणे मांस विक्रीचे काम चालू आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपसचिव यांना पत्र पाठविले आहे. उल्लेख केलेला आहे. कत्तलखाना चालू ठेवण्यास निश्चित मान्यता येईल. अटी-शर्ती

*तांत्रिक सूचना असतील तर तांत्रिक सल्ला द्यावा व त्याचे पालन करुन निश्चित पिंपरी पूलाखाली चालू करण्यासाठी पाठपुरावा व्हावा. त्याला निश्चित मान्यता येईल.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, दोन अडीच महिन्यांपासून व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये तरतूद आहे. त्यासाठी बजेटमध्ये भरीव तरतूद ठेवतो. एकप्रकारे सभागृहाची दिशाभूल करत आहात. एकीकडे कत्तलखाना पुन्हा चालू करायचे सांगताय. तुमच्याकडे जागा उपलब्ध नाही माहित आहे. त्याचे स्थलांतर कोणी केले त्यांच्यावर बंदी कोणी आणली. तुम्हाला विनंती आहे, आजपासून आदेश काढायला लावा, त्यांचा व्यवसाय जिथे चालू होता तिथेच चालू राहील. ज्यावेळी दुस-या जागेसाठी राज्य सरकारकडून मान्यता येईल, त्यावेळी कत्तलखाना तेथून स्थलांतरीत होईल. त्यावेळीच तो इथून बंद करावा असा मा.महापौर साहेबांनी आदेश द्यावा.*

**मा.डॉ.गोरे** *(पशुवैद्यकीय अधिकारी) :- मा.महापौर साहेब, कदम साहेबांनी प्रश्न विचारला आहे त्याच्या अनुषंगाने सांगू इच्छितो. पूलाखाली मांस विक्रि व्यवसाय चालू आहे. कत्तलखान्यासाठी परवानगी असावी म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना विनंती केली आहे. त्यांचा अभिप्राय व्यक्त होईल या अनुषंगाने काही सुधारणा तिथे करुन पूर्वीप्रमाणे कत्तलखाना सुरु होईल. त्यांच्या अभिप्रायासाठी थांबलो आहोत. कत्तलखाना बंद करण्याबाबत त्यांच्या सूचना होत्या. ही जागा गैरसोयीची आहे. DTP Plan हा एकच विषय नव्हता.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, गेली ५० वर्षांपासून कत्तलखाना तिथे सुरु आहे. ही जागा योग्य नाही हे आत्ता स्वप्न पडले का.*

**मा.डॉ.गोरे** *(पशुवैद्यकीय अधिकारी) :- मा.महापौर साहेब, ७/८ जागा सूचवल्या होत्या. पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांनुसार जागा होत्या. स्थानिक ठिकाणांतून विरोध झाल्यामुळे कत्तलखान्याची जागा निश्चित होऊ शकली नाही. रकमेचे नियोजन करु शकलो. चांगला प्रकल्प नवीन जागेसाठी होपफुल आहोत.*

**मा.कैलास कदम** *:- मा.महापौर साहेब, सगळी उत्तरे देताय. चुकीच्या पद्धतीने दिशाभूल करणारी उत्तरे आहेत. आपल्याला अधिकार आहे. आपण सगळ्यांना आदेश द्यावा, त्याठिकाणी कत्तलखाना सुरु करावा. राज्य सरकारकडून प्रक्रिया पूर्ण होईल, त्यावेळी तो त्या नवीन जागेत सुरु करावा असा आदेश द्यावा.*

**मा.महापौर** *:- आपण तसा आदेश त्यांना देऊ.*

**मा.योगेश बहल** :- *मा.महापौर साहेब, याठिकाणी पर्यावरणाची जी काही उत्तरे दिली आहेत,त्यात म्हटले आहे. शहरातील एकूण ३२ नाले, ओढे मिळून नदीला जोडले आहेत. फक्त व्हॅल्यूएशन दिले. यापेक्षा त्यांनी प्रत्यक्ष तपासले तर महापालिकेच्या ठेकेदारांकडून अधिका-यांकडून कितीतरी ठिकाणी ड्रेनेज लाईन नद्यांना जोडलेल्या दिसतील. त्यावर काय कारवाई करताय. इतर कारखान्यांकडून नदीमध्ये धाणपाणी सोडण्यापूर्वी खबरदारी घेण्यापूर्वी, आपल्या अधिका-यांनी, ठेकेदाराने नद्यांना डायरेक्ट ड्रेनेज लाईन जोडल्या आहेत. किती ठिकाणी असे घेतले आहेत याची माहिती आम्हाला पाहीजे. यांचे संरक्षण केलेले आहे. मी डायरेक्ट त्याठिकाणी जाऊन दाखवू शकतो. शहरात धाण दुर्गंधी पसरली आहे. आजार, रोगराई पसरते. याचे उत्तर अपेक्षित आहे. बंदी केली पाहीजे हा नंतरचा विषय आहे. स्वत:च नदी खराब करत आहोत. याबद्दल काय कारवाई करत आहोत. दाय-ईची संत तुकाराम नगरला लागून स्टेट बँक नगरच्या मागे खडकी कंटोनमेंट शहराचा कचरा डम्प केला जातो. कोणाकडून परमिशन आहे. २ वेळा उत्तर दिले. आरोग्य विभाग म्हणतो पर्यावरण विभागाला कळवले आहे. हे त्यापेक्षा भयंकर आहे. आरक्षणे ताब्यात घेत नाहीत. त्या परिसरातील लोकांच्या आरोग्याला हानीकारक आहे. संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरते. त्या कचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही. फक्त डम्प केले जाते. त्याठिकाणी काहीच ॲक्शन घेत नाहीत. त्यापेक्षा टनेल रोडमध्ये कशी काय परमिशन देतो. किती नोटीसा पाठवल्या. ताबडतोब कोणी बंद करत नाही. महापालिका ॲक्शन का घेत नाही. याचा सुद्धा आम्हाला खुलासा पाहीजे. भरवस्तीत खडकी कंटोनमेंट बोर्डाचा कचरा दाय-ईची कंपनीच्या मागे टाकतात त्याचा मी स्वत: पाठपुरावा करत असताना त्यावर कोणतीही ॲक्शन होत नाही.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता)* :- *मा.महापौर साहेब,मा.योगेश बहल यांनी प्रश्न विचारला. नाला डायमेंशनबद्दल काय काय केले. ६ मेजर नाल्यांपैकी ५ मेजर नाले STP ला जोडलेले आहेत. वाल्हेकरवाडी ते चिंचवड गोयल पार्क इथून एक लाईन टाकून तिथे एकत्रित करुन STP ला जोडलेले आहेत. याशिवाय नाले डायरेक्ट नदीत जोडताना त्याचे सर्वेक्षण करुन एक ते दोन वर्षांत बजेट करुन सगळे नाले STP ला डायव्हर्ट करण्याचा प्रयत्न करणार आहोत.*

**मा.योगेश बहल** :- *मा.महापौर साहेब, किती छान उत्तर मिळाले आहे. नेहरुनगर, संत तुकाराम नगर इथे दाखवू शकतो नाला डायरेक्ट नदीला जोडलेला आहे. यापेक्षा मोठा पुरावा तुम्हाला कोणता पाहीजे. २ वर्षे यासाठी लागणार असतील तर काय करायचे. पर्यावरण अहवालात याची नोंद झालेली आहे का. अशा प्रकारे चव्हाण यांनी उत्तर दिलेले आहे. वस्तुस्थिती भयंकर आहे. लाईन नाही तिथे बदलू शकतो. जिथे जोडलेले आहे तिथे ताबडतोब तोडले पाहीजे. ड्रेनेज विभागाने केलेले नाही मग उद्या या दाखवतो.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, ड्रेनेज विभागाकडून ड्रेनेजचे पाणी नदीला जात नाही. लोकांकडून जोडलेल्या STP मध्ये ड्रेनेज घेतो. दोन वर्षात १००% सुवेज ट्रिटमेंट घेणार आहोत.*

**मा.योगेश बहल** *:- मा.महापौर साहेब, आरोग्य प्रमुख किंवा पर्यावरण प्रमुख यांनी सांगावे. खडकी कंटोनमेण्ट बोर्डाच्या डेपोबद्दल कारवाई का झालेली नाही. काही कंपन्यांना नाही म्हणायची धमक राहीलेली नाही.*

**मा.चव्हाण** *(आरोग्य) :- मा.महापौर साहेब, खडकी कंटोनमेंट बोर्डाचा डेपो पिंपरी चिंचवडच्या हद्दीत गेली ४० वर्षांपासून आहे. नगरवस्तीत सध्या आल्यामुळे त्यांना नोटीस दिलेली होती. नोटीसीला उत्तर पाठवले आहे, हा डेपो ४० वर्षांपासून असल्यामुळे शासनाकडून पर्यायी जागा उपलब्ध झाल्यानंतर व्यवस्था करु. आयुक्तांनी २/३ मिटींगा घेतल्या. कंटोनमेंट बोर्डाचे ब्रिगेडीयर, वाईस प्रेसिडेंट,एक्झिक्युटीव्ह ऑफीसर यांना बोलवले. पत्रव्यवहार केला. तारीख मिळत नाही असे २ ते ४ वेळा झाले. पत्रांना उत्तर दिले. कंटोनमेंट बोर्डाला कच-यासाठी पर्यायी जागा मोशी डेपो येथे द्यावी यासाठी २९ लाखांची गाडी घेण्यासाठी आपल्या महापालिकेने पैसे द्यावेत,दरवर्षी खर्चासाठी २६ लाख द्यावेत अशा त्यांच्या मागणीचे निवेदन त्यांनी दिले आहे. आयुक्तांकडे प्रस्ताव ठेवला आहे. कंटोनमेंट बोर्डचे ब्रिगेडीयर व महापालिका आयुक्तांच्या लेवलवर चर्चा करुन तोडगा काढावा इथपर्यंत झालेले आहे. यावर सर्वानुमते तोडगा काढावा. या स्टेजपर्यंत आपण आत्तापर्यंत आलेलो आहोत.*

**मा.आर.एस.कुमार** *:- मा.महापौर साहेब, या विषयावर बोलायचे असेल तर तासभर लागेल. एकतर पर्यावरण विभाग सुरु होऊन एक वर्ष झाले का ते पहिल्यापासून होते. ५/६ वर्षांचा अहवाल प्रसिद्ध केला. फक्त ॲडीशनल चार्ज म्हणून डॉ.नागकुमार यांच्याकडे हा विभाग होता. गेले वर्षापासून हा विभाग आहे असे म्हणणे चूकीचे आहे. दुसरे म्हणजे ४ नंबरचे उत्तर बधा. विभागाकडून जबाबदारीचे उत्तर आहे का. प्रत्यक्ष कामाचे स्वतंत्र उत्तर द्यायला पाहीजे. यात प्लास्टीक कच-यापासून पेट्रोल तया करण्याचा प्रकल्प आहे. ६ ते ७ वर्षांपासून Ramco प्रकल्प बंद झाला. त्यापासून पेट्रोल, डिझेल मिळते का? काय-काय केले. प्रोजेक्टमधून रोज पेट्रोल मिळते का? Ramco प्रोजेक्ट बंद केला मग हा प्रोजेक्ट का बंद केला नाही. किती पैसे दिले, मला प्रश्नाचे उत्तर पाहीजे आहे. प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही म्हणून उत्तर बरोबर दिलेले नाही. २ / ३ वर्षात पेट्रोल प्रोजेक्टमध्ये काय झाले तो बंद का केलेला नाही. आम्हाला टर्मस् आणि कंडीशन्स् दाखवल्या होत्या, त्यात ६/७ वर्षात महापालिकेचे ५०% पेट्रोल,डिझेल चा पुरवठा हा प्रोजेक्ट करेल असे सांगितले होते. या प्रोजेक्टमधून किती टक्के सप्लाय होतो त्याबद्दल पूर्ण माहिती द्यायला सांगा.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, मा.आर.एस.कुमार यांनी प्रश्न उपस्थित केला. प्लास्टीकपासून इंधन निर्मिती करण्याबद्दल आहे. सदरचा प्रकल्प मनपाच्या वतीने नि.नो.क्र. ६१७ मध्ये उपस्थित करण्यात आलेला आहे.*

*( मा.संजय कुलकर्णी (कार्य.अभियंता,पर्यावरण) यांनी फाईल वाचून दाखवली.)*

*या प्लास्टीकपासून निर्माण होणा-या पेट्रोल, डिझेल चे प्रमाणे ईक्विवॅलण्ट नसल्यामुळे ते ऑटोमोबाईल्समध्ये वापरायला परवानगी नसल्यामुळे ते गाड्यांमध्ये वापरले तर त्याची गॅरंटी देता येणार नाही. म्हणून त्याचे टेस्टींग लेटेस्ट टेक्नॉलॉजी वापरुन करणार आहोत. जे.सी.बी. सारख्या मोठमोठ्या मशिन्ससाठी वापरतात. २ कोटी रक्कम मिळू शकते ते प्लास्टींकच्या क्वालिटीवर अवलंबून आहे. १ टन प्लास्टीकपासून ६०० ते ७०० लिटर डिझेल तयार होईल. प्लास्टीकचे सेग्रेगेशन करुन द्यावे अशी त्यांची मागणी आहे. आपल्याकडे अशी कोणतीही यंत्रणा नसताना करारनाम्यात त्याचा उल्लेख आहे.*

**मा.आर.एस.कुमार** *:- मा.महापौर साहेब, कचरा जमा होतो तो निवडून घेणार. त्यामधून पेट्रोल घेणार असे तुम्ही सांगताय ते बाहेरुन आणतो आहोत. चूकीची माहिती देऊन प्रोजेक्ट राबवताय. करारनाम्यात बदल करताय. टोटल फेल्युअर प्रोजेक्ट आहे. १ एकर जागेत २ कोटींचा प्रोजेक्ट केला आहे. टर्मस् कंडिशन्स मधून जे दाखवले ते स्वप्न आहे.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, सदरचा २ कोटींचा प्रकल्प चालू आहे. बी.व्ही.जी. राबवतेय. प्रकल्प ताब्यात घेतल्यापासून मार्च १२ रोजी २ कोटींप्रमाणे होणारी व्याजाची रक्कम, भाडे सगळे वसूल केलेले आहे.*

**मा.आर.एस.कुमार** *:- मा.महापौर साहेब, गाड्यांमध्ये पेट्रोल,डिझेल दोन्ही वापरा असे सांगितले होते. It is not suitable for vehicles. मग आपण हा खर्च का करतोय? ज्यावेळी म्हणत होते, सर्व गाड्यांना प्रायव्हेट कर रेट सुद्धा दिलेला याहे. Project is total failure. म्हणून बंद केला. तुमच्या अपेक्षा नाही आहेत का मग का बंद केला नाही.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, नाही.*

**मा.आर.एस.कुमार** *:- मा.महापौर साहेब, प्लास्टीक बाहेरुन आणतोय असे सांगताय त्यासाठी प्रकल्प केलेला नाही. केमिकल कंपोस्टीक ट्रिटमेंट प्रकल्पाच्या वेळी मनपाच्या घनकचऱ्यापासून प्लास्टीक काढून त्या प्रकल्पासाठी घ्यायचे असे केले आहे. ॲग्रीमेंटमध्ये प्रोव्हिजन आहे. त्यावेळी का टाकले गेले, ते इम्प्लिमेंट केलेले नाही. ते स्वत: प्लास्टीक कचऱ्यातून निवडून घेणार होते. ॲग्रीमेंटमध्ये पूर्ण बदल करताय. कमिटमेंट देताय त्यात फरक आहे. ॲग्रीमेंटमध्ये काय टाकताय ते आम्हाला माहिती नसते. सगळा प्रोजेक्ट फेल्युअर्ड कंडीशनमध्ये आहे. तो सुद्धा बंद करायला पाहीजे.*

*अन्यथा आम्हाला रिझल्ट दाखवा. तुमच्या विभागाच्या उद्दीष्टांमध्ये ७ वेगवेगळी कामे दाखवली आहेत. यासाठी किती स्टाफ पाहीजे, त्यांच्याकडे १/३ सुद्धा स्टाफ नाही, तो कुठे काम करु शकणार आहे. मोबाईल डोअरमध्ये टनेल बसवायचे असते. डिझेल टनेल असते. माझ्या भागात त्याचा वास इतका येतो त्यामुळे प्रॉब्लेम होतो. ते म्हणतात माझ्याकडे प्युअर नाही. एक्सिक्युटीव्ह पाठवला तर एखादा टनेल २४ तासच चालू होतो. आजूबाजूच्या लोकांना प्रदूषण होते ते बंद केले पाहीजे. तुमच्या ऑबजेक्टीव्हमध्ये मनुष्यबळ नसेल तर कशाला टाकताय? नवीन प्रोजेक्ट चालू करताय. घाई असते. करारनामा करेपर्यंत त्याप्रमाणे डॉकेट ठेवले पाहीजे. ॲग्रीमेंटची चॅरीटी झालेली आहे. स्थायी समितीमधून ठराव होण्याआधीच करारनामा तयार असतो. प्रशासन किती विश्वस्त आहे त्याचे हे क्लिअर उदाहरण आहे. I call you cheat us. एक सांगायचे नंतर दुसरेच करायचे.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, मी प्रश्न विचारला होता. महापालिकेत पर्यावरण विभागाची स्थापना कधी झाली. त्याचे उत्तर दिलेले आहे. फेब्रुवारी २०११ पासून आजतागायत या विभागाने काय काय कामे केली याचे सविस्तर उत्तर मिळालेले नाही. याचा खुलासा हवा आहे. वर्ष हवे आहे, तसे सांगायचे आहे.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड मनपामध्ये पर्यावरण अभियांत्रिकी विभागाची स्थापना किंवा स्वतंत्र कार्यकारी अभियंता फेब्रुवारी २०११ पासून स्थापना झालेली आहे. स्थापना करण्यामागे उद्देश पर्यावरण विभाग अभियांत्रिकी विषयक कामकाजाचे नियंत्रण करण्यासाठी तांत्रिक कर्मचारी इथे नव्हते. प्रकल्प राबवण्यासाठी अभियांत्रिकी विभागाचे लोक नव्हते म्हणून अभियांत्रिकी विषयक काम करण्यासाठी विभागाची स्थापना झाली. फेब्रुवारी २०११ मध्ये आदेश आला. त्यामध्ये घनकचरा विभागाच्या प्रोजेक्टस्मध्ये कचरा टाका असे कलेक्टर यांनी सांगितले. रुम भिंती बांधून रस्ता तयार करुन, पाण्यावर योग्य ती प्रक्रिया करुन जल प्रदूषण, मैला शुद्धीकरण प्रकल्प त्यांचे चालन देखभाल व्यवस्था केली जाते.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, मैला शुद्धीकरणाचा प्रकल्प महापालिका स्थापनेपासून उभारला त्याची क्षमता किती आहे.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, याबाबत जलनिस्सारण विभाग सांगेल.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, ३३८ mlt मैलापाण्यापैकी २०० mlt पाणी स्काडा रिपोर्ट प्रमाणे ट्रिट होते.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, ड्रेनेजचे किती पाणी जमा होते.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, २०० ते २१० mlt पाणी ट्रिटमेंट प्लाण्टमध्ये येते. पंपिंग स्टेशनप्रमाणे सॅट्युरेट करतो. स्काडाच्या रिपोर्टप्रमाणे २०० mlt होते.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, स्टॉर्म वॉटर ड्रेनेजमधून किती जमा होते.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, त्याविषयी स्थापत्य सांगेल.*

**मा.कांबळे** *(शहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, स्टॉर्म वॉटर ड्रेनेजबाबत डाटा पूर्ण नाही. त्या-त्या भागातील डिपार्टमेंटप्रमाणे नाले डिझाईन करुन टोटल पाणी नदीला जाते.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, अ,क व ड प्रभागांत अशी स्टॉर्म वॉटर ड्रेनेजची व्यवस्था आहे का.*

**मा.कांबळे** *(शहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, जेथे जेथे गरज असेल त्याप्रमाणे तेथे बांधतो. ते प्रत्येक ठिकाणी लागते.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, त्याची गरज काय आहे.*

**मा.कांबळे** *(शहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, एक्झॅक्ट ठिकाणे सांगितली तरी तसे काढावे लागेल.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, पर्यावरण विभागाने जी उत्तरे दिलेली आहेत. स्थापनेपासून आजपर्यंत या विभागाने आरोग्याच्या दृष्टीने काय पाऊले उचलली आहेत. जलनि:स्सारण, आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग, सर्व विभागांना एकत्र घेऊन इथे मिटींग लावली होती का. ठोस पाऊले उचलली आहेत का याचा खुलासा द्या.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, यामध्ये २/३ महत्वाच्या गोष्टी आहेत. नदी प्रदूषण, नाल्यांचे परिक्षण चालू केलेले आहे. महापालिकेचा ड्रेनेज विभाग, ड्रेनेज लाईन चेंबर यांचे मार्गिकेचे पूर्ण सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे निष्कर्ष काढुन छोट्या छोट्या नलिका काढल्या आहेत. चेंबर फोडलेले आहे. पर्यायी नाला फोडून काही ठिकाणी नदीत जातो. वाटा काढल्या आहेत. ड्रेनेज विभागाला त्यात्या वेळी पाठवले आहे. चव्हाण यांच्याकडे ७ तारखेला मिटींग घेतो. ते बंद करायला पाहीजेत. त्यांच्या विभागाकडून ते कार्यवाही करतात अशा पद्धतीने घनकचरा व्यवस्थापनाबाबत कॅलक्युलेशन पाहीजे. आम्ही घनकचरा आऊटहाऊस तसेच कन्सट डिपार्टमेंट यांच्याबरोबर जॉईंटली मिटींग घेऊन प्रॉब्लेम सोल्युशन काढत असतो.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:- मा.महापौर साहेब, दर महिन्याच्या ७ तारखेला मोहिम राबवली जाते. निवडून आल्यापासून तसे काही बघितले नाही.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, आरोग्य विभागाला ओला कचरा, सुका कचरा सेग्रेगेशन, १५ mm पेक्षा कमी जाडीचे प्लास्टीक वापरू नये. जनजागृतीसाठी उत्पादनावर बंदी घातली. विक्रीवर बंदी घातली. बॅन असलेले प्लास्टीक वापरु नका. त्याच पद्धतीने पिंपरी चिंचवड प्लास्टीक मुक्त करण्याच्या दृष्टीने धोरण ठरवावे. प्रस्ताव आहे . सदरच्या ७ टप्पात काळ्या बॅगा, प्लास्टीक बादल्या मुक्त करण्याचे नियमांत नाही. त्यांना बंदी घालण्याचे धोरण करतोय. अंतिम मसुदा झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणार आहोत.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:-मा.महापौर साहेब, एवढे धोरण नव्हते का.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, उपद्रव शोधक पथकामार्फत आरोग्य विभाग अधिकाऱ्यांमार्फत कारवाई केली जाते आहे. यांच्याकडून २५६ ठिकाणी कावाई केली. २००९ पर्यंत २६० ठिकाणी दंड वसूल केलेला आहे. सर्व प्रभाग अधिकारी आरोग्य कार्यकारी अधिकारी यांना प्लास्टीकवर कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:-मा.महापौर साहेब, हवा प्रदूषणाबद्दल विचारायचे होते. अहवालात सांगितले आहे, रोज गाडी फिरते. मनपाकडून आजपर्यंत कधी गाडी दिसलेली नाही. बी.व्ही.जी. ला काम देण्यात आले आहे. मनपाकडून २ गाड्या आहेत.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, आरोग्य विभागाकडून यांचे काम केले जाते. ध्वनी प्रदूषणाबद्दल मनपात यंत्रणा नाही. त्याबाबत ऑटोमॅटीक एरिया स्टेशन्स केंद्र शासनाच्या माध्यमातून स्तरावर उभारलेली आहे. त्यांचे काम चालू आहे. एरिया पोल्युशन सिस्टीम ५ कि.मी. एरिया मॉनिटरींग आहे. यासाठी पिंपरी चिंचवडमध्ये २ कंपन्या कार्यरत आहेत. २ स्टेशन्स झाल्यानंतर पोल्युशन कंट्रोल काही ठिकाणी स्टॉपवर रेटींग घेतो. हॉट स्पॉट जास्तीत जास्त वायु प्रदूषण होते अशी ठिकाणे आयडेंटीफाय करत आहोत. त्याचे मॉडीफीकेशन चालू आहे.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:-मा.महापौर साहेब, रु.१,६९,००,०००/- खर्च करुन पवना नदीवर कोकण पद्धतीने चिंचवड गावात बंधारा केलेला आहे. माझ्या आधी ज्येष्ठ नगरसेविका मा.शमीम पठाण, मा.आप्पा बारणे यांना सुद्धा माहिती आहे. तिथे होते का नाही हे माहित आहे. साफ चूकीचे उत्तर दिलेले आहे.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, बंधारा चालू झाल्यापासून २००५-०६ मध्ये निविदा केलेली आहे त्याचे उत्तर दिलेले आहे.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:-मा.महापौर साहेब, जलपर्णी काढण्यासाठी १५ लाख खर्च होतो. प्रकल्पात २५ लाखांची तरतूद आहे. त्यात कोणकोणती कामे आहेत.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, नदी सुधार प्रकल्पासाठी २५ लाखांची तरतूद आहे. MCRD च्या माध्यमातून मिनिस्टरी ऑफ एन्वीरॉनमेंट, सेंट्रल गव्हर्नमेंट नॅशनल रिसोर्सेस कन्झर्वेशन डायरेक्टर यांच्या माध्यमातून प्रकल्प राबविण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे. महाराष्ट्र शासनाकडे पाठविल्यानंतर पत्र पाठविलेले आहे. यातील दोन गोष्टींवर मनपा सभेत विषय आहे. ३० टक्के अनुदान महापालिकांना द्यावे. २५ लाख नॉमिनल तरतूद ठेवली आहे. काहीच खर्च केलेला नाही. प्रकल्प जरी झाला तरी त्याप्रमाणे डी.पी.आर. निविदा केंद्र शासनाकडे पाठवली. त्यासाठी तरतूद केलेली आहे.*

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील** *:-मा.महापौर साहेब, तरतूदीचा उपयोग काय झाला?*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्र शासनाने मंजूर करुन केंद्र शासनाकडे पाठवले असते तर त्यासाठी ही तरतूद केली आहे.*

**मा.श्रीरंग बारणे** *:- मा.महापौर साहेब, सभागृहात अधिका-यांनी उत्तर दिल्यामुळे विचारात पडले का ते सांगा. मा.आर.एस.कुमार, मा.योगेश बहल, मा.शमीम पठाण, मा.मंगलाताई, मा.सिमा ताई बरेच ज्येष्ठ सभागृहात आहेत. एवढ्यासाठी सांगतो, या महापालिकेच्या अधिका-यांची नार्को चाचणी घेतली तर निम्म्याच्या वर अधिकारी हे ठेकेदाराचे भागीदार असल्याचे कळेल. भागीदारी ठरवताना निविदा प्रक्रिया राबवताना ठेकेदाराला सुटेबल अशी निविदा प्रक्रिया अटी शर्ती टाकल्या जातात. STP प्लाण्ट बद्दल सभागृहात जाहीरपणे सांगतो. जे ठेकेदार आहेत ते छोट्या ठेकेदारीमधून इथे काम करीत आहेत. त्यांना सगळ्यांना एकत्र करुन अधिका-यांना ५० टक्के भागीदार ठेवले आहे. ते STP चालवतात. कसले प्रदूषण नियंत्रण मंडळाचे काम चालवतात. मनपाचे दलाल झालेले आहेत. निविदा प्रक्रियेतील मा.योगेश बहल यांनी प्रश्न विचारले. STP चे किती नाले जातात किती ट्रीट करत आहेत. ४७० mlt पाणी उचलतो. आत्ता सांगितले २०० mlt पाणी ट्रीट करतो. या शहरात बोअरवेल आहेत. त्याचे सर्वेक्षण केले आहे का. त्याचप्रमाणे पाणी किती उचलतो ते पण वापरा. पुरते ड्रेनेजला जाते. त्याची माहिती घेतली आहे का. महापालिकेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मनपाची एफ.डी. जप्त केली ही दूर्दैवाची बाब आहे. प्लास्टीक मिळत नाही, मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले. मनपा क्षेत्रातून ३ नद्या वाहतात. मुळा, पवना व इंद्रायणी यांची पात्रे बघा. प्लास्टीकच मिळेल. प्लास्टीकवर बंदी करायची घोषणा सभागृहात होते. २ वर्षे झ*

*ााली घोषणा होऊन काय झाले. ठेकेदार फसवायचे काम करतो. निम्म्यापेक्षा जास्त नाले नदी पात्रात मिळतात. सिवेज ट्रिटमेंट प्लाण्टमधून ४० टक्के पाणी डायरेक्ट नदीला जाते. ट्रीट होत नाही हे जाहीरपणे सांगतो. अतिरिक्त आयुक्तांना घेऊन कधीपण फोन केला तर डायरेक्ट येऊन दाखवतो. पाणी ट्रीट होते का डायरेक्ट नदी पात्रात जाते. कशासाठी खर्च करतो. केवळ ठेकेदारांना पोसण्याचे काम चालले आहे. मी सुद्धा सभागृहात होतो ज्यावेळी कचरा प्लाण्ट बसवायचा विषय इथे आला होता त्यावेळी मनपाला डिझेल मिळण्यासंदर्भात सांगितले होते. सभागृहात विषय आल्यानंतर सदस्य त्यावर बारकाईने विचार करतो. प्रकल्प यशस्वी होईल. शहर प्रदूषण मुक्त होईल. पर्यावरण विभागाला जबाबदार मानतो. मनपा क्षेत्रातील जलप्रदूषण होत असेल तर याला सगळे जबाबदार आहेत. अजेंडावर विषय असताना संबंधित अधिकारी उत्तर द्यायला उभा राहीला नाही. विषयाची पूर्ण कल्पना पाहीजे. त्याने उत्तर दिले पाहीजे. दुसऱ्या अधिकाऱ्याकडे उत्तर आहे असे सांगितले नाही पाहीजे. प्रामुख्याने या शहरात प्रदूषणाने पूर्ण वाट लागली आहे. केवळ कोणीही कचरा आणून टाकतो म्हणून नदी पात्र काय प्रदुषित होते का करुन ठेवले. सभागृहात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे साफपणे चूकीची आहेत. पर्यावरण विभागात किती खर्च करण्यात आला. केलेल्या कामांमुळे कोणता उपयोग झाला हा प्रश्न विचारला. १२ एन.बी.मध्ये स्थापन करण्यात आले एवढेच उत्तर दिले. सदस्याला काय अपेक्षित आहे अधिका-याला माहित पाहीजे. केवळ प्रश्न विचारत असताना उत्तर लपवायचे हे काम चालते. सखोल उत्तरे दिली पाहीजेत. तास दोन तास जातात. महापालिका सभागृहात अधिका-यांना देखील वाटत असते, मला कोणी काही करणार नाही. कोणाच्यातरी सांगण्यावरुन खुर्चीवर गेलेलो आहे. महापालिकेचा कारभार कितीतरी वरवर चांगला दिसत असला तरी मनपाला भ्रष्टाचाराने पोखरलेले आहे. हे प्रामुख्याने दिसते आहे. उत्तरे अतिशय बोगसपणाची आहे हे सांगतो.*

**मा.दत्ता साने** *:- मा.महापौर साहेब, किवळे विकासनगर भागात देहू रोड कंटोनमेंट बोर्डाची हद्द आहे. त्यांच्याकडून सांडपाणी, ड्रेनेजचे पाणी मनपा हद्दीत सोडले जाते. देहूरोड कंटोनमेंट बोर्डाबाबत संबंधित अधिका-यांना कल्पना दिलेली होती. त्यावर काय उपाययोजना करण्यात आली आहे. किवळे विकास नगर भागातून दोन नाले वाहतात. ड्रेनेजचे काम पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमातून पूर्ण झालेले नाही म्हणून ड्रेनेजचे सर्व सांडपाणी वाहून नाल्यात सोडले जाते. पवना नदीत जाऊन पाण्याचे प्रदूषण होते आहे. त्याबाबत संबंधित अधिका-यांनी काय पाऊले उचलली आहेत त्यावेळी आरोग्य विभागाकडून सांगितले गेले. नदीचे पाणी चेक केले जाते असे अधिका-याने सांगितले. अधिका-यांकडून संबंधित नगरसेवकांना याची माहिती दिली जाते का. पाणी चेक करण्यात आले काय. एक वर्ष कालावधीत अजूनही माझ्या निदर्शनास आणून दिलेले नाही. आधिकारी आल्यानंतर चेक केले. या भागातील मोठा प्रश्न आहे. देहू रोड हद्दीतील पाणी महापालिका हद्दीत सोडले जाते. त्यावेळी आपल्या विभागाकडून काय कारवाई होते याची माहिती मिळावी.*

**मा.राजेंद्र काटे** *:- मा.महापौर साहेब, पर्यावरण विभागाकडून सांगितले गेले, ड्रेनेज विभागाचा त्या त्या ठिकाणी विभागानुसार नकाशा तयार केले आहेत का. डायरेक्शन्स आहेत का.*

**मा.चव्हाण** *(सहशहर अभियंता):- मा.महापौर साहेब, आपल्याकडे जास्तीत जास्त कामे ठेकेदाराकडून करुन घेतात. बिले देताना रेकॉर्ड तयार करतो. त्याचे रेकॉर्ड आपल्याकडे आहे. डायरेक्शन्स मिळायला हरकत नाही.*

**मा.राजेंद्र काटे** *:- मा.महापौर साहेब, पूर्ण डायरेक्शन्स मिळाल्या आहेत. प्रत्येक वर्षी कुठेतरी चेंबर हलले गेले. ५०० मीटर खड्ड्यात जावून चेंबर ठोकले गेले असेल तर ड्राईंग काढायला हरकत काय. मनपाच्या पाण्याच्या लाईन, विद्युत लाईन असतील तर नागरिकांना पूर्ण तयार आहेत का. शहर अभियंता यांनी उत्तर द्यावे.*

मा.कांबळे *(शहर अभियंता) :-* मा.महापौर साहेब, विद्युतचे मला सांगता येणार नाही. पाणीपुरवठ्याच्या लाईन्स नकाशा, सर्वे आहे.

मा.राजेंद्र काटे *:-* मा.महापौर साहेब, नगरसेवकांना माहित होईल. प्रत्येक वेळी कामाच्या अडचणी येतात. संबंधित विभागाला परवा असेल तर मनपाचा खर्च होणार नाही. त्या-त्या विभागाला डायरेक्शन्स् दिल्या तरी ठेकेदारांना सुद्धा मदत होईल.

मा.दत्ता साने *:-* मा.महापौर साहेब, आपल्या भागात ड्रेनेज चोक अप साफसफाई करतो. त्याचे काम वेबलाईट कंपनीला दिलेले आहे. आमच्या परिसरात चोक अप काढण्यासाठी शहरात एकच गाडी आहे. त्याला टेंडर दिलेले आहे. ७ वर्षांसाठी दिलेले आहे. ट्रायल बेसिसवर १ वर्षासाठी दिलेले आहे. ७ वर्षे टेंडर वाढवून दिलेले आहे. हे महापालिकेचे जावई का माहित नाही. त्यांच्याकडे मशिनरी नाही. पॉवर हेडींग मशिनरी नाही. सच्छल या संस्थेची एकच आहे. बाकी ४ गाड्या आहेत. काही जेन्यूअन प्रकार झाला, लाईन चोक अप झाल्या तर ही एकच गाडी शहरात कशी फिरवणार आहात. ७ वर्षांसाठी टेंडर का दिले, एवढी याची आवश्यकता काय माहित आहे. एकच गाडी शहरात फिरवणार, अतिशय महत्वाची गाडी आहे. कमीत कमी एक महिला झाला असेल अधिका-यांच्या मागे लागलो हे. कुलकर्णी असतील, ढवळे साहेब असतील. कमीत कमी ७ ते ८

लाईन्स मध्ये प्रत्येकाच्या घरात पाणी चाललेले आहे. सांगून थकलो आहे. माझ्या भागात एकच जे.डी. मशिन आहे. अशा परिस्थीतीत शहरातील अतिशय महत्वाचा प्रश्न असताना ३ ते ४ गाड्यांची गरज आहे, त्यांना कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. इतर ठिकाणी काम करतोय. आपल्या भागात लागले तर देत नाही. त्यांच्याकडे कोणाला इंटरेस्ट आहे का. कोणा मोठ्या व्यक्तीकडून आलेला आहे का.

मा.चव्हाण *(सहशहर अभियंता)* - मा.महापौर साहेब, रेग्युलर मेंटेनन्स कामाचे टेंडर काढले आहे. विद्युत विभागाकडून मशिनरी घेण्याबाबत मेकॅनिकल विभागाकडून काढले गेले आहे. ७ वर्षांसाठी टेंडर काढले आहे. तुपे साहेबांनी दिलेले आहे.

मा.दत्ता साने - मा.महापौर साहेब, पहिले ट्रायल बेसिसवर दिलेले आहे. ७ वर्षे देण्याचे कारण काय. कामाची गरज नसेल तर ७ वर्षांसाठी कशाला दिलेले आहे, तो चांगले काम करतोय का बघितले आहे का. इथे विजिट करण्याचा संबंध नाही. मागणी करुन मिळत नाही. हा प्रसंग माझ्या स्वतःच्या भागात झालेला आहे. दुसरीकडे हाच प्रसंग झालातर गाडी कशी पुरवणार आहात. एक मशीन शहरात कोणत्या बेसिसवर दिलेली आहे. मा.महापौर साहेब, जेटींग मशीन प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे असावे. ब्लोअर ट्रॅक ऐवजी गाडी घेतली असती तर ती सर्व प्रभागांत फिरली असती. येथे मशिनरीमध्ये सर्व प्रभागांतील तक्रारींचे निवारण करावे असे सांगितले आहे. मा.महापौर साहेब, यातील एकही गाडी जागेवर नाही. जेटींग मशीन ही सुद्धा आपल्याकडे नाही. त्यांच्याकडे फक्त ४ गाड्या सक्शन मशीन आहे. त्यांचा उपयोग होत नाही. पॉवर जेटींग मशीन पाहीजे. चेंबर काढण्यासाठी पॉवर जेटींग मशीन पाहीजे. सक्शन मशीन फक्त क्लीन करते.

मा.चव्हाण *(सहशहर अभियंता)* - मा.महापौर साहेब, त्यावेळी ज्या मशिनरी होत्या, त्याप्रमाणे डिसाईड झाले होते.

मा.दत्ता साने - मा.महापौर साहेब, शहरात दोन ठिकाणी चेंबर चोक अप झालेतर एकच मशीन कुठेकुठे पुरवणार. तुम्ही कसे काम करणार हे जातीने लक्ष देण्यासारखे काम आहे. शहराला एक मशीन पुरु शकत नाही. ४ मशीन्सपैकी ३

नादुरुस्त आहेत. सुतार ठेकेदार कधी शहरात येत नाही. ४ लोक सोडलेले आहेत. ते कधी चांगले उत्तर देत नाहीत. आपण त्यांना का पोसतोय. असे लोक का ठेवतो. त्याला ब्लॅकलिस्टमध्ये टाका. त्याचे टेंडर सील करा. व्यवस्था असेलतर चेक करा नसेल तर कॅन्सल करा असा आदेश महापौरांनी द्यावा.

मा.अजित गव्हाणे - मा.महापौर साहेब, पर्यावरण विभागाकडून सदरचा प्रश्न विचारलेला आहे. या सगळ्या चर्चेतून एक गोष्ट निश्चितपणे निदर्शनास येते की, पर्यावरण विभाग सक्षम नाही. ग्लोबल वॉर्मिंगचा धोका जगाला आहे. सगळया परिस्थीतीत जगात बदल होत चालले आहेत. राज्यात देशात दुष्काळ पडला आहे. याचे मुख्य कारण ग्लोबल वॉर्मिंग आहे. विभाग अधिक सक्षम होणे गरजेचे आहे. किती स्टाफ काम करतो. कुलकर्णी यांची पर्यावरण विभागासाठी स्पेशल नेमणुक करण्यात आली. चांगला अधिकारी म्हणून पुढाकार दिला. अपेक्षित चांगले काम पाहीजे. अजूनही पिंपरी चिंचवड शहरात अपेक्षित काम होत नाही. आज याठिकाणी पवना नदी सुधारणेचा प्रश्न विचारण्यात आला. शहरात एकूण 3 नद्या आहेत. तिन्ही ठिकाणी ख-या अर्थाने नदी सुधार प्रकल्प करणे गरजेचे आहे. तशा प्रकारची विनंती वारंवार केली. शहरातील तळवडे पासून च-होली उरलेला मुठा नदीचा भाग इथे सुद्धा नदी सुधार प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. कारवाई करणे गरजेचे आहे. या विभागाच्या माध्यमातून हे अपेक्षित आहे. एस.टी.पी. प्लाण्ट कार्यरत नाहीत. नदीत डायरेक्ट पाणी सोडले जाते. इंद्रायणी नदी देहू आळंदी मधून वाहत जाते. शहरातून वाहताना इथे तिचे पाणी दूषित होते आहे. तिथले लोक आंदोलन करीत आहेत. निवेदने देत आहेत. अजूनही 100 टक्के चऱ्होली येथील एस.टी.पी. प्लाण्ट कार्यरत झालेला नाही. त्याचा त्रास संबंधित लोकांना होतो आहे. बोपखेल येथे अजूनही एस.टी.पी.ची व्यवस्था नाही. पिंपरी चिंचवड शहरात असून सुद्धा त्यांना सुविधा मिळत नाहीत. आयुक्त साहेबांनी या मिटींगला असणे आवश्यक होते. अधिकारी चांगल्या पद्धतीने लक्ष घालतील तरच निश्चितपणे पर्यावरण चांगले होईल. नागरिकांना अपेक्षित काम होईल. आपण पाहीलेच आहे, ज्या पद्धतीने विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. पर्यावरण विभाग ड्रेनेज विभागावर, ड्रेनेज विभाग स्थापत्यवर, स्थापत्य विभाग आरोग्यवर अशा प्रकारे फुटबॉल चालला आहे. हे कुठेतरी थांबले पाहीजे. एकाच माणसाकडे हे काम दिले तर नक्कीच चांगला मार्ग निघू शकेल. खूप

चांगले काम होईल. पूर्वी डॉ.नागकुमार या विभागाचे अधिकारी होते. नंतर स्वतंत्र विभाग चालू केलेला आहे. या विभागातील त्रुटी लक्षात घेता चांगला विभाग व्हावा या दृष्टीकोणातून प्रयत्न करावेत. खडकी इथला कचरा दायईची च्या मागील कचरा डेपोमध्ये टाकला जातो. त्यांच्याकडून सांगितले जाते. मोशी डेपोपर्यंत कचरा आणण्याची व्यवस्था आपण केली पाहीजे. अशा प्रकारे ते अडमुठेपणाची भूमिका घेतात. मा.योगेश बहल यांनी दुसरा मुद्दा सांगितला, शहरात केंद्र संरक्षण खात्याची वेगवेगळी कामे करुन देतो. त्यांचा कचरा आपल्याकडे टाकला जातो. दुसरीकडे आपला रस्ता बंद करत आहेत. दुटप्पी भूमिका घेतली जाते याबाबत कडक शब्दांत सांगितले पाहीजे. तुम्ही तुमची सोय करावी अशी भूमिका मनपाने घेतली पाहीजे. याच सभेचा संदर्भ घेऊन तसे पत्र सूचना संबंधित विभागाला द्यावी अशी सूचना आहे. च-होली *STP* प्लाण्ट जरी जास्त क्षमतेचा आहे. त्याचे काम पूर्णत्वाला जावे अशी अपेक्षा आहे. या संदर्भातील खुलासा संबंधित अधिका-यांकडून घ्यावा, तो चालू झाला तर च-होलीपासून तळवडेपर्यंत ड्रेनेज लाईन काढली तर डायरेक्ट इंद्रायणी नदीत होणारे प्रदूषण थांबेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.अनंत को-हाळे** *:- मा.महापौर साहेब, सर्वात महत्वाची गोष्ट आहे माणसाला पाणी अन्न दिले नाहीतरी तो २१ ते २२ दिवस जिवंत राहू शकतो. हवा नसेल तर १ सेकंद सुद्धा जिवंत राहू शकत नाही. पर्यावरणाविषयी जागृती पाहीजे. त्याचे महत्व महापालिकेला अधिकाऱ्यांना कितपत आहे. याच्याविषयी खूप मोठी शंका व्यक्त होते आहे. आज शहरात पर्यावरण शिल्लक आहे का हा मोठा प्रश्न आहे. पर्यावरण विषयी विरोधी पक्षनेते मा. कैलास कदम, मा.अश्विनी चिंचवडे पाटील यांनी चांगले प्रश्न विचारले आहेत. त्या अधिकाऱ्यांनी अजिबात व्यवस्थित उत्तर दिलेले नाही. त्याविषयी आपण त्यांना काय बोलणार आहात का. स्थापना कधी झाली. २०११ साली त्यांचा अहवाल ११/१२ सालाचा अहवाल का दिला गेला नाही. या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावी.*

**मा.संजय कुलकर्णी** *(कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड मनपाचा २०११-१२ नंतरचा ३ वर्षांचा ESR तयार करण्यासाठी निविदा काढली आहे. नि.क्र.६ दि.२६/१२ रोजी निविदा काढली होती. त्यानुसार २ निविदा प्राप्त झाल्या. त्यानुसार मे. अल्ट्राटेक व ति संस्थेकडून ३ वर्षांचा ESR पूर्ण शहरात पर्यावरण, घनकचरा, वायुप्रदूषण शॉर्ट टर्म व लॉंग टर्म प्लॅनिंगविषयी संपूर्ण अहवाल व प्रकल्प राबविणे यासाठी अनुदान मिळणार आहे. केंद्र शासन व राज्य शासन व दुसरी संस्था असेल तर याविषयी तिसरा अहवाल असा अहवाल प्रसिद्ध करण्यात यावा अशी निविदा काढली*

*आहे. निविदा अंतिम होत नसल्यामुळे त्याची कार्यवाही झालेली नाही. त्याप्रमाणे वर्कऑर्डर दिल्यानंतर सन २०११-१२ चा अहवाल करण्यात येईल.*

**मा.अनंत कोऱ्हाळे** *:- मा.महापौर साहेब, पर्यावरणाला किरकोळ समजू नका. अधिकाऱ्यांनी उत्तर दिले. उत्तरांना गांभिर्य नाही. मा.आप्पा बारणे, मा.योगेश बहल यांनी कळकळ व्यक्त केली. लेखी स्वरुपात उत्तरे नाहीत. अहवाल का तयार केला नाही. २०१२-२०१३ वर्ष चालू आहे. कोणाला टेंडर दिले, काय दिले काहीच कळाले नाही. हाच प्रश्न आहे. वायू प्रदूषणासंदर्भात काय काम केले. माझ्या प्रभागात जलपर्णीत नदी आहे का नदीत जलपर्णी हेच कळत नाही. आपण लोकांना काय सांगतो चांगली नदी सुधारणा करु, पाणी स्वच्छ करु. विभाग होऊन दीड वर्ष झाले तरी अधिकाऱ्याला विषयाचे गांभिर्य नसेलतर काहीच होत नाही. लोकांवर कारवाई केली, फौजदारी दाखल केली. पर्यावरण अधिकारी कायद्याचे उल्लंघन करत असेल तर त्याच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहीजे. पर्यावरणाला गंभिरपणे घ्या एवढीच विनंती आहे.*

**मा.सिमा सावळे** *:- मा.महापौर साहेब, खरेतर बराच वेळ झाला या विषयावर चर्चा करत असताना माजी महापौर मा.योगेश बहल यांनी सांगितले. संत तुकाराम नगर मधून जो नाला वाहतो. तो ओपन आहे. बंदिस्त नसल्यामुळे रहिवासी घरांना त्रास होतो.*

*सोसायटीतील लोकांना तयार केले आहे. सांगायचे तात्पर्य आहे, नाला माझ्या वॉर्डात येतो. खडकी केंटोनमेंट बोर्डाचा कचरा डेपो तिथून का हलवत नाहीत. ते आपल्याला दाद देत नाहीत. आत्ताच त्याठिकाणी आग लागली होती. वायू प्रदूषणासंदर्भात तेथे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. रहीवाश्यांना राहणे मुश्किल झाले आहे. या विषयात तातडीने लक्ष द्यावे. प्रस्ताव द्यावा. कंटोनमेंट बोर्ड मिटींग घेता आलीतर बघावे. याठिकाणी माझे सहकारी भगिनी मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांना प्रश्न विचारले. या संदर्भात एक मुद्दा मा.कैलास कदम यांचा होता त्यांनी विचारले आहे. पिंपरी पूलाखालील कत्तलखाना परस्पर कसा हलवला गेला. उत्तर समाधानकारक मिळाले नाही. वारंवार सांगितले पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे म्हणून. डॉ.गोरे यांचे उत्तरानुसार लक्षात आले, ETP Plant सुद्धा तिथे होता. मग पर्यावरणाची हानी होते आहे. प्रत्यक्षात बिल्डरची साईट होती. त्याचे फ्लॅट विकले जात नव्हते म्हणून तो हलवला आहे. हे सुद्धा लक्षात घेणे गरजेचे आहे. कुलकर्णी साहेबांनी उत्तर दिले कचरा डेपोचा विषय निघाला. त्यामुळे तळ्याचे पाणी प्रदुषित होते आहे. पाण्याचा नमूना MPCB प्रमाणे घेतला. ३ ते ४ महिने झ ाले. रिपोर्ट दिला आहे. हे शहरासाठी योग्य नाही. रोजच्या रोज कचरा डंपिंग करतो. प्रक्रिया काही होत नाही. २ ते ५ % कचऱ्यावर प्रक्रिया करतो. त्याचे पाणी जमिनीत येते, ते एकत्रित करावे. प्लॅण्ट आत्ता चालू आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी मी दिवसभर व्हिजिट केलीतरी नेमके काय होते ते आपल्याला माहिती पाहीजे. ते लक्षात आले की, जवळपास रोज तेथे १२० गाड्या, मोठे ट्रक, डम्पर खाली करतो. त्यावर प्रक्रिया न करता डम्पिंग करतो. त्याठिकाणी प्लास्टीक आहे ते मरत नाही ते सुद्धा डम्प करतो. यावर*

काही प्रक्रीया होत नाही. कचरा डंपिंग केल्यामुळे व त्यामध्ये प्लास्टीकचे प्रमाण जास्त असल्यामुळे मिथेन वायू तयार होतो व आग लागण्याचे प्रमाण वाढते. यातून जी प्रक्रिया होते त्यातून मिथेन वायू तयार होतो. आग लागण्याचे प्रमाण वाढते. वरुन कितीही पाणी टाकले तरी आतमध्ये आग तशीच धुमसत असते. एक दिवस तिथे मोठा अपघात घडेल म्हणून तो बफर झोन ठेवला पाहीजे. मेकॅनिकल कंपोस्ट विषयी बी.व्ही.जी. किती टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करतो. सगळ्या नगरसेवकांच्या प्रभागात व्हिजिट करा लक्षात येईल. ज्याठिकाणी हाताने प्लास्टिक वेगळे काढतात ते कचऱ्यात कुजते. त्यावर कोणतीही प्रक्रिया करत नाहीत. यापूर्वी संजय कुलकर्णी यांनी उत्तर दिले की, त्यापासून इंधन पेट्रोल, डिझेल तयार होते. प्रत्यक्षात तिथे गेलो तर तिथे गुजरात सारख्या राज्यातून ट्रान्स्पोर्ट करुन प्लास्टीक आणतात. प्लास्टीकवर इंधन निर्मिती होते. आपले प्लास्टीक सुद्धा तिथे डम्प करतोय. अजूनही तिथे नागरीक विघातक परिस्थीतीत राहतात. गांडूळ खत प्रकल्प आहे. मंडई वेस्ट देऊ असे सांगितले होते. मात्र मंडई वेस्ट त्यांच्यापर्यंत जात नाही. म्हणून सिवेज देतो. हे सुद्धा लिक्विड स्वरुपात देतो. तिथे मागणी सांगावी लागते. ज्यावेळी माती घट्ट तयार होते त्यावेळी प्रक्रिया केली जाते. पर्यावरणाच्या हिशोबाने काय करतो. टेंडर काढणे, टेंडर देणे एवढीच कामे करतात. टेंडर काढताना गांडूळ खताची निर्मिती करणाऱ्या ठेकेदारालाच मंडईतून मंडई वेस्ट जमा करावे अशी टेंडरमध्ये अट का टाकली नाही. त्यामुळे तिथेसुद्धा मंडई वेस्टमध्ये गांडूळ खताची निर्मिती करतो. खत तयार करण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेतरी कचरा वाहून नेणारे, कचरा जमा करणारे महापालिकेचे लोक असतात. आज परिस्थीती तशी आहे का सरसकट सांगा. कचरा एकत्रित करुन देतो. तो वेगवेगळा करायला विलंब लागतो. पर्यावरण प्रक्रिया होत नाही. लॅण्ड फिलिंग करतो. खाली आग लागते. मिथेन वायू तयार होतो. पर्यावरणाचे रक्षण करण्याऐवजी ऱ्हास करतोय. मंडई वेस्ट गोळा करतोय. त्यांना जमा करायचे असेल तर त्यांना सोप्पे जाईल. तुमच्यासाठी वाट पाहणार होते. प्लाण्ट येतो म्हणून ओडोसीन आणतो. यात एकच ठेकेदार पुरवठाधारक आहे. एकच ठेकेदार टेंडर भरतो. कंपन्यांमध्ये स्पर्धा न करता वेगवेगळ्या नावांनी टेंडर भरतो. पर्यावरण विभाग भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. वरिष्ठ अधिकारी सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहीजे. एकटेच कुलकर्णी साहेब जबाबदार नाहीत. आपण लहान माश्यांना मारतो, मोठ्या माश्यांचे काय. त्यांना सुद्धा मारले पाहीजे.

**मा.मंगलाताई कदम** :- मा.महापौर साहेब, पर्यावरणाचा विषय निघाला. एक तासाऐवजी दोन तास सगळेच सन्माननीय समाधान होईपर्यंत बोलले. मा.अश्विनी चिंचवडे, मा.कैलास कदम या नवीन सदस्यांनी, ज्येष्ठ सदस्यांनीसुद्धा प्रश्न विचारले. असे चित्र सभागृहात पुन्हा होता कामा नये. अधिकाऱ्यांसमोर एकत्रितपणे प्रश्न विचारायचे. एकदा कितीही प्रश्न विचारले तरी अधिकारी त्याचे उत्तर एकदाच देतात, अशाच पद्धतीने सभागृहाचे कामकाज चालते. नदी सुधार, जलप्रदूषण, ट्रिटमेंट प्लाण्ट याबाबतच्या मिटींगला मी पूर्वी होते त्यावेळी काय झाले माहित आहे काय. खरोखरच यासाठी चांगला अधिकारी नेमणे गरजेचे आहे. स्वतंत्र कक्ष पाहीजे म्हणजे उत्तम रितीने काम चालू होते. पर्यावरण म्हणजेच पिंपरी चिंचवड शहराचे आरोग्य आहे. नदी पात्रातील

*कंपन्यांना नोटीस दिली का. हे आपले नाही पर्यावरण विभागाचे काम आहे. आपला अधिकारी आहे तर त्याने त्यांना नोटीस दिली पाहीजे. ट्रिटमेंट प्लाण्ट संदर्भात ३०० mlt सांडपाणी जमा होते ते खरोखरच ट्रिट करुन सोडतो का. टेंडर मॅनेजिंग पद्धतीने सगळी टेंडर पुरवायला वेगळाच माणूस लागतो. आपल्याला तेवढा पैसा लागणार आहे. परंतू कधीकधी मनात येते असे कसे होऊ शकते. याचा खरोखरीच सखोल अभ्यास केला पाहीजे. ज्या अटी टाकल्या आहेत त्यासाठी तो खरोखरच पात्र आहे का याची पहिली खात्री करुन घ्यायला पाहीजे. कागदोपत्री तपासून घेतले पाहीजे. अटी शिथिल करण्यासाठी कोणी शरण गेला. मागील वर्षी चिंचवड ट्रिटमेंट प्लाण्टमध्ये पूर्ण मैला तसाच वर आलेल्या परिस्थितीतच बंधारा बांधलेला आहे. लोकांना याचा त्रास होतो आहे. तो उचलला गेला नाही. जे.सी.बी. च्या ड्रायव्हरकडून हे काम चालू आहे. आपला सुपरवायजर बसतो. बी.व्ही.जीचा सुपरवायजर दिसत नाही. माती खालून पक्की होते. ही आपली जबाबदारी आहे का हे कुठेतरी तपासले गेले पाहीजे. पेपरमध्ये येते, लोक बोलतात. पदाधिकारी, नगरसेवक यांची बदनामी होत असते. पर्यावरणाबाबत लक्ष वेधून घेण्याचे काम शहरात होते. काम फार सोप्पे आहे. अधिकारी, कर्मचारी पाहिजे असतील तर वाढवून द्या. आपली एफ.डी. जप्त होत असेल तर यासारखी नामुष्की पिंपरी चिंचवड शहरावर आहे. पेपरमध्ये वाचल्यानंतर लक्षात येते, या दृष्टीकोणातून कदम असतील तर अभिनंदन केले जाईल. कमिश्नर ५ दिवस आहेत. एक टिका आली होती, एक दिवसाचा मुख्यमंत्री. पेपरमध्ये आले होते. अजंठानगरमध्ये खरोखरीच गंभीर परिस्थीती आहे का नाही. यातून काय पर्यावरण सुधारणार आहे. स्वच्छच्या लोकांना कचरा वेगळा करण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेतरी ते वेगळे करत नाहीत. बी.व्ही.जी.वाल्यांना प्लास्टीक पाहून आणावे लागते. यातून प्लास्टीक कुठे जाते. त्यातील कागद वेगळा करण्यासाठी स्वच्छ च्या लोकांनी टेंडर भरले होते. महिलांनी टेंडर घेतले तर सक्षम रितीने काम केले पाहीजे. दोन ठिकाणी व्हिजिट करा. टेंडर भरायचे काम करतात. काम कसे होते. प्लास्टीकचे थर जमतात. मी फोन करुन चेक करुन परिस्थिती कशी आहे ते सांगते. पिंपरी चिंचवड मध्ये परिस्थीती अजिबात चांगली नाही. खडकी केंटोनमेंट बोर्डाचा कचरा आणून टाकतात तरी आपले रस्ते बंद करत आहेत. आपण त्यांचा कचरा का बंद करु नये. पुण्याकडून शेजार धर्म म्हणून सुद्धा मोशी डेपोत कचरा येतो आहे. तुमचा कचरा आम्ही स्विकारणार नाही याच पद्धतीने ठोस भूमिका घ्यावी. आयुक्तांना माहिती नाही का महापालिका सभा आहे. त्यांनी त्याचप्रमाणे त्याचे कार्यक्रम ठरवावेत. महापौर तुम्ही सुद्धा टिळ्यावरुन इथे परत आलात. इथून पुढे प्रशासन व आयुक्तांनी ज्यावेळी महापालिका सभा असेल त्यावेळी आयुक्तांनी शक्यतो कोर्ट असेल तरच जायचे. अन्यथा कोणत्याही कॉन्फरन्सला जाऊ नये. पदाधिकाऱ्यांनी फक्त कॉन्फरन्स कॅन्सल करायची का. त्यांना माहित होते तर त्यांनी जायला नव्हते पाहीजे. महापालिका सभेत विषय करायला पाहीजे. तसे असून ते चेन्नईला जात असतील तर शहराच्या दृष्टीकोणातून चांगले नाही. आल्यावर परत तीन दिवस मिटींगमध्ये जाणार मग काय करणार. पदाधिकारी व नगरसेवक यांनीच ठेका घेतला नाही चांगल्या पद्धतीने वागायचे. अधिका-यांना सुद्धा चांगले वळण लागले पाहीजे अशी*

*नम्र विनंती करतो. कंटोनमेंट बोर्डाच्या विषयात आयुक्तांच्या स्वत:च्या सोयीनुसार असे पत्र दिले. आर.बी.चव्हाण या अधिकाऱ्याला काम जमत नाही. शेजारधर्म ४० वर्षे पाळला. इथून पुढे पाळू शकत नाही. लोकसंख्या वाढत असताना २ होस्टेलचा ठराव पिंपरी चिंचवडच्या हद्दीतून रस्ता करण्यासाठी विषय मांडला. आम्हाला दिल्लीत जाऊन रस्त्यासाठी मागणी करावी लागते. शाळा कंपाऊंड बांधून दिले नंतर सुद्धा रस्ता करुन देत नाहीतरी आपण त्यांना कचरा टाकून देतो. ठामपणा असू द्या. जमत नसेल तर मी स्वत: मोशी कचरा डेपोत जाऊन उभे राहिले होते तसे इथे सुद्धा करु. त्याची प्रतिक्रिया काय सांगेल त्याचा फायदा होतो. या पद्धतीने कामे होता कामा नयेत. चांगल्या पद्धतीने कामे चालू पाहीजेत. मशीनचा विषय होता. योगायोगाने सभागृहात नव्हते. ट्रायल बेसिसवर मशीन कुठे लावायची. मशीन लावली गेली तरी त्याची जबाबदार कोणाची. करारामध्ये होते ठेकेदाराने ३ फेज कनेक्शन बसवायचेत. ओला कचरा-सुका कचरा सेपरेट करुनच घेत विक्री करायची मग याच्या नावाचे बांधकाम करायचे. त्याच ठेकेदाराने विभागात येऊन मशीन हलवली. ती मशीन ४० कुटूंबांसाठी होती म्हणून हलवू दिली नाही. रोजच्या रोज आणून कचरा टाकला असता, माणसे ठेवली असती. थ्री फेज कनेक्शन साई मंगल सोसायटीने घेतले. ओला कचरा, सुका कचरा वेगळा करण्यासाठी एक हजार रुपये महिन्याला देत होतो. ठेकेदाराने अटींचा भंग करायचा नाही. नाहीतर फौजदारी दाखल करा. आमचा काय गुन्हा. शहरात नक्कीच राष्ट्रवादी पक्षातून काम करतो. चांगला प्रोजेक्ट करण्यासाठी करतो. याचा अर्थ आम्ही गुन्हेगार असा होत नाही. ठेकेदाराची जबाबदारी आहे म्हणूनच पर्यावरणाचा विषय चांगल्या प्रकारे हाताळला पाहीजे. यासाठी सगळा अधिकार आहे त्या पद्धतीने काम झाले पाहीजे. नुसते ओरडून काही उपयोग नाही. अहवाल का तयार झाला नाही. अहवालासाठी एखाद्या अधिकाऱ्याला किती पाने तयार करावी लागतात. सगळे मटेरियल कन्सल्टंट यांना देत असतो. तो अहवालाचे सादरीकरण करतो. त्यांना कन्सल्टींग म्हणून ७० लाख फी देणार. अधिकाऱ्यांना पगार देत नाही. ऐकले देखील जाते. अधिकाऱ्यांकडून ऐकलेले चांगले वाटत नाही. राष्ट्रवादी सत्तेत असताना टेंडरला मान्यता होते. खर्च सुद्धा सारखा का वाढतो. उत्तम पद्धतीने पर्यावरणाचे काम झाले पाहीजे. मा.सिमा सावळे यांना फोन लावला. त्या इतक्या ओरडत असतात काम करुन घेत नाहीत का. चोक-अप झाले तर अर्जंट करुन घ्या. सदस्य ड्रेनेज विभागावर ओरडत असतात. त्यांच्याकडे दापोडीमध्ये वाईट परिस्थीती आहे. ड्रेनेजसाठी नगरसेवकांना सभागृहात ओरडायची आवश्यकता आहे असे वाटत नाही. यासाठी सक्षम अधिकारी नेमावा. पर्यावरणीय कामकाज बघण्यासाठी नेमणूक करुन व्यवस्था करावी. सभेला सुरुवात करावी.*

--------

*(अ) मा.महापालिका सभा क्र.९ दि.१९/१०/२०१२, २०/११/२०१२ व २६/११/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

*(ब) मा.महापालिका सभा क्र.१० दि.२०/११/२०१२ व २७/११/२०१२ चा सभावृत्तांत*

*कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

--------

*मा.तानाजी खाडे :-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १७६* *विषय क्रमांक :- १*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/कावि/११९१/१२ दि.०५/११/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ५/१२/२०१२ ठराव क्र.८१नुसार,
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२२०९ नुसार

चिंचवड मोरया हॉस्पीटल चौकापासून चिंचवड (एस.बी.आर.) पर्यंत डि.आय. रायझिंग मेन टाकणेकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्ग करून घेणेस तसेच येणा-या र.रू.२६०९४०००/- [र.रू.दोन कोटी साठ लाख चौ-यान्नव हजार] चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने :-** *मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*
*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-***८५** *प्रतिकूल-***०**

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.प्रशांत शितोळे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- २*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/३०७०/१२ दि.१२/१२/२०१२
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२२२७ नुसार

महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय रक्तपेढी धोरण व्यवस्थितरित्या राबविणेकामी राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्रांतीवीर चापेकर बंधु रक्तपेढीचे शुल्क प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमुद केलेप्रमाणे सेवाशुल्क करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**<u>प्रपत्र अ</u>**

| अ. क्र. | | रक्त/रक्तघटक नाव | शासनाचे शुल्क (चाचण्या व बॅग्जसह) | क्रांतिवीर चापेकर बंधु रक्तपेढीचे शुल्क | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मनपा रुग्णालयासाठी (जुने दर) | | | खाजगी रुग्णालयासाठी (जुने दर) | | | मनपा रुग्णालयासाठी (नविन दर) | खाजगी रुग्णालयासाठी (नविन दर) |
| १ | | PCV & WB | ८५० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ८५० | ८५० |
| २ | | FFP | ४०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ४०० | ४०० |
| ३ | | Platelets | ४०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ४०० | ४०० |
| ४ | | Cryopre cipitate | २०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | २०० | २०० |

*मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या रक्तपेढीचे दरात दुप्पट वाढ करण्याचा विषय आलेला आहे. या विषयाला डिस्काऊंट करण्याची विनंती करतो. पिंपरी चिंचवड शहरात रक्ताचा तुटवडा आहे. खाजगी व महापालिकेच्या रक्तपेढ्यांत सेंम रेट सुचवलेला आहे. विनंती करतो, PCB, WB रक्त गटाला रु.८५०/- हा रेट अर्धा करावा. बाकी रक्तगटांना रु.४००/- ते रु.२००/- रेटमध्ये हरकत नाही अशी उपसूचना मांडतो.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- १७७* *विषय क्रमांक :- २*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/३०७०/१२ दि.१२/१२/२०१२

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२२२७ नुसार

महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय रक्तपेढी धोरण व्यवस्थितरित्या राबविणेकामी राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेप्रमाणेचे दर विचारात घेऊन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्रांतीवीर चापेकर बंधु रक्तपेढीचे शुल्क प्रस्तावात प्रपत्र अ मध्ये नमुद केलेप्रमाणे सेवाशुल्क करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रपत्र अ**

| अ. क्र. | रक्त/रक्तघटक नाव | शासनाचे शुल्क (चाचण्या व बॅग्जसह) | क्रांतिवीर चापेकर बंधु रक्तपेढीचे शुल्क | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मनपा रुग्णालयासाठी (जुने दर) | | | खाजगी रुग्णालयासाठी (जुने दर) | | | मनपा रुग्णालयासाठी (नविन दर) | खाजगी रुग्णालयासाठी (नविन दर) |
| १ | PCV & WB | ८५० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ४२५ | ८५० |
| २ | FFP | ४०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ४०० | ४०० |
| ३ | Platelets | ४०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | ४०० | ४०० |
| ४ | Cryopre cipitate | २०० | ९० | २२० | ३१० | ११० | ३३० | ४४० | २०० | २०० |

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- ३*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/६८१/१२ दि.१३/१२/२०१२

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२२४४ नुसार

पवना नदी सुधार प्रकल्पाचा फिजीबीलिटी रिपोर्ट मे.एस.एन.भोबे मनपाच्या प्रकल्प सल्लागारांमार्फत केंद्र शासनाचे अनुदान मिळविणेसाठी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविला होता अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे

**पत्रानुसार एकूण प्रकल्प खर्चापैकी केंद्रशासन (NRCD) ५०%, राज्यशासन २०%, व महानगरपालिका ३०% निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित असून मुद्दा (ई) नुसार नदी प्रकल्पासाठी आवश्यक जागा देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासनाकडून मनपाकडे हस्तांतरीत करून घेणेस व प्रकल्प खर्चाच्या ३०% निधी महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देणेस व त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.**

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, मागे सुद्धा मेट्रोचा विषय झाला. आम्ही पोटतिडकीने विषय मांडला. हिंजवडी पर्यंत मेट्रो आणावी. आय.टी. पार्क असताना तिथपर्यंत घेतली नाही. मोशीपर्यंत घेतली. आत्ता सुद्धा मुळा नदी सुधारणा प्रकल्प यात अंतर्भूत केलेला आहे. कुलकर्णी साहेबांनी आयुक्तांना निवेदन दिलेले आहे. महापौरांना, सभागृहाला विनंती आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत तीन नद्या वाहत आहेत. पवना नदी सुधार हा प्रकल्प घेतला आहे. त्यामध्ये मुळा नदी सुधार प्रकल्प व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प या दोन्ही नद्यांचा समावेश करावा. तसेच नवीन डी.एस.आर.चा विचार करुन एस्टीमेट तयार करणेस व तीनही नद्याचा एकत्रित विचार करुन प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत यावी अशी उपसूचना देतो. तशी उपसूचना घ्या.*

*मा.महापौर :- तशी उपसूचना देण्यात यावी.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, पवना नदी सुधारणा प्रकल्पाचा विषय आलेला आहे. याचा खुलासा प्रशासनाकडू करावा. या कामाच्या स्टेजेस नेमक्या काय यावर किती खर्च झाला. भविष्यात किती खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्षात कधी कामकाज सुरु होणार आहे. मूळा, इंद्रायणी नदीवर प्रकल्प राबवावा. यात काय सुधारणा करता येईल, बदल करावा लागले याचा खुलासा करावा.*

*मा.संजय कुलकर्णी (कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब,पर्यावरण विभागामार्फत पवना सुधार प्रकल्प व्हिजिबिलिटी जेएन्एन्यूआरएम मार्फत पाठविला आहे. पवना नदीबरोबर यात मूळा व इंद्रायणी नदीचा समावेश करावा अशी आमदारांची मागणी आहे. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे डी.पी.आर. प्रपोजल तयार करण्यात येत आहे. रिपोर्ट पाठवला आहे. महाराष्ट्र शासनामार्फत NRCD चे एस्टिमेट केले आहे. ४९७*

कोटी अपेक्षित अंदाजपत्रक आहे. सूचना दिलेली आहे. त्या पद्धतीने जागेचा प्रश्न आहे. खर्च लागणार आहे. त्यासाठी ३०% सहभाग महापालिकेचा घ्यावा. तसा सर्वेक्षण, ठराव अपेक्षित आहे. पवना सुधार प्रकल्पाची जागा प्राप्त करु दिली नाही. प्रत्यक्ष जागेवर अडचण येऊ नये. सदर जागा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाची आहे. प्रकल्प हाती घेतल्यानंतर मोजणी होऊ शकते म्हणून मुंबई-पुणे रस्ता देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात घेतला. ज्याप्रमाणे पवना नदी, त्याचप्रमाणे मुळा व इंद्रायणी नदीची जागा देखभाल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासनाकडे जागा हस्तांतर करणार आहोत. त्याप्रमाणे काम करण्यात अडचण येणार नाहीत. शासनाने पत्र पाठवले आहे. हे २ मुद्दे दुरुस्त करुन प्रस्ताव सादर करावा.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, ३ कामे एका स्टेजला करण्यासाठी काय करावे लागेल.

मा.संजय कुलकर्णी (कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, प्रकल्प सल्लागार यांचे सांगतो. मुळा व पवना नदीचे नाव टाकले होते. इंद्रायणी नदीबद्दल नव्हते. उपसूचना दिल्यानंतर इंद्रायणी चा प्रस्ताव तयार केलेला आहे. यात टाकायचे असले तरी त्याचा डी.पी.आर. त्याबरोबर पाठवायचा असेल तर ५०% केंद्र शासन, २०% राज्य शासन अशी महापालिकेची मागणी योग्य आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, त्यावर प्रशासनाकडून अंमलबजावणी झाली पाहीजे. प्रत्यक्षात काम झाले पाहीजे. काय मदत लागेल तर आम्ही सर्वजण आपल्याबरोबर आहोत. तिन्ही प्रकल्प एकावेळीच झाले पाहीजेत.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, खरेतर राज्य शासनाचा अहवाल, सूचना यांना १७ जुलै २०१२ मध्ये एक आदेश काढला आहे. त्याचा उल्लेख या ठरावात आहे. नदी सुधार प्रकल्प मे.एस.एन.भोबे, प्रकल्प सल्लागार यांच्यामार्फत पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासनाला पाठविला आहे. पत्रानुसार एकूण खर्चापोटी ५०%, राज्यशासनाचे २०%, केंद्र शासनाचे व महानगरपालिका ३०% निधी उपलब्ध करुन देणे व मुद्दा क्र.ई नुसार नदी सुधार प्रकल्पासाठी आवश्यक जागा महाराष्ट्र शासनाकडून हस्तांतरीत करुन घेऊन महापालिकेस देण्याचा अभिप्राय आहे. ठराव कसा खोट्या पद्धतीने आणला आहे. मुद्दा क्र.ई सांगतो - प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्तीसाठीचा खर्च कशा प्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे याचा खुलासा मागितला आहे. त्याचे पूर्ण मेंटेनन्स कसे करणार? ते अवर सचिव यांचे पत्र माझ्याकडे आहे. चांगला प्रकल्प आहे त्याठिकाणी आपल्याकडून करायचा आहे. काम करत असताना खोटेपणा का करतो. मूळ या प्रकल्पाचे कुलकर्णी यांनी सांगितले, ४९७ कोटींचा याठिकाणी डी.पी.आर. पाठवला. त्यात ३०% रक्कम किती आहे. सभागृहाला सांगायला पाहीजे आहे. तसे न करता मोघम विषय आणला. पाटबंधारे खात्याने परमिशन दिलेली आहे का. अनेक प्रश्न गंभीर

*प्रश्न असताना आपण उचलले आहे. मंजूरी झाली नाही. उशीरा मंजूरी झाली तरी काय प्रकल्पाचा खर्च त्यानुसार रु.४९७ कोटी निश्चित केला. त्यावेळी डी.एस.आर. कुठल्या वर्षाचा वापरला होता का? एखाद्या गोष्टीचा खुलासा विचारला तर आपल्याला त्रास व्हायचे काय कारण आहे. अधिकाऱ्यांनी त्यांचे काम केले पाहीजे. नगरसेवकांनी प्रश्न विचारण्याचा पण त्रास होतो? माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यायला सांगा.*

*मा.संजय कुलकर्णी (कार्य.अभियंता,पर्यावरण) :- मा.महापौर साहेब, पवना सुधार योजनेचा डी.पी. बनवला नाही. इनिशियल व्हिजिबिलिटी रिपोर्ट बरोबर पाठवला आहे. त्याचा डी.एस.आर. २००९-२०१० चा आहे. जुलै २०११ एस्टिमेट केलेले नाही. ब्लॅक एस्टिमेट केलेले आहे.*

*मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, मला आरोप करण्याची संधी देत आहात. स्टेजेस सांगायच्या आहेत. आत्ता तरी केंद्राकडे हा विषय पाठवायचा असला तरी* आत्ताचा डी.एस.आर. वापरुन खर्च काय होईल ते सांगा तीन नद्या एकत्र करुन डी.एस.आर. काढून एकदाची रक्कम ठरवा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, करंट डी.एस.आर प्रमाणे डी.पी.आर. अजून तयार केलेला नाही.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, डी.पी.आर.मध्ये रक्कम वाढल्यानंतर काय करणार. याठिकाणी ५०० कोटी लागणार आहेत. तीन नद्यांसाठी ७०० ते हजार कोटी सुद्धा लागू शकतात. इतर नद्यांचे काय करायचे. आमच्या कडे कधीच होणार नाही. आम्ही भोसरीत राहतो. मागील वेळी विषय चालला होता, राज्य शासनाकडून पत्रव्यवहार होऊ द्या. त्याची प्रत सभागृहापुढे ठेवली पाहीजे. त्याची दुरुस्ती करता आली असती. योजना पूर्ण झाल्यानंतर खर्च कसा भागवणार. मुद्दा ई मध्ये लिहले आहे, म्हणून विषयच निर्णायक ठरतो. याविषयी मार्ग काढू शकाल. तीन आमदार, खासदार सगळ्या पक्षाचे नगरसेवक यांनी एकत्र बसावे. एकदाच रिपोर्ट पाठवावा. वारंवार त्याकरिता आमच्यासमोर येऊ नका. आपल्याला या ठिकाणी जमीन ताब्यात नाही. नेमके किती लागणार. काय लागणार याचे गणित नाही. एखाद्या गोष्टीचे म्हणणे मांडताना चूकीचे ठरते. आंधळेपणाने काम करतोय. नदीच्या आजूबाजूचा परिसर सुद्धा विकसित करणार आहोत. जागा ताब्यात घेण्यासाठी टी.डी.आर. देणार का कसा देणार. हे सगळे विषय आहेत ते

सुद्धा आले पाहीजेत. यावर सांगोपांग चर्चा झाली पाहीजे. ३० टक्के खर्चाचा विषय लक्षात आणून द्यायचा आहे. ३० टक्के रक्कम किती कोटी रक्कमेवर होणार आहे? हजार कोटी, ४९७ कोटींना ३० टक्के प्रमाणे रक्कम द्यायची. अंथरुण पाहून पाय पसरायचे. या विषयात गंभीरपणे लक्ष द्या अशी विनंती आहे. जागा कशी ताब्यात घेणार, काय देणार, टी.डी.आर. देणार का एफ.एस.आय. देणार, मोबदला देणार आहात का. तुमच्या आमच्या ताब्यात नसेल तर प्रकल्प थांबेल. प्रोजेक्ट करताना याबाबतचा विचार करु. सभागृहापुढे प्रोजेक्ट ठेवावा अशी विनंती करते.

मा.प्रशांत शितोळे *:-*मा.महापौर साहेब, खरोखर शहराच्या दृष्टीकोणातून अतिशय महत्वाचा व चांगला विषय आहे. याची जाणीव सगळ्यांना आहे. या विषयाबाबत आपल्याला आठवत असेल, आपल्या कार्यकाळात गेले अनेक वर्षांत नेतृत्व करत आहात. गेले वर्षभरात अनेक निर्णय होत असताना पाहिले तर हा सुद्धा अतिशय महत्वाचा व चांगला निर्णय आहे. गुजरात राज्यामध्ये अहमदाबाद शहरातून साबरमती नदी १४ कि.मी. वाहते. तिथे अतिशय चांगल्या पद्धतीने डेव्हलपमेंट केलेली आहे. काही ठिकाणी ३० ते ४० मी. काही ठिकाणी २०० मी. पाहिले आहे. काही ठिकाणी तळ्याचे स्वरुप आलेले आहे. याच धर्तीवर आपल्या शहरातील २ ते ३ नद्यांचा विकास करण्याचे ठरवले. पवना नदीची लांबी सगळ्यात जास्त आहे. गेले वर्षभरात नदीपात्रातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामांमुळे प्रशासन व लोकप्रतिनिधी यांना अडचणी असतील तर त्यावर मार्ग काढण्यासाठी व्यवस्था ठेवायची असेल तर तेथे चांगले काहीतरी केले पाहीजे. लोकांच्या दृष्टीस चांगले पडले पाहीजे. सकाळ संध्याकाळ वॉकसाठी जाण्यासाठी वाटले पाहीजे. अशी परिस्थिती निर्माण केली पाहीजे. यासाठी खटाटोप केलातर अनेक वर्षांपासून त्याला यश मिळेल असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. साधी जलपर्णी काढू शकत नसाल तर २ ते ३ वर्षे टेंडर रिकॉल करत असाल तर मुदत वाढ देत असालतर, खरेतर असे प्रत्येक प्रोजेक्ट सक्सेसफूल होतील का. अशी शंका बाळगून अशा प्रकल्पांकडे चांगल्या दृष्टीने पाहिले तरी मला चांगले वाटते. स्थायी समितीचा चेअरमन होतो त्यावेळी पहिल्यांदा प्रकल्प आणला. माझ्याकडे एक कन्सल्टंट होता. त्यावेळी *PWD* यांनी सूचना केली. त्यांना पवार यांनी सूचना केली. पाटबंधारे विभागाला प्रकल्प दाखवा. सुर्वे साहेबांकडे जाऊन बसलो.

धोरणात्मक निर्णय होत असताना महापालिकेच्या निर्णयाबरोबर शासनाचे धोरण सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. परंतू शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी होत असताना सिमा सावळे ताईंनी सांगितले तसे नागरिकांना कोणत्या प्रमाणात मोबदला देणार. कमर्शियल स्वरुपात, आर्थिक स्वरुपात देणार नक्कीच त्यांना माहिती होते. माझ्या माहितीत १०० टक्के आत्ता ठरवू शकत नाही. आज धोरण ठरवून, प्रोजेक्ट ठरवून शासनाला सादर केले आहे. मंजूरी आल्यानंतर बाकी गोष्टींवर खर्च करायचा आहे. खर्च करत असताना कायदेशीर मार्गाने सर्व बाबी कराव्या लागतील. या दुमत असण्याची गरज नाही. प्रशासनाचे सुद्धा कर्तव्य आहे. प्रोजेक्टचे किती कॉस्टींग होते. भावीकाळात आपल्यासाठी एल.बी.टी. लागू झाल्यानंतर प्रोजेक्ट शासनानुसार का नाही. त्यानुसार मान्यता घेणे चांगले. प्रोजेक्ट होणे सुद्धा गरजेचे आहे. दोन्ही बाजूंनी विचार करुन सभागृहात मंजूरी देत असताना शहर चांगल्या प्रकारे डेव्हलप होते आहे. सायन्स पार्क, प्राधिकरणात डेव्हलप झालेले ट्रॅफिक पार्क हे वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प शहराला देत आहोत. संपूर्ण देशाला संपूर्ण जगाला आकर्षित केले पाहीजे. असे शैक्षणिक प्रकल्प झाले पाहीजेत. काही अडचणी येत असतात. कोणी अडचणी आणत असतात. यावर तोडगा देत मार्ग कसा काढायचा. शहरातील नागरिकांना कसे सामावून घ्यायचे. या गोष्टींत लक्ष देणे गरजेचे आहे. पर्यावरण विभागाने प्रकल्प सादर केला आहे. यात भविष्यात ब-याच अडचणी असतील. मोठी कामे करत असताना मोठ्या अडचणी येतात. आपल्या शहरासाठी बंद नदीतून पाईपलाईन करण्याची योजना आणली. ही योजना सुरुवातीला ३५० कोटींची होती. आज जवळपास आणखी १०० कोटींची मागणी ठेकेदाराकडून होते आहे. अनेक अडचणी आणल्या जातात. वेगळा दुर्योग होतो. बळी केले जातात, कसे जातात हे सगळ्या शहरातील नागरीकांना भोगावे लागते. यामध्ये चांगल्या प्रकारचा निर्णय घेत नाही. चांगली भूमिका वठवत नाही. काही ठिकाणी कठोर निर्णय घ्यावे लागतात. प्रत्येक ठिकाणी प्रत्येक प्रोजेक्ट शासनाकडून झाला पाहीजे. आपल्या शहरामुळे दुसऱ्याला त्रास व्हावा, दुसऱ्याचा बळी जावा. सर्वसमावेशक प्रकल्प असावा. सर्व प्रकारचे लोक, जातीधर्माच्या लोकांना सामावून घेणारा प्रकल्प असावा. असे प्रकल्प होत असताना शहरातील नागरीकांचे व्यक्तीगत मत चांगले असणे गरजेचे आहे. मी जसे सांगितले, जलपर्णी काढू शकत नसू तर असा मोठा

प्रकल्प करताना यात अडचण होऊ नये याची काळजी घ्यावी. या विषयाला उपसूचनेसहीत मान्यता द्यावी म्हणून विनंती करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, पवना सुधार प्रकल्पाच्या कामाला मंजूरी घेण्यासंदर्भात राज्य शासन, केंद्र शासनाला प्रस्ताव पाठवण्यासंदर्भात विषय आहे. खरेतर या विषयात भविष्यात त्रुटी राहू नयेत. बंद जलवाहीनी संदर्भात बोलले गेले. ज्यावेळी विषय आला ३६० कोटी मंजूरी द्यायला त्यावेळी मी देखील सांगितले आहे. विषयाला मंजूरी घेता. पूर्ण संदर्भित जागा आपल्या ताब्यात नाही. लॅण्ड *ॲक्विझिशन करुन २ महिने सभागृहात प्रस्ताव मांडतो. ज्या दिवशी सभागृहात विषय होतो, त्याचदिवशी लोकमत येथे निविदा प्रक्रियेचा खर्चाचा विषय होतो. महापालिकेला आर्थिक नुकसान सोसावे लागते. प्रशासनाने चूकीची कामे करु नयेत हा हेतू आहे. पवना सुधार प्रकल्प व्हावा अशा मताशी मी देखील आहे. पवना नदीची स्वच्छता राहीली पाहीजे. नदीतील कचरा काढला गेला पाहीजे. सदस्यांनी याठिकाणी विषय मांडला तो झाला पाहीजे. महापालिकेत किती दिवस कचरा व्यवस्थापन, नाल्यावर खर्च करणार. यापेक्षा प्रामुख्याने नदी सुधार प्रकल्प राबविला गेला पाहीजे. त्यात त्रुटी राहता कामा नये हे पाहिले पाहीजे. मे.भोबे यांनी सुद्धा याचा सर्वे केलेला आहे. त्यांना नेमले आहे. मनपाकडून हा नदी सुधार प्रकल्प राबवित असताना नदीचा गाळ पात्रातून काढला. तो निघत असताना कुठे व्यवस्था नाही. प्रामुख्याने पवना सुधार प्रकल्पाचे पाणी फिरवून नदीची देखभाल दुरुस्ती करुन, घनकचरा व्यवस्थापन असा विषय आहे. प्रामुख्याने नदी पात्रातील मोठ्या प्रमाणावर गाळ आहे तो काढला तरी ब्ल्यू लाईन, रेड लाईनमध्ये त्यामुळे नद्यांच्या कडेचा भार पूर नियंत्रण रिटेनिंग पद्धत आहे. तो देखील होणार नाही. महापालिकेच्या खर्चाने एक मोरया मंदीराजवळ, दुसरे टेटवेअर पिंपळे सौदागर मिलिटरी हद्दीवर दोन्ही गेटवर सांडपाणी वापरतात. मलशुद्धीकरण केंद्र नाही. नदी पात्रातील टेटवेअर मोकळे होतात. दुर्गंधी पसरते. नद्यांच्या पाण्यात गटारींचे पाणी जाते. हा त्रास सांगवी पर्यंत जातो. याचा बारकाईने विचार केला पाहीजे. भविष्यात, पवना सुधार प्रकल्पामध्ये काय अडचण येणार नाही. प्रकल्पाकडे लक्ष देतो. प्रकल्प राबविता असताना नंतरच्या काळात परिस्थिती निर्माण होणार नाही. १००० ते १२०० कोटींचा प्रकल्प होणार. ३ नद्यांचा अतिशय चांगल्या प्रकारचा प्रकल्प होईल. मनपा क्षेत्रांत बेस्ट सिटी करत असताना बरेचसे अधिकारी बाहेर देशांत जातात. त्या नदीतील पात्र बांधलेले आहे. चांगली संकल्पना करण्यास हरकत नाही. त्रुटी राहता कामा नये. भविष्यात प्रकल्प चांगल्या पद्धतीने व्हावा अशी विनंती आहे.*

*मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, सगळ्यांनी नदी सुधार प्रकल्प बघितला आहे. काही सदस्यांना हा प्रश्न असेल, एवढे ४९७ कोटी दिलेले आहेत. त्याची वसूली*

*एस्टिमेट झाले पाहीजे. ३ नद्या एकत्र घेऊन केले पाहीजे. जलपर्णीवरुन ओरडा होतो. नदी सुधार व्यवस्थित केला तरी त्याच्या विषयी सुद्धा राहणारे पाणी वाहते राहील नाही तर प्रदूषित पाणी जमले नाही तर त्यात जलपर्णी येणार नाही. देखभाल, दुरुस्ती, महाराष्ट्र शासनाकडून जलसंपदा खात्याकडून शहरात जे प्रोजेक्ट राबविले आहेत. जेवढ्या जागा ताब्यात मिळाल्या तेवढ्या जागेत नदी बांधायला सुरुवात करा. नदी सुधारमध्ये कामकाज सुरु केले पाहीजे. जेवढा उशीर कराल तेवढे एस्टिमेट वाढत जाणार. २०११ मध्ये प्रपोजल केले असेल तर ३ नद्यांचे केले आहे का. संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले पाहीजे. हे फक्त पवना नदीचे प्रपोजल होते. २०१३ मध्ये प्रपोजल आलेले आहे ते तीन वेळा पुढे गेलेले आहे. मागील रेट आत्ताच रेट यात काम सुरु होईपर्यंत एक ते दीड वर्ष जाते. मी विनंती करते, आपल्या दृष्टीने उपयोगी असे सायन्स पार्क केले, त्याच पद्धतीने नदी सुधार प्रकल्प हा सुद्धा चांगल्या पद्धतीने व्हावा.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- १७८* | *विषय क्रमांक :- ३*
*दिनांक :- ११.०२.२०१३* | *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/६८१/१२ दि.१३/१२/२०१२

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२२४४ नुसार

पवना नदी सुधार प्रकल्पाचा फिजीबीलिटी रिपोर्ट मे.एस.एन.भोबे मनपाच्या प्रकल्प सल्लागारांमार्फत केंद्र शासनाचे अनुदान मिळविणेसाठी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविला होता अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्रानुसार एकूण प्रकल्प खर्चापैकी केंद्रशासन (NRCD) ५०**%**, राज्यशासन २०**%**, व महानगरपालिका ३०**%** निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित असून मुद्दा (ई) नुसार नदी प्रकल्पासाठी आवश्यक जागा देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासनाकडून मनपाकडे हस्तांतरीत करून घेणेस व प्रकल्प खर्चाच्या ३०**%** निधी महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देणेस व त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ३ नद्या वाहत आहेत. पवना नदी सुधार प्रकल्प हा विषय घेतला आहे. त्यामध्ये मुठा नदी सुधार प्रकल्प व इंद्रायणीनदी सुधार प्रकल्प

या दोन्ही नद्यांचा समावेश करावा. तसेच नविन डी.एस.आर.चा विचार करुन इस्टिमेट तयार करणेस व तीनही नद्यांचा एकत्रित विचार करुन प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- ४*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भः- १) मा.राहूल भोसले मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२३८७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग,कॅन्सर,किडनी,मेंदूचे आजार,दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आदि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पीडितांना मदत महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या रक्कम रु.२५,००,०००/- या अनुदानांतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि २२ मंत्रालय , मुंबई-४०००३२ दिनांक १८-१२-२००७ नुसार या ट्रस्टला दरवर्षी र.रु.२५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान हे अनुदानाकामी सादर करावयाच्या पुढील नमूद कागदपत्रे सादर करणेची अट शिथिल करुन १ (३१ मार्च २०१२ अखेरचे चार्टर्ड अकौटंट यांनी प्रमाणित केलेले ऑडिट) व २ (गतवर्षी घेतलेल्या अनुदानाचा विनियोग दाखला युटिलायझेशन सर्टिफिकेट) सदर ट्रस्टला अनुदान मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -*

महानगरपालिका नागरीक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे -हृदयरोग, कॅन्सर / किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर आजारग्रस्त आदी दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या

रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना अर्थसहाय्य केले जात असल्याने यापुढे महापालिकेकडून प्रतिवर्षी र.रु.२५,००,०००/- ऐवजी र.रु.५०,००,०००/- अनुदान अर्थसहाय्य करणेस मान्यता देणेत यावी. त्याच प्रमाणे प्रतीरुग्ण र.रु.५,०००/- ऐवजी प्रत्येक रुग्णास र.रु.१०,०००/- अनुदान देण्यास मान्यता देणेत यावी.

*मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मा.उल्हास शेट्टी यांनी जी उपसूचना दिली त्याबद्दल पुण्याचे महापौरांकडे चौकशी केली असता, पुणे महापालिकेकडून माहिती घ्यावी. राज्य शासनात तसे आहे असे रुग्णांना पुणे महापालिका १ लाखापर्यंतचे बील मोफत करतात. ते एक लाख मोफत करतात, आपण ५,०००/- देतो. ही मदत अतिशय तुटवडी आहे. तशा प्रकारचा विषय आपल्याकडे आणावा. अटी शर्तींच्या अधीन राहून प्रशासनाचा आदेश द्यावा, त्याची अंमलबजावणी आपल्याकडे करावी.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- १७९* — *विषय क्रमांक :- ४*
*दिनांक :- ११.०२.२०१३* — *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:- १) मा.राहूल भोसले मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/१२/२०१२ ठराव क्र.२३८७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग,कॅन्सर,किडनी,मेंदूचे आजार,दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आदि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पीडितांना मदत महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या रक्कम रु.२५,००,०००/- या अनुदानांतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि २२ मंत्रालय , मुंबई-४०००३२ दिनांक १८-१२-२००७ नुसार या ट्रस्टला दरवर्षी र.रु.२५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान हे अनुदानाकामी सादर करावयाच्या पुढील नमूद कागदपत्रे सादर करणेची अट शिथिल करुन १ (३१ मार्च २०१२ अखेरचे चार्टर्ड अकौटंट यांनी प्रमाणित केलेले ऑडिट) व २ (गतवर्षी घेतलेल्या अनुदानाचा विनियोग दाखला युटिलायझेशन सर्टिफिकेट) सदर ट्रस्टला अनुदान

मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिका नागरीक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे -हृदयरोग, कॅन्सर / किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर आजारग्रस्त आदी दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना अर्थसहाय्य केले जात असल्याने यापुढे महापालिकेकडून प्रतिवर्षी र.रु. २५,००,०००/- ऐवजी र.रु.५०,००,०००/- अनुदान अर्थसहाय्य करणेस त्याच प्रमाणे प्रतीरुग्ण र.रु.५,०००/- ऐवजी प्रत्येक रुग्णास र.रु.१०,०००/- अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १८०* *विषय क्रमांक :- ५*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**संदर्भ**:- १) *मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/११५१/२०१२*
*दि. ०३/११/२०१२*
*२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ८८*

*श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रय ढेरे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना दिनांक २३/०९/२०१२ पासून प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस १ वर्ष कालावधीसाठी मान्यता देणेत येत आहे.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.*

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, या विषयपत्रकात व उद्या महापालिका सभा घेणार त्यांच्या अजेंडात असे अधिकाऱ्यांचे अनेक विषय आहेत. त्यांना शासनाकडून प्रतिनियुक्तीवर इथे आणलेले आहे. शासनाकडून आलेले आहेत त्यांची नियुक्ती इथे कधी झाली. त्यांना मान्यता घेतली आहे का. मान्यता किती कालावधीसाठी घेतलेली आहे. त्यानुसार त्याच्या मान्यतेसाठी आपल्यापुढे विषय कधी ठेवलेला आहे. किती कालावधीसाठी ठेवलेला आहे. कायदा काय सांगतो - त्यांना किती कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर ठेवावे याची माहिती द्यावी.*

मा.सावंत (सहआयुक्त,प्रशासन) :- मा.महापौर साहेब, आत्ता जो विषय आपल्यापुढे आहे. श्री.ढेरे,सहआयुक्त यांना मुदतवाढ दिलेली आहे. दि.२३/९/२०११ रोजी महापालिकेत रुजू करुन घेतले आहे. त्याप्रमाणे महापालिका सभा ठराव क्र.१२२५ दि. १९/११/२०११ अन्वये एक वर्ष कालावधीसाठी महापालिका सभागृहात मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे दि.२२/०९/२०१२ रोजी मुदत संपत आली म्हणून दि.२३/९/२०१२ पासून एक वर्ष पुढे मुदतवाढीसाठी विषय आपल्यापुढे आणला आहे.

मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, एक वर्ष झाल्यानंतर या लोकांची पुढील १ वर्षासाठी मान्यता घेतली आहे का?

मा.सावंत (सहआयुक्त,प्रशासन) :- मा.महापौर साहेब,दि.२३/९/२०११ रोजीची तारीख आहे. पहिल्या वर्षात मुदत संपत आलेली आहे. दि.३/११/२०१२ला विषय ठेवून दि.२३/९/२०१२ पासून मुदत वाढीसाठी विषय आला आहे.

मा.शमिम पठाण :-सभेमध्ये विषय यायला हवा होता. आत्ताच विषय का आला. किती दिवसांनंतर विषय आला आहे.

मा.सावंत (सहआयुक्त,प्रशासन) :- मा.महापौर साहेब, मा.विधी समितीत दि.३/११/२०१२ ला विषय आलेला होता.

मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, जानेवारी महापालिका सभेत विषय आलेला आहे.

मा.सावंत (सहआयुक्त,प्रशासन) :- मा.महापौर साहेब, हे निदर्शनास आणून देतो की, मा.विधी समितीमार्फत विषय येतो. तेथे महापालिका सभेकडे शिफारस केली जाते. त्याप्रमाणे सभेपुढे मान्यतेसाठी विषय येतो.

मा.शमिम पठाण :-मा.महापौर साहेब, नियमाप्रमाणे आलेल्या अधिकाऱ्याला एक वर्षासाठीच ठेवावे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, आम्हाला वाईट ठरवण्यासाठी असे विषय सभागृहात कोण का आणतो. आमचे म्हणणे आहे, आमच्यासाठी अधिकारी एकसारखे आहेत. त्या-त्या अधिकाऱ्यांची मुदत संपण्यापूर्वी ४५ दिवस आधी विधी समितीत विषय केला पाहीजे. एक पूर्ण वर्ष झाले नाही. आमच्याकडे विषय परत येऊ नये हीच नम्र विनंती आहे. यांची मुदत पूर्ण होणार आहे. दि.२३/९/२०१३ पर्यंत आहे. एक वर्षाची मुदत वाढ द्यावी लागते. मध्येच काढता येणार आहे का. तसे करत असाल तर

आत्ताच्या तारखेनंतर आमच्याकडून त्यांना मुक्ती मिळाली आहे. त्यांना शासनाच्या सेवेत जावे या दृष्टीकोणातून सांगा.

मा.सावंत (सहआयुक्त,प्रशासन) :- मा.महापौर साहेब,सहाय्यक आयुक्ताची एकूण ११ पदे २००६ च्या आकृतीबंधाप्रमाणे ५०% पदे शासन अधिकाऱ्यांकडून भरावीत असा शासनाचा निर्णय आहे. शासनाने एकूण ११ पैकी ६ पदे शासनाची भरली आहेत असे महापालिकेला कळवले आहे. एक अधिकारी आपला, एक शासनाचा असणार आहेत. एक वर्ष जवळजवळ पूर्ण होत आले आहे. माझी नम्र विनंती आहे, एक वर्ष मुदत वाढवून द्यावी.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मुदतवाढीचे विषय आधीच देत जा. त्या आधीच त्यांना रिलिज करण्यात यावे अशी विनंती आहे. ४५ दिवस अगोदर विषय मा.विधी समितीत केला पाहीजे. एक महिना म्हटला तरी त्या अधिकाऱ्याची मुदत वाढत जाते.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, शासनाच्या अधिकाऱ्यांचे विषय सगळे सदस्य घेतात असे वाटते. ज्या अधिकाऱ्यांना पाठवायचे असेल तर त्यांचे नावानिशी ठराव करा. मा.सावंत साहेबांनी सांगितले, ५०% शासनाकडून सहा.आयुक्त पद भरले जाणार आहे. सर्वच अधिकाऱ्यांचा विषय उपस्थित केला तर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनात मनस्विता निर्माण होते. शंका असेल तर सभागृहात ज्या अधिकाऱ्यांविषयी ठराव करावा, काम करणाऱ्या चांगले अधिकाऱ्यांच्या सुद्धा मनात शंका निर्माण होते. ज्यांना पाठवायचे आहे त्यांचा ठराव करु शकतो. त्यांना शासनाकडे रेफर करण्याचा अधिकार सभागृहाला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८१ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/११७४/२०१२,

दि.०८/११/२०१२

२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ८९

निवडसमितीने तयार केलेल्या निवड यादीमधील उमेदवार डॉ.श्रीम. गायकवाड सुजाता नितीन प्रवर्ग खुला (अनु.जाती) यांना स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे. तसेच निवड यादीमधील उमेदवार विहित मुदतीमध्ये रुजू न झालेस प्रतिक्षा यादीमधील उमेदवार डॉ.श्रीम. डांगे वर्षा सुभाष - प्रवर्ग खुला यांस स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ या पदावर नेमणुकीस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८२ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/११७३/२०१२,
दि. ०८/११/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९०

डॉ.श्रीम. शिंगाडे माधुरी मुरलीधर यांना खुल्या (अनु.जमाती) प्रवर्गामधून "फिजिशियन" वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या पदावर नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८३ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

**संदर्भ**:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/११७२ /२०१२,दि.०८/११/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९१

डॉ.श्री.पवार सुनिल जगन्नाथ यांना खुल्या (अनु.जमाती) प्रवर्गामधून "कान, नाक, घसा तज्ञ" वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या पदावर नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८४ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

**संदर्भ**:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/११७१/ २०१२,दि.०८/११/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९२

निवडसमितीने तयार केलेल्या निवड यादीमधील उमेदवार डॉ.श्रीम. सपाटे मनिषा अश्विनीकुमार प्रवर्ग खुला (इमाव) यांना "भूलतज्ञ" या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे तसेच निवड यादीमधील उमेदवार विहित मुदतीमध्ये रुजू न झालेस प्रतिक्षा यादीमधील उमेदवार डॉ.श्रीम. कासनाळे निलावती विजय प्रवर्ग खुला (इमाव) यांस "भूलतज्ञ" या पदावर नेमणुकीस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- १०*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**संदर्भ**:- १) *मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/प्रकल्प/जा/कावि/ १५६/२०१२ दि.५/१२/२०१२*
*२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९३*

*दापोडी ते फुगेवाडी सी.एम.ई.व इतर रस्तारुंदीकरणाकामी ताब्यात आलेल्या जागेत रस्ता सुधारणा व डांबरीकरण करणेकामी येणा-या र.रु. ३,९५,,०८,६११/- (अक्षरी र.रु. तीन कोटी पंच्च्याण्णव लाख आठ हजार सहाशे अकरा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे -*

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये महापालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक ठिकाणी मनपाचा आर्थिक फायद्याच्यादृष्टीने व मनपाच्या धोरणानुसार नागरिकांच्या हितास्तव ना नफा ना तोटा या तत्वावर स्वत:च्या खर्चाने शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी ई टॉयलेट (स्वच्छतागृह) चा लोकोपयोगी उपक्रम राबवून व या उपक्रमासाठी आवश्यक असणारे पाण्याचे कनेक्शन, ड्रेनेज लाईन व विद्युत पुरवठा महापालिकेमार्फत मोफत पुरवून त्या उपक्रमाची देखभाल करुन अथवा संपूर्ण खर्च करुन महापालिकेच्या ताब्यात दिल्यास अथवा स्वत: देखभाल केल्यास व अशा सार्वजनिक ठिकाणी महापालिकेच्या अटी शर्तीस अधीन राहून ई टॉयलेटचा (स्वच्छतागृह) उपक्रम राबवित असतांना त्या उपक्रमाच्या ठिकाणी स्वखर्चाने स्वत:ची त्याच ठिकाणी त्या ई टॉयलेटवर मोफत जाहिरात करण्यास परवानगी देणेत यावी.

*मा.संजय काटे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- १८५* *विषय क्रमांक :- १०*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/प्रकल्प/जा/कावि/१५६/२०१२ दि.०५/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०९/०१/२०१३ ठराव क्रमांक ९३

दापोडी ते फुगेवाडी सी.एम.ई. व इतर रस्ता रुंदीकरणाकामी ताब्यात आलेल्या जागेत रस्ता सुधारणा व डांबरीकरण करणेकामी येणा-या र.रु.३,९५,०८,६११/- (अक्षरी र.रु.तीन कोटी पंच्याण्णव लाख आठ हजार सहाशे अकरा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये महापालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक ठिकाणी मनपाचा आर्थिक फायद्याच्यादृष्टीने व मनपाच्या धोरणानुसार नागरिकांच्या हितास्तव ना नफा ना तोटा या तत्वावर स्वत:च्या खर्चाने शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी ई टॉयलेट (स्वच्छतागृह) चा लोकोपयोगी उपक्रम राबवून व या उपक्रमासाठी आवश्यक असणारे पाण्याचे कनेक्शन, ड्रेनेज लाईन व विद्युत पुरवठा महापालिकेमार्फत मोफत पुरवून त्या उपक्रमाची देखभाल करुन अथवा संपूर्ण खर्च करुन महापालिकेच्या ताब्यात दिल्यास अथवा स्वत: देखभाल केल्यास व अशा सार्वजनिक ठिकाणी महापालिकेच्या अटी शर्तीस अधीन राहून ई टॉयलेटचा (स्वच्छतागृह) उपक्रम राबवित असतांना त्या उपक्रमाच्या ठिकाणी स्वखर्चाने स्वत:ची त्याच ठिकाणी त्या ई टॉयलेटवर मोफत जाहिरात करण्यास परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

ठराव क्रमांक :- १८६ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५५/२०१२ दि.११/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९४

डॉ. श्री.गायकवाड राहुल रामदास यांना नेत्रतज्ञ वेतनश्रेणी र.रु.१५,६००-३९,१०० ग्रेड वेतन ६६०० या पदावर नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८७ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२७१/२०१२ दि.१४/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९६

श्री.शहाजी पवार,सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०३/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८८ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१)मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२७०/२०१२
दि. १४/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक ९७

श्री.अशोक मुंढे,सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०१/०९/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब,सहाय्यक आयुक्तांना परत पाठवण्यासाठी त्यांचे अभिनंदन होत असेलतर कितीतरी पटींनी महागाई वाढली आहे. त्यापटीत जकातीचे उत्पन्न वाढले नाही. याठिकाणी जे सांगितले आहे, पहिल्यांदा मिटींगमध्ये मुद्दा मांडला आहे. एक वर्षापासून आयडीया कंपनीच्या जकातीबद्दल बोलत होते त्यावेळी त्यांच्याकडे गेले होते. आयडीया कंपनी कोण आहे माहित नाही. परंतू कंपनीचा माल विकतो, त्याबद्दल आयडीया माहित आहे. छोट्या-छोट्या वस्तू असल्या तरी कोट्यावधींचा व्यवसाय होतो. श्री.मुंढे यांच्या कार्यालयामध्ये जाऊन बोलले तेव्हा ते म्हणाले, तुम्ही मला योग्य तो पुरावा आणा, त्याशिवाय चौकशी करणार नाही. चौकशी करायला पुरावा मिळेल. आयडीया दिलेली आहे, त्याला एक वर्ष लागले आहे. अशा प्रकारे १/१ वर्षाप्रमाणे त्यांना समजवत मी सांगितले. त्यावर त्यांचा विश्वास नव्हता. असा अधिकारी कामसू, अतिशय हुशार आहे. बदनाम आहेत. अशा लोकांचा इतरही ठिकाणी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग होईल म्हणून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर दि.१/९/१२ पासून विषय ठेवला आहे. त्यांचा विषय फेटाळण्यात यावा अशी विनंती करते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १८९ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२८५/२०१२
दि. १८/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक १००

श्री.ए.वाय.कारचे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०३/१२/२०१२ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १९० विषय क्रमांक :- १५
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/१/कावि/४१६/२०१२
दि.२७/१२/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ९/१/२०१३ ठराव क्रमांक १०२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत दवाखाने/ रूग्णालयाकडील प्रस्तावा सोबत नमूद प्रपत्र अ मधील प्राप्त भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.१२,३७,२५८/- इतकी येत आहे. ही किंमत र.रु.५००/- पेक्षा जास्त असलेने त्या साहित्याची विक्रि जाहिर लिलाव करुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १६
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- **१) मा.माई मनोहर ढोरे य़ांचा दि.०२/१२/२०११ चा प्रस्ताव**
**२) मा.क प्रभाग समिती सभा दि. ०२/१२/२०११ ठ.क्र.५०**
**३) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६५**

मौजे सांगवी येथील सर्व्हे नंबर ९ व ८४ च्या गावठाणालगतच्या जागेत पुर्वीपासून खाजगी मालकाची अनेक घरे आहेत. मंजूर विकास योजनेनुसार सदरची घरे १८ मी. व १२ मी. रस्त्यावर बाधीत होत आहेत. मंजूर विकास योजनेप्रमाणे असणारा चौक व १८ मी. रस्ता नदीकडेच्या व दक्षिणेकडील सर्व्हे नंबर ९ मधील रस्ता विकसित झालेला दिसत आहे. त्यानुसार असणारी विद्यमान घरे ही बाधीत होतांना दिसत नाही. म्हणून प्रत्यक्ष जागेवरील रस्त्याची व चौकांची आखणीप्रमाणे मंजूर विकास योजनेची रस्त्याची आखणी दुरुस्त होणे आवश्यक आहे. यासाठी म.प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपरोक्त प्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव शासनाचे मंजूरीकामी पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.चंद्रकांत वाळके :- मा.महापौर साहेब, सदर विषय दफ्तारी दाखल करणेत यावा.

मा.बाळासाहेब तरस :- मा.महापौर साहेब, अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- १९१ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- **१) मा.माई मनोहर ढोरे य़ांचा दि.०२/१२/२०११ चा प्रस्ताव**
**२) मा.क प्रभाग समिती सभा दि. ०२/१२/२०११ ठ.क्र.५०**
**३) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६५**

विषय क्रमांक १६ दफ्तारी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

*ठराव क्रमांक :- १९२* *विषय क्रमांक :- १७*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**संदर्भ:-१)** *मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.सौ./ड-२/१७५/२०१२, दि.१२/१२/२०१२*

**२) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६६**

*मौजे पिंपळे सौदागर, ता. हवेली, जि.पुणे येथील प्रस्तावित आरक्षण क्र. ३६९ बस टर्मिनसच्या जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्यांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १९३* *विषय क्रमांक :- १८*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**संदर्भ:-१)** *मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/रहाटणी/८३९/२०१२,दि.१२/१२/२०१२*

**२) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६७**

*मौजे रहाटणी (काळेवाडी), ता.हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं. १२३, १२५, आरक्षण क्र. ६४७ उदयान जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्यांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- १९*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**संदर्भ:-१)** *मा.नारायण बहिरवाडे, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव*

**२) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६८**

*मौजे पिंपळे सौदागर येथे स.नं.३१, ३२ व ३५ मधून सध्याचा अस्तित्वातील रस्ता संरक्षण विभागाच्या हद्दीत काही प्रमाणात येत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता संरक्षण विभागाकडून वारंवार बंद केला जात आहे. सबब सदर ठिकाणी नागरिकांना जाणे येणेसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे संरक्षण विभागाच्या हद्दीलगत महानगरपालिकेच्या आखत्यारीतील क्षेत्रातून ९.०० मी. चा रस्ता करणे आवश्यक आहे. सदर रस्ता करणेस जागा मालकांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी मौजे पिंपळे सौदागर स.नं.३१, ३२ व ३५ मधून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ९.०० मी. रुंदीचा रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.*

*मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.शत्रुघ्न काटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला पुढीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे* - **मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १२, ३९ मधून जाणा-या १८ मी. डी.पी.नुसार नियोजित रस्त्याने ते संरक्षण विभागाच्या हद्दीलगत महानगरपालिकेच्या आखत्यारितील क्षेत्रातून सर्व्हे नं. ३६ व ३७ पर्यंत ९ मी. रस्ता आवश्यक आहे. तरी मौजे पिंपळे सौदागर स.नं. ३६ व ३७ पर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ९ मी. रुंदीचा रस्ता घोषित करण्यास मान्यता देणेत यावी.**

*मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.*

*मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.*

*यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

ठराव क्रमांक :- १९४ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त

**संदर्भ:-१)** मा.नारायण बहिरवाडे, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव
**२) मा.शहर सुधारणा समिती दि.२८/१२/१२ ठ.क्र.६८**

मौजे पिंपळे सौदागर येथे स.नं.३१, ३२ व ३५ मधून सध्याचा अस्तित्वातील रस्ता संरक्षण विभागाच्या हद्दीत काही प्रमाणात येत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता संरक्षण विभागाकडून वारंवार बंद केला जात आहे. सबब सदर ठिकाणी नागरिकांना जाणे येणेसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे संरक्षण विभागाच्या हद्दीलगत महानगरपालिकेच्या आखत्यारीतील क्षेत्रातून ९.०० मी. चा रस्ता करणे आवश्यक आहे. सदर रस्ता करणेस जागा मालकांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी मौजे पिंपळे सौदागर स.नं.३१, ३२ व ३५ मधून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ९.०० मी. रुंदीचा रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. १२, ३९ मधून जाणा-या १८ मी. डी.पी.नुसार नियोजित रस्त्याने ते संरक्षण विभागाच्या हद्दीलगत महानगरपालिकेच्या आखत्यारितील क्षेत्रातून सर्व्हे नं. ३६ व ३७ पर्यंत ९ मी. रस्ता आवश्यक आहे. तरी मौजे पिंपळे सौदागर स.नं. ३६ व ३७ पर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ९ मी. रुंदीचा रस्ता घोषित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १९५ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

दिनांक १६/११/२०१२, १९/११/२०१२ व ७/१२/२०१२चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २१वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

*ठराव क्रमांक :- १९६* *विषय क्रमांक :- २१*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.नगरसचिव*

**मा.महिला व बालकल्याण समिती**

(अ) दिनांक २९/११/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
(ब) दिनांक १२/१२/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
(क) दिनांक २६/१२/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*
*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १९७* *विषय क्रमांक :- २२*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.नगरसचिव*

**मा.शहर सुधारणा समिती**

(अ) दिनांक २१/११/२०१२ व २९/११/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
(ब) दिनांक ०५/१२/२०१२ व १२/१२/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
(क) दिनांक १९/१२/२०१२ व २८/१२/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*
*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*
*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १९८* *विषय क्रमांक :- २३*
*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.नगरसचिव*

**मा.क्रिडा समिती**

दिनांक ०५/१२/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- १९९* *विषय क्रमांक :- २४*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

**मा.क प्रभाग समिती**

**संदर्भ-: १) मा.आशा सुपे व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...**

**२) मा.क प्रभाग समिती सभा दि.७/११/२०१२ ठ.क्र.११३**

*मौजे दिघी येथील स.नं.६६ मध्ये दफनभूमीचे आरक्षण असून त्याचा आरक्षण क्र.२/२१८ आहे. एकूण क्षेत्रफळ ०.८० हेक्टर आहे. दिघी गावातील हे एकमेव आरक्षण आहे. दिघी मध्ये विविध जाती धर्माचे लोक राहत असून त्यांच्यासाठी दफनभूमी जागेची आवश्यकता आहे. सबब उपलब्ध जागेची खालीलप्रमाणे विभागणी करणेस मान्यता देणेत येत आहे.*

१. *मुस्लीम समाज - ५० आर (नाल्याच्या पश्चिमेकडील भाग)*

२. *ख्रिश्चन समाज - १५ आर (नाल्याच्या पूर्वेकडील भाग)*

३. *हिंदू समाज - ५ आर (नाल्याच्या पूर्वेकडील भाग)*

*वरीलप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.*

*मा.दत्ता साने :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*ठराव क्रमांक :- २००* *विषय क्रमांक :- २५*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ :- क्र. काक/१/कावि/३२/२०१३ दि.१९/१/२०१३

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामस्वच्छता अभियान, संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभियान - स्वर्गीय राजीव गांधी प्रशासकीय गतीमान कामकाज धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध विभागाअंतर्गत व नागरीकांना पुरविण्यात येणा-या सेवाविषयक सेवा सुविधांतर्गत प्रोत्साहनपर स्पर्धा आयोजित करणेबाबतचे प्रस्तावात सविस्तर नमुद केलेल्या ७ कलमी कार्यक्रमाअंतर्गत १० बाबींचे धोरणास तसेच स्पर्धा आयोजित करतांना प्रभागस्तर व महापालिकास्तर परिक्षण करण्याकरीता नेमण्यात येणा-या त्रयस्त संस्थेतील परिक्षकांचे मानधन, प्रवासखर्च, मानचिन्ह खरेदी, प्रशस्तीपत्रक छपाई, रोख स्वरुपातील बक्षिसे तसेच स्पर्धा अनुषंगाने येणारा अपेक्षित खर्च असा एकूण खर्च र.रु.८५,००,०००/- यांस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्पर्धेच्या अटी शर्ती, निकष व गुणांची पद्धत ठरविणेचा व त्यात बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांस देणेत येत आहे.

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*
*यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -*

*अनुकूल-८५* *प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.*

*विषय क्रमांक :- २६*

*दिनांक :- ११.०२.२०१३* *विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ :- १) शिक्षणमंडळ सभा ठराव क्र. १४०, दि.०३/०१/२०१३
२) जा.क्र. शिक्षण/आस्था/कावि/१४/२०१३ दि.०७/०१/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी थरमॅक्स सोशल इनिशिएॅटिव्ह फाऊंडेशन व पिंपरी चिंचवड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा शाळा तपोवन मंदिराजवळ पिंपरी पुणे-१७ व छत्रपती शाहुजी महाराज प्राथमिक विद्यालय कासारवाडी पुणे ३४ या दोन शाळेत दत्तक योजना राबविण्यासाठी एक पुस्तिका सादर केली असून त्यामध्ये योजना राबविताना मनपा ने थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह फाऊंडेशन आणि आकांक्षा फाऊंडेशन यांनी कोणकोणत्या बाबींची व उद्दीष्टांची पुर्तता करावी यांची माहीती असून आर्थिक बाबींमध्ये शाळेचे दैनंदिन व्यवस्थापन व शाळा चालविण्यासाठी वार्षिक खर्चाचे नियोजन थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह फाऊंडेशन आणि आकांक्षा फाऊंडेशन यांच्या वतीने केले जाईल व प्रत्यक्ष खर्च थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह

फाऊंडेशन करेल. पिंपरी चिंचवड मनपा स्वतःचे आर्थिक अंदाजपत्रक तयार करुन त्यांना गणवेश, दप्तरे, पाठ्यपुस्तके, बूट मौजे, स्टेशनरी, कला साहित्य शैक्षणिक साधने, क्रिडा साहित्य व शालेय पोषण आहाराची तरतुद करेल, तसेच मनपा इयत्ता १ ली पर्यंत आवश्यक असणा-या खोल्यांचे बांधकाम दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकीय तरतुद करेल. अटी शर्तीनुसार सदर करार तीस वर्षांचा असेल, अटी व शर्तीचा भंग केला असेल तर योग्य त्या पूर्व सूचनेनुसार पिंपरी चिंचवड मनपा करार संपुष्टात आणेल. या सर्व बाबींवरुन पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देण्यासाठी व ज्युनिअर के.जी. पासून इ. १ ली ते ७ वी पर्यंत प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून देण्यासाठी १. मनपा शाळा, तपोवन मंदिराजवळ, पिंपरी, पुणे-१७ व २. छत्रपती शाहुजी महाराज प्राथ. विद्यालय, कासारवाडी, पुणे-३४ या दोन शाळा दत्तक योजनेअंतर्गत थरमॅक्स सोशल इनिशिएटिव्ह फाऊंडेशन व आकांक्षा फाऊंडेशन, शिक्षण मंडळ व पिंपरी चिंचवड मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक शाळा सन २०१३-१४ या वर्षात सुरु करण्यास व योग्य अटी व शर्तीनुसार शिक्षण मंडळ सभेने ठराव क्रमांक १४० दिनांक ०३/०१/२०१३ नुसार संमत ठरावानुसार तसेच तसा सामंजस्य करार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

*मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.*

*मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, हा विषय पुढील सभेमध्ये आणावा अशी सूचना करते.*

*मा.सुमन नेटके :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देत आहे.*

*यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -*

*ठराव क्रमांक :- २०१ विषय क्रमांक :- २६*
*दिनांक :- ११.०२.२०१३ विभाग :- मा.आयुक्त*

संदर्भ :- १) शिक्षणमंडळ सभा ठराव क्र. १४०, दि.०३/०१/२०१३
२) जा.क्र. शिक्षण/आस्था/कावि/१४/२०१३ दि.०७/०१/२०१३

*विषय क्रमांक २६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.*

*अनुकूल-८५ प्रतिकूल-०*

*अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.*

----

*मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.*

*(मोहिनीताई विलास लांडे)*
*महापौर*
*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी - ४११ ०१८*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*नगरसचिव कार्यालय*
*क्रमांक - नस/४/कावि/२८६/१३*
*दिनांक :- १३/०३/२०१३*

**प्र. नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी- ४११ ०१८**

*प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.*

e drive\Nagersachiv1\GB-12-13 new\January-2013 G.B .proceeding.doc